सोलापूर
Solapur Tarun Bharat
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com
छत्रपती संभाजीनगर गुरूवार, दि. १६ ऑक्टोबर २०२५ वर्ष - तिसरे अंक १९२ पाने : ८

# नक्षलवादी वरिष्ठ कमांडरसह ६० सहकाऱ्यांचे मुख्यमंत्र्याच्या उपस्थितीत आत्मसमर्पण

गडचिरोली, १५ ऑक्टोबर : महाराष्ट्रामध्ये नक्षलवाद्यांच्या हिंसेवर मोठा यशस्वी टप्पा गाठला गेला आहे. नक्षलवाद्यांच्या सेंट्रल कमिटी आणि पोलिट ब्युरो सदस्य तसेच वरिष्ठ नक्षल कमांडर मल्लोजुला वेणुगोपाल उर्फ सोनू उर्फ भूपती यांनी आज आपल्या ६० सहकाऱ्यांसह गडचिरोली पोलिसांसमोर ऐतिहासिक आत्मसमर्पण केले.हा आत्मसमर्पण कार्यक्रम मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत पार पडला, ज्यामुळे या घटनेला विशेष महत्त्व प्राप्त झाले. या सोहळ्याला राज्याचे पोलीस महासंचालक आणि इतर अनेक वरिष्ठ पोलीस अधिकारी देखील उपस्थित होते. आत्मसमर्पण केलेल्या नक्षलवाद्यांनी आपले शस्त्रे पोलिसांना सुपूर्द केली.



गेल्या काही दिवसांपासून भूपती आणि त्याच्या सहकाऱ्यांसह मध्यस्थांच्या माध्यमातून शरणागतीसंबंधी चर्चा सुरू होत्या. भूपतीने शरणागती पत्करण्याआधी स्पष्ट केले होते की ही प्रक्रिया फक्त महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत पार पडावी. मुख्यमंत्र्यांनी त्यांची ही अट मान्य करत स्वतः उपस्थित राहून हा कार्यक्रम यशस्वी केला.

आत्मसमर्पण करताना भूपतीने स्पष्ट केले की, सशस्त्र नक्षलवाद्यांचा मार्ग सोडून सरकारसोबत शांततेच्या मार्गाने समाजाच्या मुख्य प्रवाहात येण्याची त्यांची भूमिका आहे.

या शरणागतीनंतर मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते संविधानाची प्रत सुपूर्द केली, जे त्यांना लोकशाही आणि कायद्याच्या चौकटीत आणण्याचे एक प्रतीकात्मक आणि कायदेशीर पाऊल ठरले.

गेल्या जवळपास ४० वर्षांपासून सातत्याने नक्षलवादाशी लढणारा गडचिरोली जिल्हा, सुरुवातीच्या काळात चंद्रपूर, भंडारा, गोंदिया हा भाग देखील नक्षलवादाने ग्रस्त होता. त्यामध्ये विशेषतः गडचिरोली जिल्हा हा सीमावर्ती भाग आहे. हा सर्व भाग मोठ्या प्रमाणात विकासापासून वंचित राहिला. त्यावेळी कोंडापल्ली सीतारामय्याने पीपल्स वार ग्रुप तयार केला, त्यानंतर तेव्हाचा आंध्र प्रदेश आणि गडचिरोलीत मोठ्या प्रमाणात माओवादी सक्रिय झाले आणि येथील युवकांमध्ये व्यवस्थेच्या विरोधात संभ्रम निर्माण करण्यात आला, असं देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं.

भारतीय संविधानाने आपल्याला न्याय मिळवू शकत नाही, असा संभ्रम तेव्हा येथील युवकांमध्ये निर्माण केला गेला, तसेच जंगलातून आपण राज्य चालवून एक नवी व्यवस्था उभी करू अशा प्रकारचे स्वप्न त्यावेळी तरुणांना दाखवले गेले. त्यावेळी अनेक तरुण या स्वप्नाला बळी पडले, त्यांना वाटले की त्या व्यवस्थेतून समता येईल. मात्र, खरी समता फक्त संविधानाने येऊ शकते. त्या काळात अनेक तरुण माओवादी चळवळीकडे ओढले. मात्र, त्यानंतर त्यांचा सर्व स्वप्नांचा खरा चेहरा समोर आला. आज सोनू उर्फ भूपतीचं आत्मसमर्पण आपण घेतलं आहे.

# इंद्रनील नाईक गोंदियाचे नवे पालकमंत्री!

## बाबासाहेबांचा तब्येतीच्या कारणास्तव राजीनामा

मुंबई, १५ ऑक्टोबर : राज्याचे सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी तब्येतीच्या कारणास्तव गोंदियाच्या पालकमंत्रिपदाचा राजीनामा दिला असून, त्यांच्या जागी राज्यमंत्री इंद्रनील नाईक यांची नियुक्ती करण्यात आली आहे. ही घोषणा उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली वरळी येथे पार पडलेल्या जिल्हाध्यक्षांच्या बैठकीत करण्यात आली.

काही दिवसांपूर्वी नागपूर येथे पार पडलेल्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या शिबिरात खासदार प्रफुल पटेल यांनी विदर्भातील पालकमंत्र्यांवर थेट टीका केली होती. पालकमंत्री वर्षातून केवळ १५ ऑगस्ट आणि २६ जानेवारीलाच जिल्ह्यात दिसतात, असा आरोप करत त्यांनी उपस्थितांना जोरदार धक्का दिला होता. याच टीकेनंतर गोंदियाच्या पालकमंत्रिपदात फेरबदल होण्याची शक्यता वर्तवली जात होती, जी आता प्रत्यक्षात उतरली आहे.

तब्येतीमुळे पाटील यांचा राजीनामा मिळालेल्या माहितीनुसार, बाबासाहेब पाटील यांनी मंगळवारी आपल्या तब्येतीचे कारण देत गोंदियाच्या पालकमंत्रिपदाचा राजीनामा दिला. काही दिवसांपूर्वी त्यांच्या गुडघ्याचे शस्त्रक्रिया करण्यात आली होती, आणि सातत्याने पायाच्या त्रासामुळे त्यांना लांबचा प्रवास करणे कठीण जात होते. त्यामुळे त्यांनी ही जबाबदारी सोडण्याचा निर्णय घेतला.

त्यामुळे पालकमंत्रीपदाची धुरा आता इंद्रनील नाईक यांच्या हाती देण्यात आली आहे. विदर्भातीलच मंत्री असलेल्या नाईक यांना जिल्ह्यात नियमितपणे येणे शक्य होईल, अशी माहिती

# वंदे भारत स्लीपर ट्रेनच्या पहिल्या एसी लक्झरी कोचची झलक सादर

नवी दिल्ली, १५ ऑक्टोबर : इंडो-रशियन संयुक्त उपक्रम काइनेट रेल्वे सोल्युशन्सने बुधवारी राजधानीतील भारत मंडपम येथे आयोजित आंतरराष्ट्रीय रेल्वे उपकरण प्रदर्शन (आयआरईई) २०२५ मध्ये वंदे भारत स्लीपर फर्स्ट एसी कोचची डिझाइन संकल्पना सादर केली. या प्रसंगी, काइनेटचे प्रकल्प संचालक निशंक गर्ग आणि प्रकल्पाचे मुख्य औद्योगिक डिझायनर एव्हगेनी मास्लोव्ह यांनी चार-बर्थ फर्स्ट एसी कोचचे वास्तविक आकाराचे मॉक-अप मॉडेल प्रदर्शित केले.






Authorised Dealers For Bajaj Auto Ltd.: Aurangabad • Adalat Road PAGARIYA BAJAJ 02406659937 • AkashPusad PAGARIYA BAJAJ 7709366111 • Harsul Point PAGARIYA BAJAJ 7709366111 • Waluj PAGARIYA BAJAJ 6616734 Bhokardan Road Sillod ASHOK BAJAJ 8380001965 • Shendra ASHOK BAJAJ 8380025694 • Buldhana ASHOK BAJAJ • Jamkhed Navale Bajaj 9130609999, 8929643158• Jalna AMBRISH BAJAJ 8605466906• Ahmednagar Kinetic Chowk Chhatrapati Bajaj 9175142881, • Ahmednagar Savedi Naka Chhatrapati Bajaj 8087203861 • Kopargaon Shirode Bajaj 9921009952, • Rahuri Shirode Bajaj 9921009953 • Shrirampur Shirode Bajaj 9270468998 • Sangamner MALPANI BAJAJ 9850112036, 02425-2225031.

# गुळवेल : अंगणातील नैसर्गिक आरोग्य-अमृत

कृषी माहिती

गुळवेल किंवा गिलोय ही प्राचीन काळापासून ओळखली जाणारी एक महत्त्वपूर्ण औषधी वेल आहे, जिला आयुर्वेदामध्ये गुडुची किंवा अमृता म्हटले जाते. अमृतासमान औषधी गुणधर्मामुळे गुळवेलला विशेष मान्यता लाभली असून, आरोग्य टिकवण्यासाठी तिचा नियमित वापर केला जातो. गुळवेलच्या खोडामध्ये विविध जैवसक्रिय द्रव्ये मोठ्या प्रमाणात आढळतात. अँटी-ऑक्सिडंट, अँटी-इंफ्लेमेटरी आणि इम्युनोमॉड्युलेटरी गुणधर्मामुळे ही वेल रोगप्रतिकारशक्ती वाढवते.

ऋतुबदलाच्या काळात होणारी सर्दी, खोकला किंवा ताप यात गुळवेलचा काढा अत्यंत उपयुक्त ठरतो. विशेष म्हणजे, डेंग्यू, मलेरिया अथवा चिकुनगुनिया यासारख्या आजारांमध्ये शरीराला ताकद टिकवून ठेवण्यास व ताप कमी करण्यास ती मदत करते. पचनसंस्थेवर गुळवेलचा सकारात्मक परिणाम असल्याचे अनेक आयुर्वेदीय ग्रंथ व आधुनिक संशोधन सांगतात.

अपचन, भूक न लागणे, बद्धकोष्ठता आणि आम्लपित्तावर गुळवेलचा रस किंवा काढा उपयुक्त ठरतो. याशिवाय, रक्तातील साखर नियंत्रित ठेवण्याची क्षमता असल्याने गिलोय टाईप-२ मधुमेहग्रस्त रुग्णांसाठी फायदेशीर मानली जाते. यकृत आणि मुत्रपिंडाच्या कार्यक्षमतेस चालना देण्याचे गुणधर्म असल्यामुळे शरीरातील हानिकारक द्रव्ये बाहेर टाकण्यास गुळवेल उपयुक्त ठरते.

श्वसनविकारांमध्ये गुळवेल विशेष साहाय्यक ठरते. दम्यासारख्या विकारांमध्ये आराम देणे, सतत होणारा खोकला कमी करणे आणि श्वसनमार्गातील सूज कमी करण्यासाठी गिलोय मदत करते तसेच संधिवात आणि सांधेदुखीने त्रस्त रुग्णांसाठी गुळवेलचा काढा लाभदायी मानला जातो. मानसिक



आरोग्य राखण्यासाठीही ही वनस्पती महत्त्वाची आहे.

ताण-तणाव कमी करून मानसिक संतुलन टिकवण्याचे गुणधर्म गुळवेलमध्ये आहेत, त्यामुळे एकूण आरोग्य घडवण्यात तिची भूमिका महत्त्वपूर्ण ठरते. गुळवेल लागवड करणे अत्यंत सोपे आहे. ही वेल साधारणतः झाडावर किंवा दिलेल्या आधारावर सहज चढते व वेगाने वाढते. छाट कलम करून सहज लागवड करता येते. या पिकासाठी जास्तीचे खत किंवा पाणी घालण्याची आवश्यकता नसते. त्यामुळे गुळवेल ही वनस्पती शेतकऱ्यांनी आपल्या शेताच्या कडेने, घरच्या अंगणात किंवा बागेत लावावी. कमी जागेत लागवड करून कुटुंबाच्या दैनंदिन औषधी गरजा पूर्ण केल्या जाऊ शकतात. त्यामुळे ही वनस्पती प्रत्येक शेतकऱ्यांच्या अंगणात असायलाच हवी. गुळवेलचा वापर विविध प्रकारे करता येतो. ताज्या खोडाचा रस काढून सेवन करणे, खोड उकळून काढा तयार करणे, वाळवून बनवलेले चूर्ण वापरणे किंवा बाजारात सहज उपलब्ध होणाऱ्या कॅप्सूल्स व गोळ्या घेणे ही काही सोपी उदाहरणे आहेत.

तथापि, गुळवेलचे अतिसेवन टाळले पाहिजे. विशेषतः मधुमेहग्रस्त वा इतर दीर्घकालीन आजार असलेल्या रुग्णांनी डॉक्टर किंवा आयुर्वेद तज्ज्ञांचा सल्ला घेऊनच याचा वापर करावा. शेवटी असे म्हणता येईल की, कमी देखभाल, सोप्या लागवडीची पद्धत व औषधी महत्त्वामुळे गुळवेल ही वेल शेतकरी व ग्रामीण कुटुंबांसाठी औषधी अमृत ठरते. नियमित व योग्य प्रमाणात केलेले सेवन ही संपूर्ण कुटुंबाचे आरोग्य सुरक्षित ठेवण्याची नैसर्गिक गुरुकिल्ली आहे. गुळवेलला अंगणात स्थान दिल्यास छोटे-मोठे आजार टाळता येतात, आरोग्यदायी जीवनशैली वाढीस लागते आणि कुटुंब वैद्यकीयदृष्ट्या अधिक सक्षम बनते.

• पूनम वि. काकडे
• शुभम ना. ढवळे
आचार्य पदवी शोधार्थी, प्रक्रिया व अन्न अभियांत्रिकी, डॉ. पं. दे. कृ. वि., अकोला
• डॉ. मयूर पो. कराटे
सहायक प्राध्यापक, प्रक्रिया व अन्न अभियांत्रिकी कृषी अभियांत्रिकी आणि तांत्रिकी महाविद्यालय, मालेगाव

# नियोजन : रबी हंगामातील करडई लागवडीचे मार्गदर्शन



कृषी लागवड

## करडई पीकच का घ्यावे?

करडई पिकाची मुळे जमिनीत खोलवर जात असल्यामुळे ती तीन फुटांपेक्षा अधिक खोल थरातील ओलावा आणि अन्नद्रव्ये शोषून घेते. त्यामुळे अवर्षणप्रवण भागात आणि कमी पावसाच्या परिस्थितीत देखील हे पीक हमखास उत्पादन देते.

पिकाच्या पानांचा आकार पूर्ण वाढीनंतर कमी होतो व कडेने काटे येतात. त्यामुळे पानांवरील बाष्पीभवन कमी होते आणि झाडे दुष्काळातही तग धरतात. पानांवरील मेणचट थरामुळे देखील पाण्याचे बाष्पीभवन कमी होते. त्यामुळे करडई हे पीक दुष्काळी भागासाठी वरदान ठरते.

करडई पिकाला जमिनीत पुरेसा ओलावा असेल, तर अतिरिक्त पाण्याची गरज भासत नाही. टंचाईच्या काळात फक्त एक ते दोन पाणी पुरेसे असते, तर गव्हासाठी पाच-सहा पाण्यांची आवश्यकता असते. त्यामुळे एका एकर गव्हाऐवजी दोन ते तीन एकर करडई घेऊन अधिक नफा मिळवता येतो.

वारंवार गव्हाचे पीक घेतल्याने जमिनीतील वरच्या थरातील अन्नद्रव्ये संपतात, तर करडई पिकामुळे जमिनीतील खोल थरातील अन्नद्रव्यांचा कार्यक्षम वापर होतो. खरीप पिकानंतर जर रबी हंगामात दुसरे पीक घ्यायचे असेल आणि ओलावा ठराविक प्रमाणात असेल, तर करडई हे उत्तम पर्याय आहे.

### जमीन

करडईसाठी मध्यम ते भारी आणि खोल जमीन (६० सें.मी. पेक्षा जास्त खोलीची) निवडावी. जमीन पाण्याचा निचरा करणारी व ओलावा टिकवून ठेवणारी असावी. पाणी साचल्यास पिकास अपाय होतो. थोडीफार चोपण जमीनसुद्धा चालते.

### पूर्वमशागत

करडईची मुळे खोल जात असल्याने खोल नांगरट करावी. त्यानंतर कुळवाच्या ३-४ पाळ्या द्याव्यात. खरीप हंगामात ६ बाय६ मीटर अथवा १०बाय १० मीटर आकाराचे सपाट वाफे किंवा सऱ्या तयार करून हेक्टरी ६.२५ टन (१२ ते १३ गाड्या) कुजलेले शेणखत/कंपोस्ट मिसळावे.

### पेरणीचा कालावधी

करडईची पेरणी योग्य वेळी करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. लवकर पेरणी (सप्टेंबरचा पहिला पंधरवडा) केल्यास पानावरील ठिपक्याच्या बुरशीजन्य रोगामुळे नुकसान होते. उशिरा पेरणी (ऑक्टोबरचा दुसरा पंधरवडा) केल्यास माव्याचा प्रादुर्भाव वाढतो. त्यामुळे सप्टेंबरचा दुसरा पंधरवडा ते ऑक्टोबरचा पहिला पंधरवडा हा योग्य कालावधी मानला जातो. बागायती करडईची पेरणी ऑक्टोबर अखेरपर्यंत करावी.

### बियाणे व बीजप्रक्रिया

प्रति हेक्टरी १० किलो बियाणे वापरावे. पेरणीपूर्वी बियाणास २ ग्रॅम बाविस्टीन प्रति किलो या प्रमाणात प्रक्रिया करावी. त्यानंतर २५ ग्रॅम अ‍ॅझोटोबॅक्टर किंवा अ‍ॅझोस्पिरिलम प्रति किलो बियाणे वापरल्यास नत्र स्थिरीकरण होऊन उत्पादन वाढते. २५ ग्रॅम पी.एस.बी. (फॉस्फरस विरघळवणारे जिवाणू) प्रति किलो बियाणे वापरल्यास अधिक फायदा होतो.

**पेरणीचे अंतर** : दोन ओळींमधील अंतर ४५ सें.मी. आणि दोन रोपांमधील अंतर २० सें.मी. ठेवावे.

**खतांच्या मात्रा** : कोरडवाहू पिकासाठी : ५० किलो नत्र (११० किलो युरिया) आणि २५ किलो स्फुरद (१५६ किलो सिंगल सुपर फॉस्फेट) प्रति हेक्टरी.

**थोड्या पाण्याची सोय असलेल्या पिकासाठी** : ७५ किलो नत्र (१६३ किलो युरिया) व ३७.५ किलो स्फुरद (२३५ किलो सिंगल सुपर फॉस्फेट) प्रति हेक्टरी.

### विरळणी व आंतरमशागत

पेरणीनंतर १०-१२ दिवसांनी जोमदार रोपांमध्ये २० सें.मी. अंतर ठेवून विरळणी करावी. गरजेनुसार खुरपणी व कोळपणी करून शेत स्वच्छ ठेवावे.

ओलावा टिकवण्यासाठी पेरणीनंतर तिसऱ्या आठवड्यात दातेरी सायकल कोळप्याने कोळपणी करावी.

### संरक्षित पाणी

करडई अवर्षण प्रतिकारक पीक असल्याने पाणी कमी लागते. मध्यम ते भारी जमिनीत पुरेसा ओलावा असल्यास पाणी देण्याची आवश्यकता नसते. पाणी देण्याची सोय असल्यास पेरणीनंतर ३५ ते ४० दिवसांनी आणि फुलोऱ्यात (५५ ते ६० दिवसांनी) पाणी द्यावे.०

'सायकॉसिल' (१००० पीपीएम) वाढप्रतिबंधकाची फवारणी फुलोऱ्याच्या अवस्थेत (१ लिटर सायकॉसिल ५०० लिटर पाण्यात) केल्यास उत्पादन वाढते.

### काढणी

करडई पीक १३० ते १३५ दिवसांत तयार होते. बोंडे व पाने पिवळी पडल्यावर सकाळी कापणी करावी, कारण त्या वेळी आर्द्रता जास्त असल्याने काट्यांचा त्रास कमी होतो.

वाळल्यानंतर बडवणी करून धान्य साठवावे. एकात्मिक काढणी व मळणी यंत्राचा वापर केल्यास वेळ व खर्च दोन्ही कमी होतात आणि स्वच्छ धान्य मिळते.

### उत्पादन

**मध्यम जमिनीत** : १२ ते १४ क्विंटल/हेक्टरी

**भारी जमिनीत** : १४ ते १६ क्विंटल/हेक्टरी


**बागायती पिकासाठी** : २० ते २२ क्विंटल/हेक्टरी

### सुधारित व संकरित वाण

भीमा, एस.एस.एफ. ६५८, एस.एस.एफ. ७०८, पी.बी.एन.एस.-४०, फुले चंद्रभागा (एस.एस.एफ.-७४८), पी.बी.एन.एस.-१२.

• प्रा. संजय बडे
सहायक प्राध्यापक, कृषी विद्या विभाग दा. पा. कृ. महाविद्यालय, दहेगाव, छत्रपती संभाजीनगर

# मान्सून माघारीच्या तयारीत



हवामान अंदाज

शेतकरी मित्रांनो या आठवड्यात पावसाचं सावट असल्याने कापणीला आलेल्या पिकांचे नियोजन करा.

मागील आठवड्यात पावसाने दिलेल्या उसंतीच्या अंदाजाने बऱ्याच शेतकरी मित्रांनी काढणीला आलेल्या पिकांची विल्हेवाट लावली. आता बघूया पुढील अंदाज.

नैऋत्य मान्सून माघार घेण्याची रेषा आता कारवार, कलबुर्गी, निजामाबाद, कांकेर केओन्झरगढ, सागर बेट, गुवाहाटी आणि कर्नाटकच्या काही भागांमधून जात आहे. महाराष्ट्र आणि मध्यप्रदेशमधून मान्सून माघारी फिरला. ओडिशा, छत्तीसगड, तेलंगणामधून माघारी फिरण्यासाठी अनुकूल परिस्थिती आहे.

बंगालच्या नैऋत्य उपसागरावर आणि लगतच्या दक्षिण तामिळनाडू किनारपट्टीवर समुद्रसपाटीपासून ५.८ किमी उंचीवर वरच्या हवेचे परिवलन कायम आहे. पश्चिम मध्य अरबी समुद्रावर वरच्या हवेचे चक्रीवादळ पसरलेले आहे.

खाली दक्षिणेला ईशान्य मान्सून ऑनसेट झालाय. याचा प्रभाव म्हणून राज्यात हा आणि पुढील आठवडा गडगडाटी, संमिश्र पावसाची स्थिती बघावयास मिळेल.

### विदर्भ साप्ताहिक अंदाज

**१५-१७ ऑक्टोबर** : संपूर्ण विदर्भात पावसास अनुकूल ढगाळ वातावरण, गडगडाटासह स्थानिक वातावरणामध्ये पाऊस.

**१८-२२ ऑक्टोबर** : संपूर्ण विदर्भात ढगाळ परिस्थिती. पाऊस विखुरलेल्या स्वरूपात स्थानिक वातावरणात. धुई-धुके वाढणार, अधूनमधून सूर्यप्रकाश. रात्रीला गारवा.

### उत्तर महाराष्ट्र ( नाशिक, धुळे नंदुरबार, जळगाव)

**१५-२२ ऑक्टोबर** : कमी दाब प्रभाव विशेष जाणवणार नाही. पाऊस विखूरलेल्या स्वरूपात, दिवसा तापमान वाढ, रात्रीला गारवा.

### पश्चिम महाराष्ट्र आणि मराठवाडा

**१५-२२ ऑक्टोबर** : दक्षिणेकडील कमी दाब प्रभावामुळे नगर, पुणे, संभाजीनगर, बीड, सातारा येथे मध्यम ते जोरदार पाऊस शक्यता. इतर भागात दुपारनंतर स्थानिक भागात शक्यता.

शेतकऱ्यांना सूचना : ज्यांची पिके कापणीला आली आणि कापून ठेवली, त्यांनी दुपारी झाकून ठेवण्याची व्यवस्था करावी. पुढील आठवड्यात २७ ऑक्टोबर ते २ नोव्हेंबर पुन्हा पाऊस असल्याने नियोजन ठेवा.

• अभिषेक सु. खेरडे
हवामान अभ्यासक, अचलपूर

# ग्रीन क्रेडिट : पर्यावरणासाठी बाजाराभिमुख प्रोत्साहन

लागवड तंत्रज्ञान

ग्रीन क्रेडिट हा पर्यावरणपूरक उपक्रमांना पुरस्कार देणारा, मोजता येणारा व व्यापारी वापरासाठी तयार केलेला एक नवकल्पनाशील साधन आहे. भारत सरकारने १२ ऑक्टोबर २०२३ रोजी ग्रीन क्रेडिट नियम २०२३ अधिसूचित करून हा कार्यक्रम सुरू केला. हा उपक्रम लोक, समुदाय, उद्योग आणि शासन-संबंधी एककांना वृक्षलागवड, जलसंधारण, कचरा व्यवस्थापन, ऊर्जा बचत व जैवविविधता संवर्धन यांसारख्या कृतींना प्रोत्साहन देण्यासाठी बनवण्यात आला आहे.

### ग्रीन क्रेडिट म्हणजे काय? संकल्पना व हेतू

ग्रीन क्रेडिट म्हणजे पर्यावरण-अनुकूल कृती केल्याबद्दल दिले जाणारे प्रमाणित क्रेडिट आहे. हे क्रेडिट परिमाणीकृत, सत्यापित आणि सरकारी नोंदीवर नोंदणीकृत असतात. नंतर प्रदूषणकर्त्या किंवा अन्य घटकांनी खरेदी करून त्यांच्या पर्यावरणीय जबाबदाऱ्या भागवता येतात किंवा इतर पर्यावरण-उपक्रमांसाठी निधी म्हणून वापरता येतात. मुख्य उद्दिष्ट म्हणजे लोकांना, शेतकरी-गटांना, स्वयंसेवी संस्थांना आणि खाजगी उद्योगांना 'पर्यावरणात्मक सेवा' प्रदान केल्याबद्दल आर्थिक व मान्यताप्रदान करणारे प्रोत्साहन देणे. या नियमांतर्गत कार्यक्रमाचे मंच आणि पोर्टल सरकारने विकसित केले आहे.

### ग्रीन क्रेडिट अंतर्गत येणारे उपक्रम

सरकारी नियमन व मार्गदर्शक तत्त्वांनुसार ग्रीन क्रेडिटसाठी विविध क्षेत्र निर्धारित करण्यात आलेले आहेत. यात मुख्यतः समाविष्ट आहे. वृक्षलागवड व वनीकरण

- जलसंधारण व जलस्रोत पुनर्संचय
- कचरा व्यवस्थापन आणि पुनर्वापर
- ऊर्जा कार्यक्षमतेचे उपाय व नवीनीकरणीय ऊर्जा
- हवामान प्रदूषण घटविणे
- शाश्वत शेती पद्धती
- जैवविविधता संवर्धन

### ग्रीन क्रेडिट कार्यक्रमाच्या कार्यान्वयनाची पद्धती


यात अशी प्रक्रिया समाविष्ट आहे, जिथे व्यक्ती आणि कॉर्पोरेशन दोघांनाही 'निकृष्ट' मानल्या जाणाऱ्या जंगलांच्या पुनर्संचयनाच्या प्रयत्नांमध्ये आर्थिक योगदान देण्याची संधी दिली जाते.

पर्यावरण मंत्रालयाच्या अंतर्गत असलेल्या स्वतंत्र युनिट, इंडियन कौन्सिल ऑफ फॉरेस्ट्री रिसर्च अ‍ॅण्ड एज्युकेशनच्या अर्जांद्वारे हे सुलभ केले जाते. वन पुनर्संचयनासाठी निर्देशित केलेल्या आर्थिक योगदानाची देखरेख करण्यासाठी इंडियन कौन्सिल ऑफ फॉरेस्ट्री रिसर्च अ‍ॅण्ड एज्युकेशन हे जबाबदार आहे, जे नंतर संबंधित राज्य वन विभागांद्वारे अंमलात आणले जाते. वनीकरणाच्या प्रयत्नांनंतर दोन वर्षांच्या कालावधीनंतर इंडियन कौन्सिल ऑफ फॉरेस्ट्री रिसर्च अ‍ॅण्ड एज्युकेशनने लागवड केलेल्या झाडांचे मूल्यांकन करते.

यशस्वी मूल्यांकनानंतर प्रत्येक झाडाचे मूल्यांकन एका 'ग्रीन क्रेडिट'वर केले जाते. हे मिळवलेले ग्रीन क्रेडिट्स निधी देणाऱ्या संस्थेद्वारे काही प्रकारे वापरले जाऊ शकतात : प्रथम, ते वन कायद्यांद्वारे वनजमिनीचे वनीकरण नसलेल्या कारणांसाठी करण्याच्या समस्येची भरपाई करण्यासाठी वनीकरणासाठी तुलनात्मक क्षेत्रफळ प्रदान करून त्यांच्या अनुपालन यंत्रणेचे काम करू शकतात. पर्यायीरीत्या, पर्यावरणीय, सामाजिक आणि प्रशासन मानकांचे पालन करण्यासाठी किंवा कॉर्पोरेट सामाजिक जबाबदारी दायित्वे पूर्ण करण्यासाठी या क्रेडिट्सचा वापर मेट्रिक म्हणून केला जाऊ शकतो.

### ग्रीन क्रेडिट प्रोग्राममध्ये कार्बन क्रेडिट्सचाही समावेश आहे का?

ग्रीन क्रेडिट प्रोग्राम कार्बन क्रेडिट ट्रेडिंग




स्कीम, २०२३ अंतर्गत प्रदान केलेल्या कार्बन क्रेडिट्सपासून स्वतंत्रपणे चालतो, जो २००१ च्या ऊर्जा संवर्धन कायद्याद्वारे नियंत्रित केला जातो.

कार्बन क्रेडिट्स, ज्यांना कार्बन ऑफसेट असेही म्हणतात. हे असे परवाने आहेत, जे मालकाला विशिष्ट प्रमाणात कार्बन डायऑक्साईड किंवा इतर हरितगृह वायू उत्सर्जित करण्याची परवानगी देतात. एका क्रेडिटमुळे १ टन कार्बन डायऑक्साईड किंवा इतर हरितगृह वायू उत्सर्जित होऊ शकतात. पर्यावरणीय क्रियाकलाप ज्यामुळे ग्रीन क्रेडिट्स निर्माण होतात, त्यांचे हवामान सह-फायदे असू शकतात, जसे की कार्बन उत्सर्जन कमी करणे किंवा काढून टाकणे, ज्यामुळे ग्रीन क्रेडिट्स व्यतिरिक्त कार्बन क्रेडिट्सचे संपादन होण्याची शक्यता असते.

### ग्रीन क्रेडिट कसे मिळते? नोंदणी, मोजमाप, पडताळणी

ग्रीन क्रेडिट मिळवण्याची मुख्य चार पायरी अशी आहे. (१) प्रकल्पाची नोंदणी जीसीपी पोर्टलवर, (२) बेसलाईन व लक्ष्य निश्चित करणे, (३) क्रियान्वयनानंतर परिणामांचे मोजमाप व अहवाल तयार करणे आणि (४) तृतीय-पक्ष पडताळणी. नियमांतर्गत क्रेडिटांची गणना व वाटप या उद्देशाने ठरवलेल्या पद्धतीच्या दस्तावेजांनुसार केली जाते. उदाहरणार्थ, वृक्षलागवडीसाठी वनस्पती टिकाव, झाडांची वाढ, बंदिस्त क्षेत्राची स्थिती इत्यादी निकष मोजले जातात. प्रमाणित झाल्यावर क्रेडिटला सरकारी रजिस्ट्रीमध्ये नोंद होते व ते ट्रेडिंगसाठी उपलब्ध होऊ शकते.

### बाजारपेठ आणि ट्रेडिंग कसे काम करेल?

ग्रीन क्रेडिट हे बनावट 'विकण्यासाठी' देण्यात न आलेल्या साधनांपेक्षा वेगळे आहेत. त्यांचे आर्थिक मूल्य असू शकते आणि ते वर नमूद केलेल्या सरकारी प्लॅटफॉर्मवर नोंदणीकृत करणे अनिवार्य आहे. नियमनाने हेही स्पष्ट केले आहे की, काही उद्योगांना त्यांच्या अनिवार्य पर्यावरणीय अनुपालनाबरोबरच स्वेच्छेने अतिरिक्त पर्यावरणीय क्रियाकलाप करून ग्रीन क्रेडिट मिळवता येतील आणि ते बाजारात विकू शकतील. हे एक प्रकारे बाजाराभिमुख प्रोत्साहन आहे, जे निजी क्षेत्राला पर्यावरणीय योगदान वाढवण्यासाठी प्रेरित करेल.

### ग्रीन क्रेडिटचे फायदे काय मिळणार?

- **स्थानीय समुदायांना थेट फायदे**: जलसंधारण, हरित क्षेत्र निर्मिती आणि कचरा व्यवस्थापनामुळे स्थानिक जीवनमान सुधारते.
- **नवीन आर्थिक प्रवाह** : शेतकरी, स्वयंशिक्षित गट व मायक्रो-प्रोजेक्ट्सना अतिरिक्त उत्पन्नाची संधी.
- **उद्योगांसाठी पर्यावरणीय धोरणांची अंमलबजावणी सुलभ** : उद्योगांना स्वच्छ-उत्पादन संकेतांक वाढवण्यासाठी क्रेडिट खरेदी करून त्यांच्या ईएसजी आकडे कापता येतात.
- **राष्ट्रीय पर्यावरणीय उद्दिष्टांची पूर्तता** : वृक्षलागवड व जलसंधारणाद्वारे कार्बन शोषण व भूमी पुनरुज्जीवनाद्वारे दीर्घकालीन फायदा होतो.

• धीरज माधव कदम
• निशिगंधा सतीश चव्हाण
• डॉ. प्रवीण हिम्मतराव वैद्य
मृद विज्ञान विभाग, वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी.

# आंब्याच्या रोपवाटिकेतील मर रोगाचे जैविक नियंत्रण

आंब्याची लागवड भारतात हजारो वर्षांपासून केली जात आहे. तो फळांचा राजा असून, सर्वात लोकप्रिय फळ पीक म्हणून त्याची ख्याती आहे. जगात उत्पादित होणाऱ्या एकूण उष्ण कटिबंधीय फळांपैकी सुमारे ५० टक्के फळे आंब्याची असतात. आंबा उत्पादनात भारताचा जगात जवळपास निम्मा वाटा असून, त्यानंतर इंडोनेशिया, चीन आणि मेक्सिको या देशांचा क्रम लागतो.

### आंब्याच्या रोपवाटिकेतील प्रमुख रोग

आंब्याच्या रोपांना मागील ३-४ वर्षांपासून राज्यातील अनेक रोपवाटिकांमध्ये बुरशीजन्य रोगकारकांमुळे मुळकुज (रूट रॉट) रोगाचा तीव्र फटका बसलेला आहे. यात रोपवाटिकेतील रोपटी (रूट स्टॉक) व कलमे (ग्राफ्ट) दोन्हींचे नुकसान होऊन ती कोमेजून मरतात. उपलब्ध असलेल्या शोधनिबंधानुसार आंब्यावर ५० हून अधिक बुरशीजन्य रोग नोंदवले गेले आहेत, त्यापैकी मुळकुज हा रोग विविध बुरशींच्या जातींमुळे होतो.

आंब्याच्या मूळ रोपे (रूट स्टॉक) व कोयीमध्ये मुळकुज रोगाची लक्षणे खालीलप्रमाणे दिसून येतात :

- प्राथमिक अवस्थेत संसर्ग झाल्यास बी (आंब्याची कोय) उगवत नाही, उगवली तरी रोपटी कोमेजून मरतात.
- सुरुवातीची संसर्ग लक्षणे साधारणपणे दिसत नाहीत, पण मातीच्या पृष्ठभागाजवळ किंवा थोडे खाली खोडावर गडद तपकिरी डाग तयार होतात.
- प्रथम दृश्यमान लक्षणे म्हणजे पानांचा प्रगतीशील पिवळसरपणा व कोमेजणे.
- बुरशी कोयभोवती व मातीच्या पृष्ठभागावर पांढऱ्या धाग्यासारख्या व भरपूर प्रमाणात मायसेलियम (बुरशीचे तंतू) तयार करते. मायसेलियमवर समसमान आकाराचे स्क्लेरोशिया (बुरशीचे फळे) तयार होतात. अपरिपक्व अवस्थेत हे गोलसर व पांढरे असून, नंतर गडद तपकिरी ते काळे होतात. पूर्ण परिपक्व स्क्लेरोशिया मोहरीच्या दाण्यांसारखे दिसतात.
- एकदा संसर्ग झाल्यानंतर रोपे अत्यंत संवेदनशील होऊन पटकन मरतात.
- संक्रमित उती मऊ पडून फिकट तपकिरी रंगाचे दिसतात.



### रोगकारक बुरशी

स्क्लेरोसिअम रॉल्फसाय ही जमिनीतून झपाट्याने पसरणारी बुरशी आहे, जी विविध फळपिकांना हानी पोहचवते. ही बुरशी किमान १०० कुळातील सुमारे ५०० प्रजातींवर आढळते. तृणधान्ये, कडधान्ये व वेलवर्गीय पिके ही सर्वांत जास्त बळी पडणारी पिके आहेत तसेच अनेक तणांमध्येही ही बुरशी जिवंत राहते.

संक्रमणाचा प्रकार बघितला तर ही मुख्यतः झाडाच्या खोडावर हल्ला करते. मात्र, अनुकूल हवामान व मातीतील ओलावा असल्यास मुळे, फळे, देठ, पाने आणि फुलांवरही संसर्ग होतो. हा रोग जमिनीतून पसरतो. बुरशी मातीमध्ये अनेक वर्षे टिकून राहू शकते. प्रामुख्याने पावसाळ्यात मुळकुज जास्त प्रमाणात दिसतो. कमी दर्जाच्या व गरासह राहिलेल्या कोयी पावसाळ्यात मोकळ्या जागेत लावल्यास संसर्ग जास्त प्रमाणात होतो.

### आंब्याच्या कलमांमध्ये मर रोग

केशर या जातींच्या एका महिन्याच्या आंबा कलमांमध्ये तीव्र प्रमाणात मृत्यू दिसून आला. कलमांचा मृत्यूदर सुमारे ३० टक्क्यांपर्यंत नोंदवला गेला असून, सर्व जाती या रोगास बळी पडतात. हा रोग आंब्याच्या नर्सरी व कलम उत्पादनात अतिशय गंभीर समस्या ठरत असून, यावर प्रभावी व्यवस्थापन उपाययोजना करणे अत्यावश्यक आहे.

### लक्षणे :

- कलमे अचानक कोमेजतात व टोकावरील नवीन पालवी वाळून जाते.
- जमिनीलगतचा खोडाचा भाग सडतो व मुख्य मुळे कुजतात.
- दुय्यम मुळांचा रंग बदलून ती मरतात.
- यामुळे लक्षणे दिसू लागल्यानंतर ४ ते ६ दिवसांत संपूर्ण कलम मरते.
- संक्रमित कलम वरून ओढले असता मातीबाहेर सहज निघून येते.

### रोगकारक बुरशी

मॅक्रोफोमिना फॅजियोलीना आणि रायझोक्टोनिया सोलानी हे दोन रोगकारक बुरशी सतत कलमांच्या मृत्यूशी संबंधित आढळून येतात. कृषी महाविद्यालय, नंदुरबार येथे केलेल्या रोगनिदान अभ्यासातून या बुरशीचाच प्रमुख सहभाग असल्याचे निश्चित करण्यात आले.

मॅक्रोफोमिना फॅजियोलीना ही जमिनीतून पसरणारी बुरशी आहे. सुमारे ५०० पेक्षा जास्त वनस्पतींच्या प्रजातींमध्ये मुळे व खोडाचा खालचा भाग संक्रमित करू शकते व जगभर व्यापक प्रमाणात आढळते. ही बुरशी खूपच घातक असून, मुळकुज, बियाणे अंकुरण्याआधीच मरण पावणे अशा प्रकारची लक्षणे विविध पिकातील रोपांमध्ये दिसून येतात.

या बुरशीत मायक्रोस्क्लेरोशिया तयार होतात, जी यजमानाच्या मुळे व खोडात बनतात व अनेक वर्षे मातीम जिवंत राहतात. मायक्रोस्क्लेरोशिया काळ्या रंगाची, गुळगुळीत, गोलसर, लांबट किंवा अनियमित आकाराची असतात. प्रयोगशाळेत कृत्रिम अन्नावर वाढवलेली बुरशी पांढऱ्यापासून तपकिरी किंवा करड्या रंगापर्यंत बदलते व वय वाढल्यास गडद होते.

रायझोक्टोनिया सोलानी ही सुद्धा एक महत्त्वाची, मातीत वास्तव्यास असलेली रोगकारक बुरशी असून, ती बागायती व पडीक जमिनीत विकसित होते. भात, टोमॅटो, सोयाबीन, भूईमूग, पपई, काकडी, वांगी, मका व इतर महत्त्वाच्या पिकांना बाधित करते. विशेषतः सोयाबीन पिकात जागतिक पातळीवर मोठे आर्थिक नुकसान करते. एकूणच, मॅक्रोफोमिना फॅजियोलीना व रायझोक्टोनिया सोलानी या दोन्ही बुरशी आंब्यासह अनेक पिकांमध्ये मुळकुज व मर रोग निर्माण करणाऱ्या प्रमुख रोगकारकांपैकी आहेत आणि त्यांचे व्यवस्थापन नर्सरी तसेच शेत पातळीवर फार महत्त्वाचे ठरते.

### रोगासाठी अनुकूल परिस्थिती

- **निकृष्ट दर्जाच्या कोयी** : योग्य प्रकारे स्वच्छता व वाळवणी न केल्यास संसर्गाचा धोका वाढतो.
- **संक्रमित मातीत लागवड** : आधीच आजारी असलेल्या मातीत कोयी, रोपे किंवा कलमे लावल्यास रोग पटकन पसरतो.
- **अपुरा निचरा** : रोपवाटिकेत पाण्याचा निचरा न झाल्यास माती ओलसर राहते, ज्यामुळे बुरशीच्या वाढीस पोषक वातावरण मिळते आणि मुळकुज/ मर रोग वाढतो.


### रोगाचे एकात्मिक व्यवस्थापन : प्रतिबंधात्मक उपाययोजना

- स्वच्छ व नीट वाळवलेल्या आंब्याच्या कोयींचा वापर करून मूळ रोपे (रूट स्टॉक) तयार करावी.
- रोगमुक्त क्षेत्राची निवड करून रोपे तयार करावीत.
- योग्य प्रमाणात पाणी द्यावे, पाणी साचणे टाळावे.
- रोपवाटिका मिश्रणासाठी नीट कुजलेले शेणखत वापरावे.
- कलम लागवडीसाठी रोगमुक्त मातीचे मिश्रण वापरावे.
- मागील हंगामातील जुनी माती वापरू नये.
- उन्हाळ्यात मातीचे सोलरायझेशन करून रोगकारकांची संख्या कमी करावी.
- रोपे लावण्यापूर्वी मातीला ट्रायकोडर्मा या जैविक बुरशीनाशकाची पावडरचा ५० ग्रॅम/५० किलो माती या प्रमाणात उपचार करावा.
- लागवडीवेळी सुडोमोनास फ्लरॉसेंस किंवा बॅसिलसच्या पावडर-आधारित फॉर्म्युलेशनचा १० ग्रॅम/कलम या प्रमाणात वापर करावा.

### उपचारात्मक उपाययोजना

सामान्यतः असे दिसून आले आहे की, रासायनिक बुरशीनाशकांचा भडिमार केल्यामुळे ते आता या मातीजन्य रोगांवर फारसे परिणामकारक राहिलेले नाहीत तसेच त्यांचा अतिवापर मित्र सूक्ष्मजीवांचे वावर कमी करतो. म्हणून जैविक नियंत्रण घटकांचा वापर प्रभावी मानला जातो.

- कलम लावल्यानंतर प्रत्येक कलमाला ट्रायकोडर्माच्या पावडर-आधारित फॉर्म्युलेशनचा ५ ग्रॅम /कलम या प्रमाणात वापर करावा.




- जर कलमांमध्ये रोग दिसू लागला, तर ट्रायकोडर्मा, सुडोमोनास फ्लरॉसेंस किंवा बॅसिलस यांचा २.५ ग्रॅम/रोप या प्रमाणात पाण्यात मिसळून द्रावण तयार करून आळवणी करावी. रोगाचा संसर्ग खूप तीव्र असल्यास वरील उपचार १५-२० दिवसांनी पुन्हा करावा.

• डॉ. भूषण बिरारी
• डॉ. संदीप वाघ
• निखिल बोकडे
कृषी पदव्युत्तर, वनस्पतीरोगशास्त्र विभाग, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला

• संयोजक : निखिल रमेश यादव, कृषी पदव्युत्तर- ८४०८९१२७०६ •

# नागदमध्ये निर्घृण हत्या; पाच ताब्यात, दोन फरार

तभा वृत्तसेवा

कन्नड: दि.१५ ऑक्टोबर – तालुक्यातील नागद गावातील शुभम रणवीरसिंग राजपूत (वय २५) या तरुणाची मंगळवारी रात्री साडेआठ वाजण्याच्या सुमारास धारदार हत्याराने हत्या करण्यात आली. ग्रामपंचायतीकडे जाणाऱ्या रस्त्यावरील डीपीजवळ ही घटना घडली. गंभीर जखमी अवस्थेत त्याला चाळीसगाव येथील खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले असता डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले.



युवकांमध्ये झालेल्या किरकोळ वादातून ही घटना घडल्याचे समोर आले आहे. घटनेनंतर गावात तणाव निर्माण झाल्याने पोलिसांनी बंदोबस्त वाढवून एसआरपी, महिला पोलिस आणि दंगाकाबू पथक तैनात केले आहे.घटनेची माहिती मिळताच मंगळवारी रात्री सहाय्यक पोलिस निरीक्षक डॉ.रामचंद्र पवार घटनास्थळी दाखल झाले होते,

दि.१५ रोजी संतप्त युवकांनी रास्तारोको आंदोलन सुरू केले होते. ग्रामस्थ व ज्येष्ठ नागरिकांनी समजावून सांगितल्यानंतर रस्ता खुला करण्यात आला पोलिस चौकीत युवकांनी निवेदन सादर करून आरोपींवर कठोर कारवाईची मागणी केली.

या प्रकरणात एकूण सात आरोपी आहे. अमोल दशरथ निकम, सचिन दशरथ निकम, शंकर दशरथ निकम, ऋषी गोविंद निकम, अविनाश गोविंद निकम, बंडू शिवसिंग राजपूत, व सतीश संतोष राजपूत सर्व राहणार प्रेमनगर नागद. आरोपींनी धारदार लोखंडी हत्याराने शुभमच्या मानेवर वार करून त्याला गंभीर जखमी केले होते.अमोल निकम याचे एका महिलेकडे वारंवार जाणे-येणे होत होते. शुभमने या बाबत आक्षेप घेतल्याने अमोल व त्याच्या सहकाऱ्यांनी रागातून ही हत्या केल्याचे प्राथमिक तपासात स्पष्ट झाले आहे.

या घटनेमुळे नागद व परिसरात हळहळ व्यक्त होत असून आरोपींवर कडक कारवाई करण्याची मागणी ग्रामस्थांकडून करण्यात आली आहे. शुभमच्या पश्चात आई-वडील असा परिवार

## अभय भुतडा फाउंडेशनतर्फे महाराष्ट्रातील पूरग्रस्तांसाठी सीएम रिलीफ फंडास ५ कोटी रुपयांची देणगी

मुंबई : एकतेचा आणि करुणेचा सामर्थ्यशाली संदेश देत, अभय भुतडा फाउंडेशनने महाराष्ट्रातील पुरग्रस्त भागांना मदत करण्यासाठी ८ कोटींचे योगदान जाहीर केले आहे. यापैकी ५ कोटींची रक्कम महाराष्ट्र मुख्यमंत्री सहाय्यता निधीस देण्यात आली असून, राज्यभरातील भीषण पुरानंतर तत्काळ मदत आणि पुनर्वसनाच्या कामांसाठी ही मदत उपयोगात आणली जाणार आहे.उद्योजक, परोपकारी आणि अभय भुतडा फाउंडेशनचे अध्यक्ष सीए अभय भुतडा यांनी स्वतः मुंबईत महाराष्ट्र राज्याचे माननीय मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांच्याकडे ५ कोटींचा धनादेश सुपूर्द केला. या मदतीबद्दल मुख्यमंत्री फडणवीस यांनी मनःपूर्वक कृतज्ञता व्यक्त केली आणि राज्य सरकारच्या पुनर्वसन उपक्रमांना गती देण्यासाठी या योगदानाचे महत्त्व अधोरेखित केले.

## एआय -शक्तीशाली उत्सव मोहीम सादर

छत्रपती संभाजीनगर – सीग्रामच्या रॉयल स्टॅग पॅकेज्ड ड्रिंकिंग वॉटरने त्यांच्या सेलिब्रेटलार्ज – हम है जनरेशन लार्ज, हमारा हर सेलिब्रेशन लार्ज या उत्सवी मोहिमेची घोषणा केली. सण हे युवा पिढीसाठी त्यांच्या अनोख्या स्टाईल आणि उर्जेने उत्साह भरण्यासाठी आणि येणाऱ्या वर्षांसाठी आठवणी जपून ठेवण्यासाठी आणि अर्थातच, लाइव्ह इट लार्ज करण्यासाठी एक उत्तम संधी आहेत. जनरेशन लार्जला प्रेरणा देण्याच्या ब्रँडच्या तत्वज्ञानावर आधारित, या वर्षीच्या मोहिमेत एक तंत्रज्ञान-अग्रेसर, एआय नेतृत्वाखालील अनुभव सादर केला जातो जो संस्कृतीत खोलवर रुजलेला असतो आणि ग्राहकांना उत्सवाच्या केंद्रस्थानी ठेवतो आणि ब्रँडच्या लिव्ह इट लार्ज तत्वज्ञानासह तरुण पिढीच्या इच्छेला सुंदरपणे एकत्रित करतो. या मोहिमेच्या केंद्रस्थानी एक उपक्रम आहे जो भारतीय सणांच्या शुभेच्छा एकमेकांना देण्याची पद्धत पुन्हा जागी करतो.

## जबाबदार रस्ते वापरासाठी जनजागृती २,३०० हून अधिक सहभागींचा सहभाग

जालना, १४ ऑक्टोबर २०२५: होंडा मोटरसायकल अँड स्कूटर इंडिया ने आपली रस्ता सुरक्षा जनजागृती मोहीम जालना, महाराष्ट्र येथे राबवली. भारतातील तरुणांमध्ये जबाबदार वाहतूक वर्तन निर्माण करण्याच्या आपल्या देशव्यापी प्रयत्नांना यामुळे आणखी बळ मिळाले. या उपक्रमात पोदार इंटरनॅशनल स्कूल आणि श्री सरस्वती भुवन माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय येथील २,३०० हून अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला, ज्याचा उद्देश पुढच्या पिढीला जबाबदार रस्ते वापरकर्ते म्हणून घडवणे हा होता.संवादी सत्रे, प्रायोगिक शिक्षण मॉड्युल्स आणि रुचकर चर्चांद्वारे, विद्यार्थ्यांनी केवळ सुरक्षित वाहनचालक आणि पादचारी शिस्तीचे मूलभूत नियमच नाही, तर भावी पिढी घडवण्यात आपली मोठी भूमिका काय असू शकते हेही जाणून घेतले.

## आयएफएटी इंडिया २०२५ मुंबईत सुरू

मुंबई: पाणी, सांडपाणी, घनकचरा आणि पुनर्वापर उपायांसाठी देशातील सर्वात मोठा व्यापार मेळा, खत्रू-ढ इंडियाची १२ वी आवृत्ती आज मुंबईतील बॉम्बे एक्झिबिशन सेंटर ) येथे सुरू झाली, ज्यामुळे शाश्वततेवर आधारित वाढ आणि आंतरराष्ट्रीय सहकार्यासाठी एक मजबूत सूर निर्माण झाला. भव्य उद्घाटन समारंभाला दिया मिर्झा आणि श्रीकांत शिंदे, केंद्र आणि राज्य सरकारी विभाग, आंतरराष्ट्रीय व्यापार मिशन आणि उद्योग संघटनांमधील वरिष्ठ मान्यवर उपस्थित होते. उद्घाटनप्रसंगी बोलताना, दिया मिर्झा यांनी भारतासाठी स्वच्छ, अधिक शाश्वत भविष्य घडविण्यासाठी सामूहिक कृती आणि नवोपक्रम-चालित भागीदारीची गरज यावर भर दिला. आयएफएटी इंडिया यावर भर देते की शाश्वतता ही एक ट्रेंड नाही, तर आपण सर्वांनी सामायिक केली पाहिजे अशी जबाबदारी आहे, ती म्हणाली. हा व्यापार मेळा एकाच छताखाली कल्पना, नवोपक्रम आणि हेतू कसे एकत्र आणतो हे पाहणे प्रेरणादायी आहे.

## स्वयं-सहायता समूहांच्या माध्यमातून ग्रामीण महिला उद्योजिकांना दिले सबलीकरण

बंगळुरू:टोयोटा किर्लोस्कर मोटर (टीकेएम) ने आज आपल्या कर्मचारी स्वयंसेवक कार्यक्रम आय- सीएआरई (आय,कम्युनिटी ॲक्शन टू रीच एव्हरीवन ) अंतर्गत ३४ व्या उपक्रमाच्या यशस्वी पूर्णतेची घोषणा केली. या उपक्रमाद्वारे टीकेएमने समाजावर सकारात्मक प्रभाव निर्माण करण्याच्या आपल्या प्रवासातील आणखी एक महत्त्वपूर्ण टप्पा गाठला आहे.टीकेएमच्या सतत सुधारणा (कैझेन),लोकांबद्दल आदर आणि शाश्वततेबद्दल बांधिलकी या मूलभूत मूल्यांशी सुसंगत असलेला हा उपक्रम, कंपनीच्या समुदाय सशक्तीकरण आणि समावेशक विकासाच्या उद्दिष्टांचे प्रतिबिंब आहे. या माध्यमातून टीकेएमने नवकल्पक आणि पर्यावरणपूरक उपायांच्या साहाय्याने समाजहिताचे कार्य अधिक बळकट केले आहे.

## प्री-ओन्ड कार नेटवर्कचा विस्तार

मुंबई: :टोयोटा किर्लोस्कर मोटर (टीकेएम) ने आपल्या प्री-ओन्ड कार व्यवसायाचा विस्तार करत *टोयोटा मोबिलिटी सोल्यूशन्स अँड सर्व्हिसेस इंडिया प्रायव्हेट लिमिटेड (टीएमएसएस)* ची चंदीगडमध्ये सुरुवात केली आहे. टीएमएसएस ही टीकेएमची पूर्ण मालकीची सहाय्यक कंपनी आहे, ज्याचे उद्दिष्ट भारतातील वापरलेल्या वाहनांच्या बाजारात पारदर्शकता, गुणवत्ता, सेवा आणि ग्राहक अनुभव यांचे नवे मानक प्रस्थापित करणे आहे.चंदीगडमधील या नवीन उपक्रमासह टोयोटाने महानगरांपलीकडे जाऊन उत्तर भारतातील उदयोन्मुख बाजारपेठांमध्ये आपली उपस्थिती मजबूत करण्याच्या दिशेने आणखी एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे.

# गंगापूर शहरातील जड वाहतूक बंद करण्यासाठी राष्ट्रवादीतर्फे रास्ता रोको

## अर्धा तास वाहतूक ठप्प, वाहनांच्या दुतर्फा रांगा

तभा वृत्तसेवा

गंगापूर दि.१५:अहिल्यानगर मनमाड रस्ता दुरूस्तीच्या कामामुळे मागील महिनाभरापासून गंगापूर शहरातून वळवण्यात आलेल्या जड वाहनांच्या वाहतुकीमुळे शहरातील दोन जणांना जीव गमवावा लागला असून दररोज होत असलेल्या वाहतुक कोंडीमुळे नागरिक त्रस्त झाल्याने राष्ट्रवादी काँग्रेसतर्फे दि. १३ रोजी शहरात मुख्य ररस्त्यावर अर्धातास रास्ता रोको आंदोलन करण्यात आले.



गंगापूर शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकामध्ये झालेल्या या आंदोलनात राष्ट्रवादीचे तालुकाअध्यक्ष व माजी नगराध्यक्ष संजय जाधव, शहराध्यक्ष मुजीब समाज, तुकाराम सटाले, सुरेश नेमाडे, सोपान देशमुख यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी आंदोलकांनी प्रशासनाविरोधात घोषणा देउन जड वाहतूक तत्काळ बंद करण्याची मागणी केली.

यावेळी बोलताना संजय जाधव यांनी सांगितले की, अहिल्यानगर ते मनमाड या रस्त्याच्या दुरूस्तीच्या कामासाठी तेथील प्रशासनाने २१ सप्टेंबरपर्यंत ही वाहतूक वळवण्याचे लेखी पत्र दिले होते. परंतु मुदत संपून वीस दिवसांपेक्षा अधिक कालावधी होउनही जड वाहनांची वाहतूक सुरूच असल्याने नागरिक त्रस्त झाले आहे. दरम्यानच्या काळात शहरातील जड वाहनांमुळे दोन जणांना जीव गमवावा लागला आहे. त्यामुळे संबंधित विभागाने शहरातील जड वाहनांची वाहतूक तत्काळ थांबवून पर्यायी व्यवस्था करावी तोपर्यंत आंदोलन सुरू ठेवण्याचा इशारा दिला.

याप्रसंगी तहसील प्रशासन व पोलिस निरिक्षकांतर्फे आंदोलकांच्या भावना जिल्हाधिकाऱ्यांमार्फत अहिल्यानगर येथील संबंधित विभागाला कळवून तातडीने जड वाहतूक बंद करण्याबाबत कार्यवाही करण्याचे आश्वासन दिल्यानंतर आंदोलन तात्पुरते स्थगित करण्यात आले. यावेळी पोलिस निरिक्षक कुमारसिंग राठोड, महसूलतर्फे गणेश लोणे, गुप्त वार्ता विभागाचे मनोज नवले, मा. नगरसेवक योगेश पाटील, दिनेश गायकवाड,मा.मोहसीन चाऊस,मुकुंद जोशी,सोपान देशमुख ,तुकाराम साटले ,मुजीब समाज ,अनिस कुरेशी,विशाल दारुटे,बाबासाहेब लगड गुड्डू चाऊस कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते

# आपत्कालीन प्रसंगी 'घाबरू नका, कृती करा, जीव वाचवा' : डॉ. अनुपम टाकळकर

छत्रपती संभाजीनगर, १४ ऑक्टोबर – सिव्हिल हॉस्पिटल (मिनी घाटी) येथे इंडियन मेडिकल असोसिएशन, छत्रपती संभाजीनगर शाखेच्या वतीने *फर्स्ट रिस्पॉन्स टू इमर्जन्सी सिच्युएशन'* ही कार्यशाळा आयोजित करण्यात आली. या कार्यशाळेत जिल्हा रुग्णालय, ग्रामीण रुग्णालये आणि प्राथमिक आरोग्य केंद्रातील कर्मचारी सहभागी झाले.



डॉ. अमोल कुलकर्णी*, एम.डी. मेडिसिन व संचालक, धुत हॉस्पिटल यांनी कार्यशाळेचे प्रमुख व्याख्यान दिले. त्यांनी आकस्मिक रुग्ण दिसल्यास कसे वागावे, फिट येणाऱ्या रुग्णास कशी मदत करावी, शॉकमधील रुग्णाची प्राथमिक काळजी कशी घ्यावी, याबद्दल सविस्तर मार्गदर्शन केले. त्यांनी सांगितले की *घटनेच्या पहिल्या काही मिनिटांत योग्य कृती केल्यास रुग्णाचा जीव वाचू शकतो.*

यानंतर डॉ. प्रीती भाग्यवंत , डॉ. कुंदा धुळे आणि डॉ. रश्मी जोशी, डॉ सुजाता जनवाडे यांनी सीपीआरचे प्रात्यक्षिक दिले. त्यांनी सीपीआरची योग्य पद्धत, त्यासाठी आवश्यक निकष आणि प्रत्यक्ष सराव करून घेतला.

डॉ. अनुपम टाकळकर* अध्यक्ष, खच- छत्रपती संभाजीनगर, म्हणाले, आपल्या समाजात अजूनही फिट येणाऱ्या रुग्णाच्या नाकासमोर कांदा किंवा चप्पल दाखवण्याची चुकीची प्रथा आहे. पण त्याने उपयोग होत नाही. अशा वेळी रुग्णाचे डोके एका बाजूला वळवा, त्याला डाव्या बाजूला झोपू द्या, लाळ आत जाऊ नये याची काळजी घ्या आणि तात्काळ रुग्णालयात न्या. एवढेच पुरेसे आहे.

डॉ योगेश लक्कास सचिव यांनी सांगितले की, अशा प्रकारच्या प्रशिक्षणाची गरज प्रत्येक आरोग्यकर्मचाऱ्याला आणि सर्वसामान्य जनतेलाही आहे. कार्यशाळेचा शेवट एका स्पष्ट संदेशाने झाला: घाबरू नका, अंधश्रद्धा टाळा, योग्य कृती करा आणि जीव वाचवा.

# आझाद स्वाभिमानी सेना उतरणार न.प.निवडणुकीच्या रींगणात

तभा वृत्तसेवा

पैठण डी १५ :- शहरात नव्यानेच स्थापन झालेल्या आझाद स्वाभिमानी सेनेच्या वतीने शहरातील विविध प्रभागातून इच्छुक उमेदवारांनी आगामी नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक लढवण्याची तयारी दाखवली असून यंदाच्या या निवडणुकीत आझाद स्वाभिमानी सेना पूर्ण ताकतीनिशी निवडणुकीस सामोरे जाणार असल्याची माहिती पक्षाचे संस्थापक अध्यक्ष अंजार कादरी यांनी दिली आहे.

विशेष म्हणजे या निवडणुकीत नगराध्यक्ष पदासाठी या पक्षाच्या वतीने श्रीमती अतिया विकारुद्दीन कादरी यांचे नाव समोर केले आहे. त्या शासकीय सेवेतून वरिष्ठ अधिकारी पदावरून त्या सेवानिवृत्त झालेल्या असून त्यांना शासकीय कामकाजाचा दांडगा अनुभव असल्याचे कादरी यांनी यावेळी बोलताना सांगितले.

यावेळी बोलताना अंजार कादरी म्हणाले की पैठण शहर हे प्राचीन शहर असून शहराचे भौगोलिक विस्तार वेळोवेळी झाले परंतु समान विकास होण्याऐवजी वैयक्तिक फायद्यासाठी राजकारण्यांनी हळूहळू मुख्य शहर उद्धस्त करण्याचा कट रचला असून कळत नकळत मुख्य शहराची व मुख्य बाजारपेठेचे मोठे नुकसान पहावयास या ठिकाणी मिळत आहे. शहराचा समतोल विकासन साधता पूर्वी मुख्य शहरात असलेल्या सरकारी कार्यालय बँका ह्या स्थलांतरित करण्याचा डाव विद्यमान व भुतपुर्व पुढार्यांनी आजपर्यंत रचला आहे, म्हणून जुन्या पैठणचा हवा तसा विकास होऊ शकलेला नाही, इतका मोठा ऐतिहासिक आणि पौराणिक वारसा पैठण शहराच्या दक्षिण बाजूस असताना तसेच या ठिकाणी हिंदू मुस्लिम यांची पुरातन श्रद्धास्थाने असताना देखील या परिसराचा विकास झाला नाही ही मोठी शोकांतिका आहे. पुरातन तथा प्राचीन शहरचा हा भाग मूलभूत सुविधा पासून वंचित आहे किती

कौन्सिल आले गेले प्रत्येकाने प्रत्येक वेळी स्वविकास केला पण या भागाचा विकास केला नाही, ही सल आजही मनात सलत आहे, या सर्व गोष्टीचा विचार करता आझाद स्वाभिमानी सेना समविचारी पक्ष अपक्ष लोकांच्या समवेत एकत्र येऊन स्वाभिमानी सेनेच्या झेंड्याखाली या निवडणुकीत आपले पॅनल उभे करण्याचे तयारीत आहे.

सद्यस्थितीत स्वाभिमानी सेनेकडे प्रभाग क्रमांक, एक, पाच, सहा आठ, नऊ, दहा, अकरा व बारा या प्रभागातून जवळपास नगराध्यक्षपदासह १६ उमेदवार इच्छुक असून अन्य प्रभागातील इच्छुक उमेदवारांना देखील या पक्षाच्या झेंड्याखाली येऊन शहर विकासाची संधी देण्याचा विचार पक्ष करीत आहे, म्हणून शहर विकासाचा विचार करणारे व तळमळ असणाऱ्या समविचारी राजकीय लोकांनी आमच्या समवेत येऊन या निवडणुकीत परिवर्तन घडवावे असे आव्हान याप्रसंगी बोलताना अंजार कादरी यांनी केले आहे.

# सोयगावच्या विद्यार्थ्यांचा जिल्हास्तरीय विज्ञान नाट्य स्पर्धेत द्वितीय क्रमांक

तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.१५ ऑक्टोबर – राष्ट्रीय विज्ञान नाट्योत्सव अतंर्गत जिल्हास्तरीय विज्ञान नाट्य स्पर्धेत जिल्हा परिषद प्रशाला येथील संघाने सादर केलेल्या प्रथम महिला डॉ.आनंदीबाई जोशी यांचे जीवन व कार्य वर आधारित नाटिका सादरीकरणास जिल्हास्तरावर छत्रपती संभाजीनगर येथे द्वितीय क्रमांक मिळाल्या बद्दल सदरील विद्यार्थी व मार्गदर्शक विज्ञान शिक्षक दौलतसिंग परदेशी व डॉ.आनंदी गोपाल जोशी या नाटिकेमध्ये डॉ.आनंदीची भूमिका कु.गायत्री बावस्कर हिने



साकारली तर गोपाळरावच्या भूमिकेत देवयानी मिसाळ होती.या नाटिकेमध्ये कामाक्षी शिनकर,निशा बागुल,नेहा अस्वार, वैभवी महाले,साक्षी सोनवणे,वृषाली साळुंखे यांचा सत्कार सावित्री बहुद्देशीय महिला मंडळ व शिक्षक संघ सोयगाव चे सौजन्याने सोयगाव केंद्र प्रमुख फिरोज तडवी व मुख्याध्यापक दादाराव राठोड यांचे हस्ते शालेय उपयोगी पुस्तक देऊन करण्यात आला. यावेळी वरखेडी येथील ज्येष्ठ शिक्षक प्रशांत पाटील,प्रशालेचे शिक्षक एस.व्ही.पाटील,नवले, भारद्वाज,बागुल,राजेंद्र उंबरकर,भास्कर चौधरी,तुकाराम पायघन,सावळे,संगीता सोनवणे व वाघ,कार्यानुभव निदेशक शिवराम आगे,निदेशक सचिन ढगे,राऊत उपस्थित होते.

सदरील नाटकातील संघाचे तालुका गटशिक्षणाधिकारी कार्यालय शिक्षण विभाग,केंद्र प्रमुख व केंद्रीय मुख्याध्यापक केंद्र सोयगाव तसेच अध्यक्ष व सर्व पदाधिकारी शाळा व्यवस्थापन समिती प्रशाला सोयगाव तसेच अध्यक्ष व सर्व सदस्य सावित्री महिला बहुद्देशीय मंडळ,अध्यक्ष व सर्व कार्यकारणी महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघ व सर्व शिक्षक संघटना शिक्षक मित्र परिवार व शिक्षण क्षेत्रातील सर्व मान्यवर यांचे तर्फे अभिनंदन करण्यात आले आहे .

# जि.प. केंद्रीय प्रा.शा.सोयगावच्या विद्यार्थ्यांनी मातीच्या कणांतून विद्यार्थ्यांनी उभारले शिवरायांचे गड

तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.१५ ऑक्टोबर – जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा सोयगाव येथे मंगळवार रोजी विद्यार्थ्यांनी आपल्या कुशल हातांनी मातीपासून छत्रपती शिवाजी महाराजांच्या गड-किल्ल्यांची सुंदर निर्मिती करून इतिहासाला जिवंत केले.मातीतील किल्ला या स्पर्धेचे आयोजन केंद्र प्रमुख फिरोज तडवी यांच्या मार्गदर्शनाखाली शाळेचे मुख्याध्यापक किरणकुमार पाटील यांच्या संकल्पनेतून शाळेच्या वतीने आयोजन करण्यात आले होते.या उपक्रमातून विद्यार्थ्यांमध्ये शिवचरित्राबद्दल अभिमान,ऐतिहासिक जागरूकता आणि सृजनशीलतेचा विकास झाला.यास्पर्धेत शाळेत विद्यार्थी व विद्यार्थीनीनी उत्स्फूर्त सहभाग नोदविला. या स्पर्धेचे उद्घाटन



आणि परीक्षण मान्यवरांच्या उपस्थितीत पार पडले.कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून तातेराव माळी (सहायक गटविकास अधिकारी, पं.स.सोयगाव),महेंद्रसिंग पाटील (कनिष्ठ प्रशासन अधिकारी, पं.स.सोयगाव) नगरसेवक राजेंद्र दुतोंडे,केंद्रप्रमुख फिरोज तडवी, मुख्याध्यापक रामदास फुसे,प्रशांत पाटील,तसेच शाळेचे मुख्याध्यापक किरणकुमार पाटील उपस्थित होते.

कार्यक्रमात सुरेखा चौधरी,मंगला बोरसे,प्रतिभा कोळी, रामचंद्र महाकाळ,अनिल देसाई,तानाजी चव्हाण,भास्कर चौधरी,शुभम देसले,पुनम कल्याणकर,अंकुश काळे यांच्यासह इतर शिक्षक व मान्यवर उपस्थित होते.विद्यार्थ्यांनी आपल्या कल्पकतेचा आणि मेहनतीचा उत्कृष्ट संगम घडवत राजगड,रायगड,तोरणा,प्रतापगड, सिंहगड यांसारख्या ऐतिहासिक किल्ल्यांचे सुंदर नमुने साकारले.

हा उपक्रम शिवरायांचे विचार आणि संस्कार आजच्या पिढीपर्यंत पोहोचविण्याचे एक प्रभावी उदाहरण ठरला यावेळी तातेराव माळी यांना विद्यार्थ्यांना रोख अकराशे व महेंद्रसिग पाटील यांनीही रोख आकर्षक बक्षिस दिले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कुशलतेने करण्यात आले तर शेवटी मुख्याध्यापक किरणकुमार पाटील यांनी सर्व उपस्थित मान्यवरांचे आणि विद्यार्थ्यांचे आभार मानले. अशा प्रकारचे उपक्रम ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये इतिहासप्रेम,सर्जनशीलता आणि स्वाभिमान जागवतात. जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा सोयगाव यांचे हे उपक्रमशील कार्य कौतुकास्पद ठरले आहे.

## स्वर स्वामी कला साधना ग्रुप तर्फे महानायक अमिताभ बच्चन यांच्या वाढदिसानिमित्त सदाबहार गाण्यांचा कलाविष्कार




नागपूर : युगातील महानायक पद्मभूषण, पद्मविभूषण, पदमश्री अशाभारत सरकारचे मानाचे व इतर अनेक पुरस्कार प्राप्त अभिनेते अमिताभ बच्चन यांच्या वाढदिवसानिमित्त स्वर स्वामी कला साधना ग्रुप तर्फे सदाबहार गाण्यांचा कलाविष्कार सादर करण्यात आला.आयोजक प्रियांका हातगे, सौरभ हातगे, गणेश हातगे व शुभ चिंतक राजेश हुनारी यांच्या उत्तम नियोजनात प्रत्येक गायकाने आपली कला सादर केली. या ग्रुप मध्ये महानगर पालिका कर्मचारी, अधिकारी, उद्योजक, खासगी नोकरदार, डॉक्टर, इंजिनिअर अशा समाजातील विविध स्तरातील गायकांनी गेले दोन महिने आपला काम धंदा सांभाळून कठोर परिश्रम घेऊन हा कार्यक्रम यशस्वी केला.रविवार दिनांक १२ ऑक्टोबर २५ रोजी माटुंगा येथील प्रेक्षकांनी खचखाचं भरलेल्या मैसूर हॉल मध्ये हा कार्यक्रम संपन्न झाला.संगीत संयोजन मिलिंद वाणी, निवेदन तन्वी बनसोडे, व्हिडिओग्राफी चरण सिंह, व ध्वनीव्यवस्था निखिल पांचाळ यांनी केली.कुशल वादकांनी रसिकांना मंत्र मुग्ध केले.

# नाथ मंदिर ते नाथमंदिर सुविधेची मागणी



तभा वृत्तसेवा

पैठण दि १५ :- सणासुदीचा तसेच कुंभमेळ्याचे पर्व येणार असल्याने पैठण नगर परिषदेच्या वतीने शांतिब्रम्ह श्री संत एकनाथ महाराज समाधी मंदिर ते गावांतील नाथ मंदिर रोडवर, स्वच्छता, लाईट, पाणीपुरवठा, रुंदीकरण आदी कामे तातडीने करावी यासाठी भाजपचे शहर सरचिटणीस योगेश धर्माधिकारी यांच्या वतीने नगर परिषद प्रशासक तसेच मुख्याधिकारी डॉ. पल्लवी अंभोरे यांना निवेदन देण्यात आले. यावेळी भाजपा पाधिकाऱ्यांची उपस्थिती होती.

धार्मिक दृष्ट्या महत्वाच्या असलेल्या या रस्त्यावर प्रचंड अस्वच्छता पसरली असून परिसरातील नाले ही जाम झाल्याने दुर्गंधी पसरली आहे. खंडोबा महाराज मंदिर, नाथ समाधी व गावांतील नाथ मंदिर रोडवर पथदिवे लावावेत याभागात नियमित पाणी पुरवठा करावा. गोदावरी घाट,गागाभट्ट चौक, पालखी ओटा परिसर, महापुरुषांचे स्मारक आदी ठिकाणी स्वच्छता करावी अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. याप्रसंगी भाजपा पदवीधर संयोजक तथा शरद सरचिटणीस योगेश धर्माधिकारी, अरुण आंधळे,विजय चाटूफळे, शिक्षक सतिष आहेर, सुरेश गायकवाड, निखिल गुप्ता,प्रेम जाधव, सार्थक गांडुळे,अनिल पवार, दिनेश परळकर आदी भाजपा पदाधिकारी उपस्थित होते.

## लोकनेते मारुतराव घुले पाटील ज्ञानेश्वर साखर कारखान्याचा ऊस भाव जाहिर;प्रतिटन ३ हजार रुपये पहिली उचल

अ. नगर, दि १४ : लोकनेते मारुतराव घुले पाटील ज्ञानेश्वर सहकारी साखर कारखान्यास या वर्षिच्या गळीत हंगामात गाळपास येणाऱ्या ऊसाला ३ हजार रुपये प्रति टन पहिली उचल देणार असून अंतिम ऊस दर हा अंतिम साखर उताऱ्या नुसार देण्यात येईल अशी माहिती कारखान्याचे अध्यक्ष माजी आ.नरेंद्र घुले पाटील यांनी दिली. नेवासा तालुक्यातील भेंडा येथील लोकनेते मारुतराव घुले पाटील ज्ञानेश्वर सहकारी साखर कारखान्याचे ५२ व्या गळीत हंगामाचा बॉयलर अग्नी प्रदिपन समारंभ कारखान्याचे अध्यक्ष माजी आमदार नरेंद्र घुले पाटील यांचे हस्ते व जिल्हा सहकारी बँकेचे संचालक माजी आमदार चंद्रशेखर घुले पाटील, उपाध्यक्ष माजी आमदार पांडुरंग अभंग यांचे प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला. त्यावेळी श्री.घुले बोलत होते. कारखान्याचे जेष्ठ संचालक अड. देसाई देशमुख, काकासाहेब नरवडे,काशिनाथ नवले,साखर कामगार संघटनेचे सरचिटणीस नितिन पवार,संचालक काकासाहेब शिंदे , पंडितराव भोसले, अशोकराव मिसाळ, शिवाजीराव कोलते, भाऊसाहेब कांगुणे, दादासाहेब गंडाळ, विष्णुपंत जगदाळे, सखाराम लव्हाळे, प्रा.नारायण म्हस्के, मच्छिंद्र म्हस्के, जनार्धन कदम, विकास नन्नवरे, संतोष पावसे, कामगार संचालक सुखदेव फुलारी, कार्यकारी संचालक अनिल शेवाळे, जनरल मॅनेजर रवींद्र मोटे व्यासपीठावर उपस्थित होते.

जा.क्र./नपंसो/नामांतर/२०२५/२०२६ कार्यालय नगर पंचायत सोयगांव
दिनांक : १५-१०-२०२५

## जाहीर प्रगटन

सर्व जनतेस याद्वारे कळविण्यात येते की, **गयाबाई उत्तम हिवाळे** यांनी मोहल्ला **दयाळनगर वॉर्ड क्र १५** सोयगांव स.नं. ----- मधील प्लॉट **१४८६/१७** त्यांचे नांवे मालमत्ता कर रजिस्टरला नोंद घेणेसाठी या कार्यालयात अर्ज दाखल केला आहे. अर्जानुसार जागेची चतु:सीमा खालील प्रमाणे आहे.

**पूर्व : नगरपंचायत मिळकत नं.१०ची जागा** — **पश्चिम : सरकारी वापराचा सार्वजनिक रस्ता**
**दक्षिण : गट नं. २६३ पैकी ची शेतजमीन** — **उत्तर : नगरपंचायत मिळकत नं. १० ची जागा**

आकार : पूर्व पश्चिम **४०×२०=८००.००** दक्षिणोत्तर..........

वरील नामांतराबाबतच्या कोणास आक्षेप असेल त्यांनी १५ दिवसांचे आत सकारण लेखी निवेदन कागदोपत्र पुराव्यानिशी या कार्यालयात दाखल करावे. मुदती नंतर कोणतेही आक्षेप विचारात घेतले जाणार नाही व नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.

मुख्याधिकारी
नगरपंचायत सोयगाव

## जाहिर प्रगटन

**मा.आर.एस. तापडीया दिवाणी न्यायाधिश साहेब, कनिष्ठ स्तर कन्नड यांच्या कोर्टात.**

दि.कि.अर्ज क्र. ४२०/२०२५ — पुढील तारीख १४/११/२०२५.

अर्जदार – १. हमिदाबी भ्र. कासम शेख, वय ६४ वर्षे, धंदा घरकाम, रा. शिवगनर, कन्नड ता. कन्नड जि. औरंगाबाद. २. फजलू पिता कासम शेख, वय ४५ वर्षे, बंदा मजुरी, रा. शिवनगर, कन्नड, ता. कन्नड जि. औरंगाबाद. ३. रऊफ पिता कासम शेख, वय ४२ वर्षे, धंदा मजुरी, रा. नितीन नगर, कन्नड, ता. कन्नड जि. औरंगाबाद.

विरुद्ध

गैरअर्जदार : निरंक

अर्ज : बॉम्बे रेग्यूलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ३ प्रमाणे कायदेशीर वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदार यांनी त्यांचे वकील ॲड. एम.एच. सय्यद यांचे मार्फत या न्यायलयात अर्ज सादर केला आहे की, अर्जदार क्र. १ ही मयत कासम बाबामिया शेख यांची पत्नी आहे. अर्जदार क्र. २ व ३ हे मयत कासम बाबामिया शेख यांचे मुले आहेत. अर्जदार क्रं. २ व ३ हे आपसात सख्खे भाऊ असून अर्जदार क्र. १ ही त्याची आई आहे. अर्जदार क्र. १ ते ३ हे मयत कासम बाबा मिया शेख यांचे कायदेशीर वारस आहे. मयत कासम बाबामिया शेख यांना इतर कोणीही कायदेशीर वारस नाही. अर्जदार क्र. १ चे पती व अर्जदार क्र. २ ते ५ यांचे वडील नामे कासम बाबामिया शेख हे दि. २८/११/२०२४ रोजी मौजे कन्नड येथे वृद्धपकाळामुळे मरण पावले आहे. सोबत मयत कासम बाबामिया शेख यांचे नगर पालिका कन्नड यांनी दिलेले मृत्यू प्रमाणपत्र दाखल करीत आहे. तसेच मयताची आई अमिनाबी बाबामिया शेख व वडील बाबामिया शेख हे मयताच्या बालपणीच मयत झालेले आहे. अर्जदार क्र. १ ते ३ यांना मयत कासम बाबामिया शेख यांचे मृत्यू पश्चात तहसिल कार्यालय, नगर पालिका कार्यालय, ग्रामपंचायत कार्यालय, उपअधिक्षक भूमि अभिलेख कार्यालय, गाव, नगर व शहर भूमापन कार्यालय, महानगर पालिका, तलाठी कार्यालय, गट विकास अधिकारी कार्यालय व इतर शासकिय व निमशासकिय कार्यालय मध्ये आवश्यक ते कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने अर्जदार क्रं. १ ते ३ हे मयताचे वारस असल्याबाबत कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. अर्जदार क्र. १ ते ३ हे व मयत कासम बाबामिया शेख हे मौजे कन्नड ता. कन्नड येथील मुळचे रहिवाशी होते तसेच ते कन्नड येथे कन्नड येथे राहत असतांना वृद्धपकाळाने मयत झाले आहे. सदरील मयतास अर्जदार क्र.१ ते ३ हे वारस असून वेळोवेळी वेगवेगळ्या कार्यालयात वारस प्रमाणपत्राची आवश्यकता भासत असल्यामुळे सदरील अर्जास कारण दि.०५/०८/२०२५ रोजी मौजे कन्नड ता. कन्नड येथे घडले. अर्जदारांनी यापुर्वी अशा प्रकारचा वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठीचा अर्ज यापुर्वी इतर कोणत्याही न्यायालयात दाखल केलेला नाही अथवा न्याय प्रविष्ठ नाही. त्याअर्थी सदर जाहीर प्रगटनाद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, अर्जदार यांनी अर्ज केल्यानुसार वारसा प्रमाणपत्रासाठी परवानगी देण्याबाबत ज्या कुणास, कुठल्याही स्वरुपाचा उजर आक्षेप वगैरे असल्यास त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून तीस (३०) दिवसांच्या आत आपला उजर, आक्षेप वगैरे मा. न्यायलयात नोंदवावा. मुदतीत उजर आक्षेप न आल्यास अर्जदाराच्या नावे वारसा प्रमाणपत्र देण्यात येईल. त्यानंतर आलेला उजरआक्षेप ग्राह्य धरला जाणार नाही. याची नोंद घ्यावी.

दिनांक : १४/१०/२०२५.
कनिष्ठ लिपीक — सहाय्यक अधिक्षक
दिवाणी न्यायधीश क. स्तर कन्नड

संपादकीय

तरुण भारत

www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## अग्रलेख...

# स्थायी ठरो संघर्षविराम...

कुणाच्या का मध्यस्थीने असेना, इस्रायल आणि हमास यांच्यात गेल्या दोन वर्षांपासून सुरू असलेला संघर्ष थांबला, ही सध्याच्या काळातील सर्वांत दिलासादायक बातमी म्हणावी लागेल. हा संघर्षविराम कायम टिकेल का, हे सांगणे अवघड आहे; कारण या संघर्षाचा उगम केवळ त्या देशांच्या सीमारेषांमध्ये नाही, तर तो मुळात त्या भागाच्या इतिहासात, धर्मांमध्ये आणि त्या भूप्रदेशाविषयीच्या हक्कांच्या मुद्यात दडलेला आहे. दोन वर्षांपूर्वी हमासने इस्रायलवर आकस्मिक हल्ला चढविला होता. त्या अचानक झालेल्या हल्ल्यात हजारावर इस्रायली नागरिकांचा बळी गेला आणि सुमारे अडीचशे जणांना ओलिस ठेवण्यात आले. तो हल्ला इस्रायलसाठी दुसऱ्या महायुद्धानंतरचा सर्वांत भीषण दिवस ठरला. त्यानंतर इस्रायलने ''पूर्ण प्रत्युत्तर'' देण्याची घोषणा केली आणि गाझा पट्टीवर सतत बॉम्बवर्षाव सुरू झाला. जगाच्या एका छोट्याशा भूभागावरून उठणाऱ्या धुराच्या वलयांनी संपूर्ण मानवजातीचे लक्ष वेधून घेतले. या संघर्षात साठ हजारांवर पॅलेस्टिनी नागरिक मृत्युमुखी पडले आणि जवळजवळ वीस लाख लोक विस्थापित झाले. गाझा पट्टीतील घरे, शाळा, रुग्णालये, धार्मिक स्थळे उद्ध्वस्त झालीत. एका संपूर्ण पिढीचा भविष्यकाळच नष्ट झाला. दुसरीकडे, इस्रायलचेही या संघर्षात मोठे नुकसान झाले हे नाकारता येत नाही. शेकडो सैनिक मृत्युमुखी पडले, सीमावर्ती गावे ओसाड झालीत, आर्थिक ताण वाढला आणि नागरिकांमध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण झाली. खरे तर युद्धात कोणीच जिंकत नाही. जेत्याचेही नुकसान होतेच. या संघर्षातही तेच घडले. आजमितीला जगभरात सुमारे ५० ठिकाणी युद्धसदृश संघर्ष सुरू आहेत. कुठे धर्माचा, कुठे पंथाचा तर कुठे सीमांचा वाद आहे; तर कुठे फक्त अहंकाराचे युद्ध चालू आहे. प्रत्येक युद्धात शस्त्रास्त्र कंपन्यांची कमाई वाढते, आंतरराष्ट्रीय राजकारणातले डावपेच वाढतात आणि प्रजेचे अश्रू वाहतात. इस्रायल-हमास संघर्षातही तेच घडले. इस्रायलचे समर्थन करणारे देश आणि विरोधकांच्या बाजूने उभे असलेले देश या दोन्ही बाजूंनी शस्त्रसाठा पुरवठ्यासाठी मोठे आर्थिक व्यवहार झाले. एवढा मोठा व दीर्घकालीन संघर्ष झाला आणि अखेर तो थांबला हे बरे झाले. पण, या संघर्षातून कुणाला काय मिळाले, कुणाचा काय फायदा झाला, हे प्रश्न उरतातच.

भूमध्य समुद्राच्या किनाऱ्यावर पसरलेला पॅलेस्टाईन नावाचा प्रदेश प्राचीन काळापासूनच संघर्षाचे केंद्र राहिला आहे. पहिल्या महायुद्धाच्या काळातही ही युद्धभूमी होती. असे म्हणतात की, बायबल काळात येथे ''ज्यूडा'' आणि ''इस्रायल'' अशी दोन राज्ये होती. त्या काळात त्या प्रदेशामध्ये सत्तांतरांची मालिका चालूच होती. अनेक आक्रमक समुदायांनी या भूमीवर अधिराज्य गाजवले. त्यामुळे ज्यू लोकांना वारंवार आपली भूमी सोडून परागंदा व्हावे लागले. मात्र, जगाच्या वेगवेगळ्या भागांत विखुरलेल्या ज्यू समाजाने आपल्या ''पवित्र भूमी''ची आस कधी सोडली नाही. दोन हजार वर्षांची निर्वासित असल्याची वेदना त्यांच्या संस्कृतीत खोलवर कोरलेली होती. अखेर विसाव्या शतकाच्या मध्यंतरी, दुसऱ्या महायुद्धानंतर आणि नाझी हत्याकांडानंतर, जगाने ज्यू समुदायासाठी राष्ट्रनिर्मितीची गरज मान्य केली. संयुक्त राष्ट्रसंघाने १९४७ मध्ये पॅलेस्टाईनचे दोन भागांमध्ये विभाजन केले. एक ज्यू राष्ट्र आणि एक अरब राष्ट्र. परंतु, अरब देशांनी हा निर्णय मान्य केला नाही आणि त्याच वर्षी सुरू झालेले पहिले अरब-इस्रायल युद्ध म्हणजेच आजच्या संघर्षांचे बीजारोपण होते. म्हटले तर तो संघर्ष कधीच थांबला नाही. या ना त्या कारणाने तो पुन्हा-पुन्हा होत राहिला. आता संघर्षविराम झाल्याचे सांगितले जात असले तरी यापुढे असा संघर्ष पुन्हा कधी सुरू होईल, हे सांगता येत नाही. १९८७ मध्ये पहिल्या इंतिफादाच्या (उठाव-अपरायजिंग) काळात हमासचा जन्म झाला. सुरुवातीला तो सामाजिक आणि धार्मिक संघटना म्हणून पुढे आला, पण कालांतराने हा गट सशस्त्र प्रतिकारासाठी ओळखला जाऊ लागला. पॅलेस्टाईन लिबरेशन ऑर्गनायझेशन (पीएलओ) च्या तुलनेत हमास ही संघटना अधिक कट्टर, मूलतत्त्ववादी आणि आक्रमक होती व आहे. या आक्रमतेपोटी हमासने इस्रायलचे जेवढे नुकसान केले असेल, त्याहून अधिक नुकसान पॅलेस्टिनी प्रदेशाचे आणि गाझा पट्टीचे झाले आहे. युद्धात नेते किंवा सेनापतींचा जीव क्वचितच जातो. मरतात ते सैनिक आणि त्याहून अधिक संख्या असते नागरिकांची. हेच या इस्रायल-हमास संघर्षातही सिद्ध झाले. आता संघर्षविराम झाला आहे. प्रत्यक्षात त्या प्रदेशात काय घडत असेल, याचा अंदाज लावता येणे शक्य नाही. आजकाल आंतरराष्ट्रीय पातळीवर देखील आपापल्या पद्धतीने व सोयीनुसार बातम्या निर्माण केल्या व प्रसृत केल्या जातात. संघर्षविराम झाला आहे, असे मानून त्या प्रदेशाला शांतता लाभण्याची इच्छा तेवढी आपण करू शकतो.

एक खरे की, संघर्षविराम म्हणजे केवळ बंदुका किंवा तोफांना थांबवणे नसते. मनामनातील द्वेष, रागही शमवणे आवश्यक असते. इतिहास असे सांगतो की, शाश्वत शांतता निर्माण करण्यासाठी तीन गोष्टी आवश्यक आहेत आणि त्या म्हणजे परस्परांवरील विश्वास, न्याय्य भूमिका आणि परस्परांप्रति सद्भावना. दोन्ही पक्षांनी संवादाचा मार्ग स्वीकारला पाहिजे आणि कायमस्वरूपी संवाद करीत राहिले पाहिजे. यावेळी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी या संघर्षविरामाचे श्रेय घेतले आहे. त्यांनी ते घ्यायला कुणाचीच हरकत नाही. वास्तवात या भूमीचा आणि अमेरिकेचा काहीही संबंध नाही. पण, अरब जगतात ढवळाढवळ करीत राहणे हा अमेरिकेचा फार जुना व आवडता छंद आहे. तसे अमेरिकेला सर्वत्र लुडबूड करणे आवडतेच. त्याची कारणे साऱ्या जगाला ठावूक आहेत. असो... तर इतके संघर्ष होऊन देखील इस्रायलची भूमिका बहुतांशी शांततेची असते आणि तो देश स्वत:च्या संरक्षणासाठी सदैव सिद्ध असतो, हे लक्षात घेण्याजोगे वैशिष्ट्य आहे. इस्रायलच्या तुलनेत गाझा पट्टीपुरते अस्तित्व असलेल्या हमासकडे फार ताकद नाही. या संघर्षात तर होती तीही ताकद कमी झाली आहे. तरीही या भागाचे भू-राजकीय वैशिष्ट्य असे की, इस्रायलला कधीही बेसावध राहता येत नाही. लेबनॉन, सीरिया, जॉर्डन, इजिप्त हे इस्रायलचे शेजारी देश. हा बव्हंशी भाग अरबी संस्कृती आणि इस्लामला मानणारा. इस्रायल त्यांच्या तुलनेत मूल निवासींचा देश असला तरी तो ज्यू समुदायाचा असल्यामुळे परका मानला जातो. त्यामुळे सख्खे शेजारी आणि पक्के वैरी ही तिकडची रीत. इस्रायलच्या वाट्याला गेल्या हजारो वर्षांत सलग शांतता आली नाही याचे कारण या भू-राजकीय वैशिष्ट्यात सापडते. या स्थितीतही इस्रायलने केलेली प्रगती नेत्रदीपक आहे. खरे तर इस्रायलपासून त्याच्या शेजाऱ्यांनी शिकले पाहिजे. या देशाची लोकसंख्या एक कोटीच्या आत आहे. पाणी नाही, फारशी हिरवळ नाही आणि तरीही ज्ञान-विज्ञान-तंत्रज्ञानात अग्रेसर असलेल्या जगातील देशांमध्ये त्याची गणना होते. अत्याधुनिक तंत्रज्ञान वापरणारे लष्कर, सिलिकॉन व्हॅलीशी तुलना करता येईल असे हाय-टेक अर्थकारण, देशाला मोठा महसूल मिळेल अशी निर्यात, संशोधनातील आघाडी, कुशल मनुष्यबळाची उपलब्धता एवढेच नव्हे तर मोसादसारखी मातब्बर गुप्तचर यंत्रणा यासाठी इस्रायल ओळखला जातो. त्या तुलनेत त्याचे शेजारी कुठेच बसत नाहीत. काही तर अजूनही मध्ययुगात वावरतात. ज्यू समुदायाला शतकानुशतके छळ आणि स्थलांतर सोसावा लागल्याने तो मुळातच आक्रमक आहे. त्यामुळे या भागात संघर्ष उद्भवला की भयंकराचे रूप लवकर धारण करतो. आता एकदाचा इस्रायल-हमास संघर्ष थांबला हे सुचिन्ह मानले पाहिजे. ट्रम्प यांनी संघर्षविरामाचे श्रेय घेतलेच आहे तर हा संघर्षविराम स्थायी करण्यासाठीही आता प्रयत्न करावेत. इतर देशांनी व संयुक्त राष्ट्रांनीही त्यासाठी मदत करावी, एवढेच सध्या म्हणता येते.


## विशेष

# गतिमान मुंबईला लाभताहेत पंख!

प्रा. सुखदेव बखळे

अलिकडेच नवी मुंबई विमानतळाचे आणि मुंबईतील भूमिगत मेट्रोचे उद्घाटन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते झाले. नवी मुंबई विमानतळामुळे मुंबई आणि नवी मुंबईतील प्रवाशांचा फायदा होईलच, पण पश्चिम आणि उत्तर महाराष्ट्राची आर्थिक गतीही वाढणार आहे. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने (एमएमआरडीए) बारा हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त किमतीच्या १९ पायाभूत सुविधा प्रकल्पांना मंजुरी दिली आहे. संपूर्ण प्रदेशात मेट्रो कनेक्टिव्हिटी आणि वाहतूक व्यवस्था वाढवणे असा या प्रकल्पांचा उद्देश आहे. या प्रकल्पांमुळे आर्थिक घडामोडींना गती मिळेल, शहरी गतिशीलता वाढेल आणि प्रत्येक नागरिकाचे जीवनमान सुधारेल. ही केवळ मेट्रो कॉरिडॉरमधील गुंतवणूक नाही, तर अधिक स्मार्ट, अधिक कनेक्टेड अशी धोरणात्मक प्रगती आहे. लोकलला मुंबईच्या धमन्या म्हटले जात असले, तरी आता रस्ते, रेल्वेइतकेच, किंबहुना त्याहून अधिक महत्त्व मेट्रो आणि विमानसेवेला आले आहे. मुंबईपासून पालघरपर्यंत १३ मेट्रो सेवांना मुंबई महानगर प्रादेशिक विकास प्राधिकरणाने मंजुरी दिली आहे. त्यापैकी तीन मार्गांवर मेट्रो सुरू झाल्या आहेत. आता मेट्रो ठाण्यापर्यंत विस्तारली आहे. काही दिवसांमध्ये ती कल्याणपर्यंत पोहोचेल. पालघर जिल्ह्यातही तिचा विस्तार होत आहे. एकीकडे मेट्रो, लोकलचे जाळे विस्तारत असताना मुंबईची रस्ते वाहतूक गतिमान करण्यावर भर दिला जात आहे. अटल सेतू, पूर्व द्रुतगती मार्ग, सी लिंक, कोस्टल रोड, पश्चिम द्रुतगती मार्ग तसेच विविध ठिकाणी होत असलेल्या उड्डाणपुलांमुळे मुंबईची वाहतूक गतिमान होत आहे.

मुंबईपेक्षा लहान असलेल्या बंगळुरू, पुण्यासारख्या शहरांना जागतिक वाहतुकीची कोंडी होणारी शहरे अशी दूषणे मिळत असताना मुंबईला ते मिळत नाही. त्याचे कारण सुरुवातीपासून मुंबईच्या सार्वजनिक वाहतुकीवर दिलेला भर आणि त्यासाठी केला जात असलेला खर्च हे आहे. मुंबई आपल्या रहिवाशांना सर्वोत्तम राहणीमान प्रदान करू पाहत आहे. या निर्माणाधीन आणि नियोजित पायाभूत सुविधांच्या सुधारणांमुळे अनेक कंपन्या आणि मोठ्या उद्योगांचे लक्ष वेधले गेले आहे. संभाव्य गुंतवणूक संधींमध्ये रस निर्माण केला आहे आणि या प्रदेशातील आर्थिक वाढीला चालना दिली आहे. या घटकांचा एकूण रिअल इस्टेट क्षेत्रावरदेखील परिणाम झाला आहे. मुंबईची भौगोलिक रचना लक्षात घेता तिच्या वाढीला मर्यादा आहेत; परंतु म्हणून मुंबई काही वाढायची थांबली नाही. समुद्रात भराव टाकून आणखी काही बेटे विकासाच्या प्रवाहात सामील झाली. शरद पवार मुख्यमंत्री



असताना मुंबईला नव्या मुंबईचा पर्याय आला. मुंबईच्या जुन्या बंदराला 'जेएनपीटी'चा पर्याय उभा राहिला. नव्या मुंबईत आता पायाभूत सुविधांची निर्मिती केली जात असली, तरी तिलाही आता मर्यादा आहेत. त्यामुळे तर आता नव्या मुंबईनजीक तिसरी मुंबई आणि पालघर जिल्ह्यात चौथी मुंबई आकाराला येत आहे. मुंबईत पूर्वी फक्त पश्चिम आणि मध्य अशा दोनच रेल्वेलाईन होत्या. त्यानंतर हार्बर आली. आता तर वसई आणखी एका मार्गाने पनवेलशी जोडली आहे. कर्जत-पनवेल जोडले गेले आहे. मध्य आणि पश्चिम रेल्वे अनेक ठिकाणी परस्परांशी जोडली गेली आहे.

मुंबईतील असे काही मोठे पायाभूत सुविधा प्रकल्प आहेत, जे या शहराला भारतातील आणि जगभरातील सर्वोत्तम पायाभूत सुविधा शहरांपैकी एक बनवतील. मुंबई ट्रान्स हार्बर सी लिंक, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ, मुंबई मेट्रो ॲक्वा लाईन ३ (कुलाबा-वांद्रे-सांताक्रूझ इलेक्ट्रॉनिक्स एक्सपोर्ट प्रोसेसिंग झोन), मुंबई कोस्टल रोड, वर्सोवा वांद्रे सी लिंक, मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेन प्रकल्प, ऐरोली काटई नाका फ्री वे, रिंग रोड मुंबई या प्रकल्पांचा त्यात समावेश आहे. भारतातील सर्वांत लांब सागरी सेतू म्हणून ओळखला जाणारा ट्रान्स हार्बर सी लिंक हा प्रकल्प २१.६ किलोमीटर पसरलेला आहे. दक्षिण मुंबईतील शिवडी ते नवी मुंबईतील न्हावा शेवाजवळील चिर्लेपर्यंत हा पूल उभा राहिल्यामुळे प्रवासाचा वेळ २० ते २५ मिनिटांपर्यंत कमी झाला आहे. त्याची रचना सहा लेनची आहे. हा पूल शंभर वर्षांहून अधिक काळ टिकेल, अशी अपेक्षा आहे. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ मुंबई महानगर प्रदेशातील वाढत्या हवाई वाहतुकीच्या मागण्या पूर्ण करेल. विमानतळाच्या विकासासाठी सुमारे १,१६० हेक्टर जमीन देण्यात आली होती आणि २०३२ पर्यंत दरवर्षी सहा कोटी लोकांना सेवा देण्याची आणि तब्बल २.५ दशलक्ष टन मालवाहतूक करण्याची अपेक्षा आहे. मुंबई मेट्रो प्रकल्प हा शहरातील मेट्रो कनेक्टिव्हिटी वाढवण्यासाठी डिझाईन केलेला एक व्यापक मास्टर प्लॅन आहे. मुंबईतील प्रमुख आगामी पायाभूत सुविधा प्रकल्पांपैकी एक मुंबई कोस्टल रोड दक्षिण मुंबई आणि पश्चिम मुंबईला जोडेल. केंद्र सरकार मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेन प्रकल्प राबवत आहे. ५०८ किलोमीटर हाय-स्पीड रेल्वेलाईनसह होणाऱ्या या प्रकल्पामुळे प्रवाशांना मोठा दिलासा मिळणार आहे. बुलेट ट्रेनमुळे लोकांना या शहरांदरम्यान पूर्वीच्या सात ते आठ तासांऐवजी दोन तास आणि ५७ मिनिटांमध्ये प्रवास करता येणार आहे. त्यामुळे ठाणे, डोंबिवली आणि कल्याणमध्ये रिअल इस्टेटची मागणी वाढेल असा अंदाज आहे. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने (एमएमआरडीए) रिंगरोडचा आराखडा तयार केला आहे. या योजनेमुळे प्रमुख मार्गांवरील वाहतुकीचा ताण कमी होण्यास मदत होणार आहे. हे रिंग रोड 'एमएमआरडीए', महानगरपालिका आणि राज्य रस्ते विकास महामंडळ संयुक्तपणे विकसित करतील. हे रिंग रोड नरिमन पॉईंट येथे सुरू होतील. पहिला रिंग रूट नरिमन पॉईंटला कोस्टल रोडसह वरळी शिवडी कनेक्टर, इस्टर्न फ्री वे, ऑरेंज गेट टनेलला जोडेल आणि परत फिरून नरिमन पॉईंटवर संपेल. दुसरा रिंग रोड नरिमन पॉईंटला वांद्रे-वरळी सी लिंक, वेस्टर्न एक्स्प्रेस हायवे, सांताक्रूझ-चेंबूर लिंक रोड, ईस्टर्न एक्स्प्रेस हायवे, ईस्टर्न फ्री वे, ऑरेंज गेट टनेल यांना जोडेल आणि नरिमन पॉईंट येथे संपेल. तिसरा रिंग नरिमन पॉईंट ते वांद्रे वरळी सी लिंक, जोगेश्वरी विक्रोळी लिंक रोड, कांजूरमार्ग जंक्शन, ईस्टर्न फ्री वे, ऑरेंज गेट बोगदा या मार्गाचा अवलंब करेल आणि नरिमन पॉईंट येथे समाप्त होईल. चौथ्या रिंग रोड प्रकल्पात नरिमन पॉईंट, वांद्रे वरळी सी लिंक, गोरेगाव-मुलुंड लिंक रोड, ईस्टर्न फ्री वे, ऑरेंज गेट बोगदा आणि नरिमन पॉईंट येथे संपणारा मार्ग समाविष्ट असेल. हे मार्ग झाल्यास मुंबई आणखी गतिमान होईल.

भारताची अर्थव्यवस्था येत्या काही वर्षांमध्ये पाच ट्रिलियन डॉलरची असेल. त्यात महाराष्ट्राचा वाटा एक लाख ट्रिलियन डॉलरचा असावा, यासाठी प्रयत्न सुरू आहेत. त्यासाठी राज्यात पायाभूत सुविधांवर भर देण्यात आला आहे. मुंबई ही देशाची आर्थिक राजधानी आहे. मुंबईतून देशाच्या तिजोरीत सर्वाधिक कर जातो. त्यामुळे मुंबईत पायाभूत सुविधा निर्माण करण्यासाठी अधिक लक्ष आणि अधिक निधी दिला जात असेल, तर कुणाला पोटदुखी होण्याचे कारण नाही.

(लेखक अर्थशास्त्राचे निवृत्त प्राध्यापक आहेत.)

## वेध

विजय निचकवडे

# सौजन्य केवळ सप्ताहापुरते नसावे!

आम्ही सौजन्य विसरत चाललो आहोत. शासकीय नोकरीत असलेल्यांच्या कृतीतून याचे दर्शन घडल्यास जनता आणि प्रशासनातील समन्वय नक्कीच चांगला राहू शकतो. विशेषत्वाने जेथे सामान्य जनतेसोबतच राहून काम करावे लागते, तेथे सौजन्याची जाणीव असायलाच हवी. मात्र, काही जण हे विसरत चालले आहेत. सौजन्य सप्ताह साजरा करणाऱ्या राज्य परिवहन महामंडळातील महिला कर्मचाऱ्यांचे पुढे आलेले प्रताप बरेच काही सांगून जातात. राज्य परिवहन महामंडळाची लाल गाडी आमच्या जीवनाचा एक अविभाज्य भाग आहे. दळणवळणाची प्रमुख व्यवस्था म्हणून आम्ही त्याकडे पाहतो. खेडोपाडी जाण्यासाठी याच एसटी बसचा आधार आम्हाला असतो. या लेकुरवाळ्या एसटीमध्ये कधीकाळी सौजन्य दिसून येत होते. प्रवाशांशी आपुलकीने बोलणारे कर्मचारी डोळ्यास पडत होते. मात्र, आज महामंडळाच्या एसटी गाड्या जशा बदलल्या तशाच त्यात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांची मानसिकतासुद्धा बसलली. आता महामंडळाच्या एसटी बसमध्ये वाहक म्हणून काम करणाऱ्या महिलांचा आविर्भाव काही वेगळाच असतो. त्यांच्या बोलण्यातून आपुलकीचे दोन शब्द जरी ऐकायला आले, तरी धन्य झाल्यासारखे वाटेल, अशी परिस्थिती आज एसटीची आहे. एसटीत प्रवास करणाऱ्यांवर आपण उपकार करतो; कदाचित असाच आवेश त्यांचा असतो. यातून ज्या काही घटना पुढे आल्या, त्या महामंडळाला चिंतन करण्यास भाग पाडणाऱ्या आहेत.

एका महिला वाहकाने दुसऱ्या पुरुष वाहकाला शिवीगाळ केली. महिला वाहकाची मुजोरी एवढी की, चूक असतानाही पोलिसात जाऊन तक्रार करून मोकळी झाली. शेवटी बदलीपर्यंत प्रकरण आल्याने विषय मिटविला गेला. एका महिला वाहकाने तर विद्यार्थिनीचे केसच ओढून तिला मारहाण केली तर दुसरीने चिल्लर पैशाच्या कारणावरून एका तरुणाला भर बसस्थानकात प्रचंड मार दिला. या सगळ्या घटनांचे व्हिडीओ समाजमाध्यमांवर आले आणि एसटी महामंडळातील महिला वाहकांची वागणुकीची चर्चा सुरू झाली. पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून महिला काम करतात. महिलांना समान संधी मानणारे आम्ही आहोत. पण महिलांच्या या मुजोर व्यवहाराचे काय? एक वाहक म्हणून आपली काय जबाबदारी आहे, याचे भान त्यांना का नसावे? एखादा प्रवासी चुकला असेल, अडचणीत असेल तर त्यावर मारहाण किंवा केस ओढून वाद घालणे हाच उपाय योग्य आहे का? एकीकडे सामान्य लोकांची म्हणून गवगवा केला जातो आणि दुसरीकडे हा व्यवहार, विसंगत असाच वाटतो. महिला म्हणून आम्ही काहीही करू शकतो, असा आविर्भाव या वाहकांमध्ये असेल तर नक्कीच त्यांच्या कर्तव्याची जाणीव वरिष्ठांनी त्यांना करून देणे गरजेचे आहे.

राज्य परिवहन महामंडळ दरवर्षी सौजन्य सप्ताह साजरा करतो. प्रवाशांशी एक दिवस गोड बोलले जाते, फूल देऊन त्यांचे स्वागत केले जाते. या सौजन्य सप्ताहात प्रवाशांशी कसे वागले पाहिजे, याचे धडेही दिले जात असावेत; मग हा सौजन्य सप्ताह केवळ एका आठवड्यापुरताच का, असा प्रश्न पडतो. सप्ताह साजरा करूनही मानसिकता न बदलणारे कर्मचारी असतील तर मात्र असे कितीही सप्ताह साजरे झाले तरी त्यांच्या अंगी सौजन्य येणार नाही हे नक्की! महामंडळ तोट्यात आहे म्हणून नवनवीन कल्पना विकसित करून अधिकाधिक लोकाभिमुख होण्यासाठी शासन स्तरावरून प्रयत्न केले जातात. एसटीला 'विठाई'सारखे नाव देऊन लोकांच्या मनावर वेगळेपण बिंबविण्याचा प्रयत्न केला जातो. दुसरीकडे महामंडळातील 'या' विठाई आपल्या कृतीतून प्रवाशांना दुखावणार असतील तर मात्र शासनाचे प्रयत्न निष्फळ ठरतील, यात दुमत नसावे. मान्यच आहे, विविध तऱ्हेच्या लोकांना समजून घेताना मनस्ताप होतही असेल तर महामंडळात काम करताना लोकांशी कायम संपर्क येणार, याची जाणीव ठेवून आपण नोकरीचे व्रत स्वीकारले असेल. तेव्हा आपला हेकेखोर स्वभाव जर आपण बदलू शकणार नसू तर सामान्यांची म्हणविली जाणारी एसटी सामान्यांची कशी असेल? प्रवासी आहेत, म्हणूनच आपण आहोत, हा भाव जोपर्यंत कर्मचाऱ्यांच्या मनात दृढ होणार नाही, तोपर्यंत सौजन्य सप्ताहाचा हेतू साध्य होणार नाही, हे नक्की!

९७६३७१३४१७

## धर्म-संस्कृती

# श्रीगीता- क्षेत्र क्षेत्रज्ञ विभाग योग

प्रा. दिलीप जोशी

श्रीमद्भगवद्गीतेच्या तेराव्या अध्यायाचे नाव क्षेत्र क्षेत्रज्ञ विभाग योग आहे. श्रीगीतेचे एकूण १८ अध्याय आहेत. त्यांचे सहा सहा अध्यायाचे तीन विभाग किंवा खंड पाडले आहेत. ते वैदिक महावाक्य 'तत्त्वमसि'वर आधारित आहेत. हे विभाग जीव, ब्रह्म आणि जीवब्रह्मैक्य विशद करतात. अध्याय १ ते ६ या विभागाला कर्मयोग म्हणतात. ते 'त्वम्' म्हणजे जीव काय ते सांगतात. अध्याय ७ ते १२ ला भक्तियोग म्हणतात. ते 'तत्' म्हणजे ब्रह्म सांगतात आणि अध्याय १३ ते १८ ला ज्ञानयोग म्हणतात. ते 'असि' म्हणजे जीव आणि ब्रह्म यांचे ऐक्य सांगतात. शेवटच्या विभागातील तेराव्या अध्यायात क्षेत्र आणि क्षेत्रज्ञ याबाबत चर्चा आहे. सामान्यत: क्षेत्र हे भूखंड किंवा तत्सम स्थान, ठिकाण यांच्याशी संबंधित असते. त्यामुळे क्षेत्र म्हणजे तीर्थक्षेत्र असा समज होणे साहजिक आहे. पण इथे तो अर्थ नाही. क्षेत्र आणि क्षेत्रज्ञ या अध्यात्माशी संबंध असलेल्या बाबी आहेत.

एकदम सोप्या आणि सहज भाषेत सांगायचे तर क्षेत्र म्हणजे आपले शरीर आणि क्षेत्रज्ञ म्हणजे शरीरातील आत्मा. संत तुकाराम महाराजांचा एक अभंग आहे त्यात ''देह देवाचे मंदिर, आत आत्मा परमेश्वर'' यातून सहज लक्षात येईल किंवा ''चाले हे शरीर कोणाचिये सत्ते'' या एका सूत्रात हा योग समजून जाईल.

त्याचा विस्तारित अर्थ पुढे पाहूच, पण तूर्त क्षेत्र क्षेत्रज्ञ म्हणजे वरील अर्थ लक्षात घेऊ. फार जड होऊ नये म्हणून या अध्यायात काय आहे? तर जीवब्रह्म आणि जीवब्रह्मैक्य, आत्मा आणि अनात्मा, प्रकृती आणि पुरुष, क्षेत्र आणि क्षेत्रज्ञ या जोड्या एकाच अर्थांनी घेतल्या तर सोपे जाईल. खर सांगू! या अध्यायाची सुरुवात भगवंत कोणतीही प्रस्तावना न करता एकदम विषयाला हात घालतात.

भगवान म्हणतात.

**इदं शरीरं कौन्तेय क्षेत्रमित्यभिधीयते ।**
**एतद्यो वेत्ति तं प्राहुः क्षेत्रज्ञ इति तद्विदः ॥**

हे अर्जुना, या शरीराला क्षेत्र म्हणतात आणि या क्षेत्राचे ज्ञान असणारा, क्षेत्रावर सत्ता असणारा क्षेत्रज्ञ होय.

**क्षेत्रज्ञं चापि मां विद्धि सर्वक्षेत्रेषु भारत । क्षेत्रक्षेत्रज्ञयोर्ज्ञानं यत्तज्ज्ञानं मतं मम ॥**

लगेच भगवंत सांगतात की तो क्षेत्रज्ञ म्हणजे मी आहे. भगवान पुढे हेही स्पष्ट करतात की या क्षेत्र आणि क्षेत्रज्ञ यांचे नि:संशय ज्ञान होणे तेच खरे ज्ञान आहे.

**तत्क्षेत्रं यच्च यादृक्च यद्विकारि यतश्च यत् ।**
**स च यो यत्प्रभावश्च तत्समासेन मे श्रृणु ॥**

भगवान अर्जुनाला पुढे सांगतात की, या ज्ञानात शरीर म्हणजे क्षेत्र, क्षेत्राचे स्वरूप, क्षेत्राचे विकार, क्षेत्राचे कार्य तू समजून घे. त्याचप्रमाणे परमात्मा म्हणजे क्षेत्रज्ञ, क्षेत्रज्ञाचे स्वरूप, क्षेत्रज्ञाचा प्रभाव, माहात्म्य, सामर्थ्य याबाबत माझ्याकडून श्रवण कर. भगवंत त्याला क्षेत्राविषयी सांगतात. क्षेत्र म्हणजे शरीर कसे बनले?

**महाभूतान्यहङ्कारो बुद्धिरव्यक्तमेव च ।**
**इन्द्रियाणि दशैकं च पञ्च चेन्द्रियगोचराः ॥**

पंचमहाभूते, बुद्धी, अव्यक्त आणि अहंकार, पंच ज्ञानेंद्रिये आणि पंच कर्मेंद्रिये याशिवाय मन आणि पंच विषय हे सर्व २४ घटक मिळून क्षेत्र म्हणजे शरीर बनते. देवदुर्लभ अशा क्षेत्राचे विकार सांगून त्यातील सद्गुणांचे खरे ज्ञान भगवंत अर्जुनाला देतात. इच्छा, द्वेष, सुख-दु:ख, धृती अशा विविध विकारांनी भरलेले हे शरीर म्हणजे क्षेत्र असले तरी या क्षेत्रात एकापेक्षा एक असे दैवी गुण आहेत. त्याचे ज्ञान बहुतेकांना नसते आणि असले तरी त्यावर आचरण नसते. या अध्यायात भगवंतांनी हे क्षेत्रगुण ज्ञान मुद्दाम दिले.

**अमानित्वमदम्भित्वमहिंसा क्षान्तिरार्जवम् ।**
**आचार्योपासनं शौचं स्थैर्यमात्मविनिग्रहः ॥**

या देहात म्हणजे क्षेत्रात मानपानाचा त्याग करण्याचे सामर्थ्य आहे त्याला अमानित्व म्हणतात. याच क्षेत्रात क्षमाशीलता, अहिंसा, शुद्ध भाव, स्थिरता, स्वत:वर नियमन करण्याचे आणि सहनशक्तीचे सामर्थ्य आहे. वैराग्य, अहंकारापासून दूर राहता येणे इतकेच काय या क्षेत्रात जन्म-मृत्यू जरा आणि व्याधी आपल्याला येतातच हे माहीत असूनही त्यात दु:ख न पाहण्याची क्षमता आहे. आसक्ती, ममत्व आणि इष्ट किंवा अनिष्ट प्रसंगी समभाव ठेवण्याचे सामर्थ्य आहे. हे सर्व गुण प्रकट करण्यासाठी परमेश्वराप्रति अनन्य भाव ठेवण्याचे, एकांतवासात राहण्याचे सामर्थ्य या क्षेत्राला प्राप्त आहे.

**अध्यात्मज्ञाननित्यत्वं तत्त्वज्ञानार्थदर्शनम् ।**
**एतज्ज्ञानमिति प्रोक्तमज्ञानं यदतोऽन्यथा ॥**

अध्यात्मज्ञानात निरंतरता, तत्त्वज्ञानाची, यथार्थतेची जाणीव क्षमता क्षेत्रात म्हणजे शरीरात आहे. हे क्षेत्राचे सर्व गुण भगवंताने अर्जुनाला सांगितले. आणि या गुणांचे ज्ञान म्हणजेच खरे ज्ञान होय. इतर सर्व अज्ञान म्हटले आहे. भगवंतांनी क्षेत्र, त्याचे स्वरूप, त्याचे विकार आणि सद्गुण याचा विचार मांडला.

आता भगवंत ज्याच्यामुळे अमृततत्त्वाची प्राप्ती होते ते क्षेत्रज्ञ म्हणजे काय याबाबत अर्जुनाला ज्ञान दिले.

**सर्वतः पाणिपादं तत्सर्वतोऽक्षिशिरोमुखम् ।**
**सर्वतः श्रुतिमल्लोके सर्वमावृत्य तिष्ठति ॥**

तो क्षेत्रज्ञ कसा आहे तर त्याला सर्व बाजूंनी हात-पाय, डोळे, डोके, तोंड, कान आहेत. तसेच हा क्षेत्रज्ञ विश्वाला व्याप्त करून उरला आहे.म्‍ हणजे इंद्रिय गोचर, इंद्रियरहित आहे. क्षेत्रज्ञ म्हणजे परब्रह्म परमात्मा निर्गुण निराकार आहे. ते जसे देहात आहे तसे देहाबाहेरही, तोच व्याप्त आहे. जवळ आणि दूरही तोच आहे. संहार आणि उत्पन्न करणारा क्षेत्रज्ञच आहे. ज्योतीचे ज्योतीस्वरूप आणि अंधाराचाही अंधार तोच आहे.

**प्रकृतिं पुरुषं चैव विद्ध्यनादी उभावपि ।**
**विकारांश्च गुणांश्चैव विद्धि प्रकृतिसम्भवान् ॥**

आता भगवान क्षेत्र क्षेत्रज्ञ म्हणजे प्रकृती आणि पुरुष याबाबत सांगतात.

प्रकृती आणि पुरुष दोन्हीही अनादी असून प्रकृतीमधूनच वर सांगितलेले विकार आणि गुण निर्माण झाले आहेत. कार्य आणि कारण हे प्रकृतीतूनच निर्माण झाले आणि जीवनातील सुख-दुःखे भोगण्याला पुरुष कारण आहे. या देहात असणारा पुरुष देहापासून भिन्न आहे. तोच परमात्मा आहे. सर्व नाशिवंत पदार्थांमध्ये, भूतमात्रांमध्ये जो त्या अविनाशी परमेश्वराला म्हणजे क्षेत्रज्ञाला पाहतो तो खऱ्या अर्थाने भगवंत स्वरूप जाणतो.

**प्रकृत्यैव च कर्माणि क्रियमाणानि सर्वशः ।**
**यः पश्यति तथात्मानमकर्तारं स पश्यति ॥**

आपल्याकडून केली जाणारी कर्मे मी करीत नसून ती प्रकृतीकडून केली जातात. हे जो जाणतो तो आत्मस्वरूपाला प्राप्त होतो. हा परमात्मा अनादी, निर्गुण, अव्यय आणि अविनाशी आहे.

**म्या बोलविल्या वेदू बोले । म्या चालविल्या सूर्य चाले ।**
**म्या हालविल्या प्राणु हाले । तो जगाते चालवी ॥**

शरीर चालविणारा तो परब्रह्म परमात्मा म्हणून हा क्षेत्र क्षेत्रज्ञ योग आहे. लक्षात ठेवण्यासाठी हे शरीर म्हणजे क्षेत्र आणि त्यातील आत्मा म्हणजे क्षेत्रज्ञ होय.

९८२२२६२७३५

## आजचे संघगीत-१३

बुधवार, १५ ऑक्टोबर २०२५

### आम्ही हिंदू राष्ट्र सनातन

आम्ही हिंदू राष्ट्र सनातन, संघटना हे अमुचे जीवन ॥धृ॥

नर वानर एकत्र गुंफुनी संघटनेची विशाल काया
बुद्धिमंत हनुमंत उभारी दास्यमुक्तिचा भरुनी पाया
उल्लंघुनिया संकटसागर मर्दन केला ससैन्य रावण ॥१॥

संप्रदाय मतभेद माजले पाखंडाचा उधळे वारू
अद्वैताचा शंख फुंकुनी पूजी पंचायतन जगद्गुरू
विविधतेत एकता दाखवी आचार्यांचे अद्भुत दर्शन ॥२॥

थोर महंतांकरवी केली सहस्रावधी मठस्थापना
रामकथा ब्रह्मांड भेदुनी घुमवित होती दाहि दिशांना
समर्थ शिवशक्तिने नांदवी निर्भय स्त्री-मंदिर-गो-ब्राह्मण ॥३॥

मरगळलेल्या राष्ट्रामधली होता जागृत अमर चेतना
सप्तसिंधु ओलांडुन गेली हिंदुत्वाची सिंहगर्जना
दिली विवेकानंदे शिकवण समाजसेवा हे प्रभुपूजन ॥४॥

संघटनेस्तव संघटनेची अमृतविद्या सांप्रतकाळी
राष्ट्राचे संजीवन करण्या केशवरूपे जणु अवतरली
लक्षलक्ष तरुणांत स्फुरतसे सर्वस्वाचे सहज समर्पण ॥५॥

## वाचक पत्रे

### 'अमृत महोत्सवी' वर्षातील 'तरुण भारत'चे वेगळेपण


आज जिथे वाचकांची वानवा आहे तिथे एखादे वृत्तपत्र चालवणे कठीण, त्यात टिकून राहणे अजूनच कठीण. पण या सर्व परिस्थितीवर मात करीत तरुण भारत शताब्दी साजरी करतो हे कौतुकास्पद आहे. प्रत्येक वेळी वाचकांच्या आवडीचे काही द्यावे, सामाजिक, राजकीय, क्रीडा अशा बातम्यांसोबतच वाचकांना लेखक म्हणून घडवावे ते तरुण भारतने. काही वर्षांपूर्वी लोक म्हणायचे की हा पेपर एका विशिष्ट विचारसरणीचे लोकच वाचतात. पण आज तरुण भारत अगदी चहा टपरीपासून तर मोठ्यांच्या दिवाणखान्यात दिमाखात दिसतो.

यावर्षी तर मूल्य तेच ठेवून वाचकांसाठी खूप बौद्धिक, वैचारिक खाद्य आणले आहे. धर्म-अध्यात्म, कृषी, साहित्य-संस्कृती याचा अनोखा संगम विविध पुरवण्यांतून दिसून येतो. आपापल्या आवडीची पुरवणी वाचक वाचतात. दर आठवड्याची साहित्य-संस्कृती पुरवणी माझी अत्यंत आवडती आहे. यातील खास करून 'मन्याच्या काड्या' आम्हाला खूप आवडते. आमच्या घरी सामूहिक वाचन करतो व खूप हसतो. तसेच निसर्गभान, गावगाडा, स्पंदन, झुळूक, प्रासंगिक यासारखी सदरे आमच्यासह अनेक वाचकांच्या पसंतीस उतरत आहे. या पुरवणीचे संयोजक संजय रामगिरवार यांचे उत्तम नियोजन दिसून आले. तसेच धर्म-अध्यात्म पुरवणी ही संग्राह्य अशी आहे. शेतकऱ्यांना कृषी पुरवणी निश्चित आवडत असावी. तरुण भारतच्या या बदलाचे स्वागत आणि पुढील यशस्वी वाटचालीसाठी शुभेच्छा.

**प्रगती मुठाळ-जोशी**/८८३०४३५८४१

### मनपातर्फे स्वच्छ मोहल्ला स्पर्धा, १.६३ कोटींची बक्षीसे

नुकतीच तरुण भारतात उपरोक्त मथळ्याची बातमी वाचण्यात आली. मनपाने स्वच्छता स्पर्धा जी आयोजित केलेली आहे ती खरोखर स्पृहणीय आहे. त्याबद्दल मनपाचे मनापासून धन्यवाद. स्पर्धेत सहभागी होण्यासाठी ज्या मोहल्ल्यांमध्ये २०० ते ५०० घरे आहेत, ते या स्पर्धेसाठी अर्ज करू शकतात असा निकष ठेवण्यात आला आहे. या ऐवजी ही स्पर्धा झोनप्रमाणे घ्यायला पाहिजे असे वाटते. मोहल्ल्यातील स्वच्छतेचे मोजमाप करताना जे काही निकष मनपाने ठेवले आहेत, ते स्तुत्य आहेत. या स्पर्धेसाठी कालावधी निश्चित केलेला नाही. तो आवश्यक वाटतो. स्पर्धा जरी चांगल्या प्रकारची आहे, तरी पण प्रत्यक्ष प्रस्तावित कामे होतील का? कारण यासाठी जनजागृती



आवश्यक आहे. स्पर्धेच्या निकालासाठी काही प्रख्यात वास्तुशास्त्रज्ञ व अभियंते असावेत असे वाटते. उपरोक्त स्पर्धेसाठी एकूण १.६३ कोटींची बक्षीस असल्यामुळे यामध्ये राजकारण होऊ नये, ही अपेक्षा.

**शशिकांत दलाल**/९८२२३६५१९०

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास **९८५०७५३२८१** या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समूह संपादक : दिलीप यशवंत पेंडे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७१६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

# परभणी जिल्ह्यातील गाव-वाड्यांमधील पाणीपुरवठा योजनांची कामे वेळेत आणि दर्जेदार करावीत

## राज्यमंत्री मेघना साकोरे यांचे निर्देश

**परभणी/प्रतिनिधी-** परभणी जिल्ह्यातील गाव व पाड्यांना पाणीपुरवठा सुरळीत, नियमित व गुणवत्तापूर्ण व्हावा, यासाठी आवश्यक ती सर्व कामे वेळेत आणि दर्जे दार पद्धतीने पूर्ण करावीत, अशा सूचना पाणीपुरवठा व स्वच्छता राज्यमंत्री तथा परभणी जिल्ह्याच्या पालकमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांनी दिल्या.

मुंबई येथील निर्मल भवन येथे परभणी जिल्ह्यातील पाणीपुरवठा विषयक आढावा बैठक मंगळवारी (दि. १४) आयोजित करण्यात आली होती. यावेळी त्या बोलत होत्या. यावेळी महाराष्ट्र जलजीवन मिशनचे व्यवस्थापकीय संचालक ई. रवींद्रन उपस्थित होते. दूरदृष्टी संवाद प्रणालीद्वारे बैठकीत परभणी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नीतीशा माथुर तसेच संबंधित अधिकारी सहभागी झाले होते. या बैठकीमध्ये जलजीवन मिशन, जिल्हा परिषद आणि महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (एमजेपी) अंतर्गत राबविण्यात आलेल्या योजनांचा योजना-निहाय सविस्तर आढावा घेण्यात आला. ज्या योजना अपूर्ण आहेत त्या तत्काळ पूर्ण कराव्यात, तसेच ज्यांच्या सुधारित अंदाजपत्रकांची गरज आहे ती त्वरित मंजुरीसाठी सादर करावीत, अशा स्पष्ट सूचना राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांनी दिल्या. तसेच वस्सा, आडगाव, आसेगाव, दुधगाव या गावांसह १०० योजनांना फेरमान्यता देण्याबाबत निर्देश दिले. वाडी व तांडे यांचे अंदाजपत्रकेही लवकर पाठवावीत, असे सांगत परभणी जिल्ह्यातील नागरिकांना शुद्ध, स्वच्छ आणि पुरेशा प्रमाणात पाणी मिळेल याची खात्री करण्याचे सूचना त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या. अधिकाऱ्यांनी परभणी जिल्ह्यातील प्रकल्पांची सद्यस्थिती, प्रलंबित कामे तसेच पुढील नियोजन याबाबत सविस्तर माहिती सादर केली. राज्यमंत्री श्रीमती बोर्डीकर यांनी सर्व संबंधित विभागांना एकत्रित समन्वय ठेवून नागरिकांच्या पाणीपुरवठ्याशी संबंधित तक्रारींचे त्वरित निवारण करावे अशा सूचना दिल्या.



## संक्षिप्त वृत्त...

### सेवानिवृत्त न्यायालयीन कर्मचाऱ्यांची सामाजिक बांधिलकी

मुख्यमंत्री सहाय्यता निधीस १ लाख ४२ हजारांचा धनादेश सुपूर्द



**परभणी,/प्रतिनिधी :** अतिवृष्टीमुळे राज्यातील अनेक जिल्ह्यांतील शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले असताना, परभणी जिल्ह्यातील सेवानिवृत्त न्यायालयीन कर्मचारी व्हॉट्सअप गटाने सामाजिक जाणिवेचा आदर्श घालत मुख्यमंत्री सहाय्यता निधीसाठी १ लाख ४२ हजार १२८ रुपयांचा धनादेश आज जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण यांच्याकडे सुपुर्द केला. जिल्हाधिकारी चव्हाण यांनी या आर्थिक योगदानाबद्दल मनापासून कौतुक करत कर्मचाऱ्यांचे आभार मानले.

शेतकऱ्यांच्या संकट काळात मदतीचा हात पुढे करण्याचा निर्णय गटाने एकमताने घेतला. सदस्यांच्या स्वेच्छेने जमा केलेल्या या निधीमुळे सामाजिक बांधिलकीचे जिवंत उदाहरण निर्माण झाले आहे. गटाचे संयोजक म्हणाले, ''शेतकरी हा आपल्या समाजाचा कणा आहे. त्यांच्यावर संकट आले असताना आपणही समाजाचा भाग म्हणून योगदान देणे हीच खरी सामाजिक जबाबदारी आहे.'' या प्रेरणादायी कार्याचे जिल्हाभर कौतुक होत असून, सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या या योगदानाने समाजातील इतर घटकांनाही प्रेरणा मिळत आहे. या प्रसंगी मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी कक्षाचे वैद्यकीय अधिकारी डॉ. बालाजी इप्पर, समाजसेवा अधीक्षक संदीप निळकंठे, सहाय्यक महसूल अधिकारी नवनाथ मुतंगे आणि कक्ष समन्वयक अभिषेक दिवाण उपस्थित होते.

### धनगर समाजाच्या विद्यार्थ्यांना नामांकीत इंग्रजी माध्यमांच्या

निवासी शाळांमध्ये प्रवेशासाठी अर्ज करण्याचे आवाहन

**परभणी,/प्रतिनिधी:** सन २०२१-२२ पासून राज्य शासनाकडून धनगर समाजाच्या विद्यार्थ्यांना शहरातील इंग्रजी माध्यमांच्या नामांकीत निवासी शाळांमध्ये मोफत शिक्षण देण्याबाबत निर्णय घेण्यात आलेला आहे. परभणी जिल्ह्यातील इच्छुक भटक्या जमाती क प्रवर्गातील धनगर समाजातील विद्यार्थ्यांच्या पालकांकडून सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षाकरिता इंग्रजी माध्यमांच्या नामांकित निवासी शाळांमध्ये प्रवेश देण्याकरिता अर्ज मागविण्यात येत आहेत. सदर शाळांमध्ये प्रवेशित विद्यार्थ्यांना शिक्षण, निवास, भोजन, आरोग्य, शैक्षणिक साहित्य, शालेय गणवेश इ. सुविधा शासनाकडून मोफत पुरविण्यात येणार आहेत. प्रवेशाच्या अटी व शर्ती पुढीलप्रमाणे आहेत. सदर योजनेचा लाभ घेवू इच्छिणारा विद्यार्थी धनगर समाजातील असावा. विद्यार्थ्यांच्या पालकाने विद्यार्थ्यांचे नावे सक्षम प्राधिका-यांने दिलेल्या धनगर समाजाच्या दाखल्याची साक्षांकित प्रत सादर करावी. विद्यार्थ्यांचे पालकांचे वार्षीक उत्पन्न मर्यादा रु. १.०० लक्ष इतकी असावी. सन २०२५-२६ या वर्षात नविन विद्यार्थी १ ली ते ८ वी या इयत्तेत प्रवेशित असावा.

परभणी जिल्ह्यातील धनगर समाजाच्या विद्यार्थ्यांना शहरातील इंग्रजी माध्यमांच्या नामांकित निवासी शाळांमध्ये शिक्षण देण्याकरिता निवड झालेल्या व्हीजन पब्लिक इंग्लिश स्कुल, सोनपेठ ता. सोनपेठ जि.परभणी (प्रवेश संख्या-१००), हिरकणी सी.बी.एस.ई स्कुल, चोरवड, ता. पालम जि. परभणी (प्रवेश संख्या-१००), हायटेक प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, एरंडेश्वर, झीरो फाटा, ता. पूर्णा जि. परभणी (प्रवेश संख्या-१००), जिजामाता पब्लिक स्कुल, सोनपेठ ता. सोनपेठ जि. परभणी (प्रवेश संख्या-१००) या शाळेमध्ये प्रवेश घेण्यासाठी सन २०२५-२६ मध्ये विद्यार्थ्यांना अर्ज सादर करता येईल.

प्रवेश घेण्यास इच्छुक असलेल्या विद्यार्थ्यांच्या पालकांनी त्यांचे अर्ज २८ ऑक्टोबर, २०२५ पर्यंत (सुट्टीचे दिवस वगळून कार्यालयीन वेळेत) सहायक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण, परभणी यांचे नावे डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, जायकवाडी वसाहत, कारेगाव रोड, परभणी या कार्यालयात प्रत्यक्ष सादर करावेत. योजनेचा धनगर समाजातील जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी लाभ घेण्याचे आवाहन इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे सहाय्यक संचालक रामेश्वर मुंडे यांनी केले आहे.

### चव्हाणची जलतरण स्पर्धेसाठी निवड

**परभणी,/प्रतिनिधी:** येथील श्रीमती सरस्वती बाई भाले पाटील विद्यालयातील विद्यार्थी आदित्य लहू चव्हाण या ने विभागीय पातळीवर यश संपादन केले असून त्याची लातूर येथे होणाऱ्या शालेय राज्यस्तरीय ४०० मी. फ्री स्टाईल जलतरण स्पर्धेसाठी निवड करण्यात आली .

छत्रपती संभाजीनगर ( औरंगाबाद ) येथे पार पडलेल्या विभागीय स्पर्धेत आदित्य चव्हाण यांनी यश घव घवित यश संपादित केले. सरस्वतीबाई भाले पाटील विद्यालयाच्या वतीने विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री आनंदकुमार नांदगांवकर यांनी सत्कार केला. तसेच संस्थेचे अध्यक्ष ॲड. मुंजाजीराव भाले पाटील, गट शिक्षणाधिकारी मनोज चव्हाण यांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

सोलापूर तरुण भारत

कार्यालयाचा पत्ता- डॉ.लोया नेत्र रुग्णालयासमोर ढवळे यांचे निवासस्थान शिवाजी नगर, परभणी

तात्काळ प्रतिनिधी नेमणे आहे.

संपूर्ण मराठवाडयामध्ये झपाटयाने वाढणाऱ्या **दै.सोलापूर तरुण भारत** साठी परभणी जिल्हयात खालील ठिकाणी प्रतिनिधी नेमणे आहे.

**१.गंगाखेड-** तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी, ०२. **पूर्णा-** तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी ०३. **मानवत** - तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी,

०४. **पालम** - तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी ०५. **सेलू** - शहर प्रतिनिधी ताडकळस, बोरी, राणी सावरगाव, कौसडी, चारठाणा, वालूर या सर्व ठिकाणी तात्काळ प्रतिनिधीची नियुक्ती करावयाची आहे. पत्रकारितेतील अनुभव असलेल्या व दै.तरुण भारतसाठी काम करु इच्छिणाऱ्या प्रतिनिधींनी संपर्क साधावा.

**जिल्हा प्रतिनिधी- मोहन धारासूरकर**

९४ २३३२४६६५, ९२८४६६४४३०, ९२८४६९५५८३



## माजी राष्ट्रपती भारतरत्न डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम यांना जिल्हाधिकारी कार्यालयात अभिवादन

**परभणी,/प्रतिनिधी:** माजी राष्ट्रपती भारतरत्न डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम यांची जयंती जिल्हाधिकारी कार्यालयात साजरी करण्यात आली.

जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण यांनी त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी अनुराधा ढालकरी, उपजिल्हाधिकारी (निवडणूक) अरूणा संगेवार, जिल्हा पुरवठा अधिकारी विलास मुसळे, नानासाहेब भेंडेकर, प्रकाश गोरे यांच्यासह जिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते. यावेळी जिल्हाधिकारी कार्यालयात कलाम यांच्या अनेक आठवणींना उजाळा देण्यात आला होता.

### कापूस पिकाचा बागायतीत समावेश करा- आ.राजेश विटेकर यांची मागणी; मुख्यमंत्री यांना निवेदन सादर

**परभणी,/प्रतिनिधी:** कापुस शेतीचा बागायती वर्गवारीमध्ये समावेश करुन कापुस उत्पादक शेतकऱ्याना बागायती शेतीसाठी दिली जाणारी नुकसान भरपाईची रक्कम अदा करण्याचे निर्देश संबंधित विभागाला व्हावेत, अशी मागणी आमदार राजेश विटेकर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे निवेदनाद्वारे केली. पाथरी विधानसभा मतदार संघात अंदाजे ३ लाख ४० हजार हेक्टर क्षेत्रावर कपाशीची लागवड झालेली आहे. महसुल विभागाच्या वर्गवारी नुसार शासकीय अभिलेख्यात ज्या शेत जमिनीची वर्गवारी बागायती क्षेत्र म्हणुन केली आहे, त्या क्षेत्रावर कपाशीची लागवड झालेली दिसुन येते. त्यामुळे कापुस उत्पादक शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देतांना त्यांची वर्गवारी जिरायती क्षेत्र अशी करणे हा त्यांच्यावर अन्याय होणार आहे.

### शालेय मुलांना दिवाळी सुटटया मिळाल्या

**परभणी,/प्रतिनिधी:** दिपावली हा सण अवघ्या काही दिवसावर आला असल्यामुळे शहरासह जिल्हयातील बहुतांशी सर्वच शाळांना दिपावलीच्या सुटया मिळाल्या आहेत. तर सीबीएसई शाळांना मात्र दि.१७ ऑक्टोबर पर्यंत शाळा करावी लागणार आहे. त्यामुळे या चिमुकल्यांना आणखीन दोन दिवस शाळेत जावे लागणार अशी माहिती शाळेकडून मिळाली आहे.



**जिंतूर- मुख्यमंत्री ग्राम समृद्ध अभियानांतर्गत प्रा. आ केंद्र आडगाव अंतर्गत उपकेंद्र मानधनी येथे तालुका आरोग्य अधिकारी डॉक्टर जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली शिबिर आयोजित करून किशोरवयीन मुलींची तपासणी, थायरॉईड, यूरिक ॲसिड, सीबीसी इत्यादी सर्व समावेशक आरोग्य तपासणी करून आरोग्य शिक्षण देण्यात आले. समवेत सरपंच पांडुरंग सोपानराव तळेकर आरोग्य निरीक्षक श्री अमोल संभारे, ग्राम विकास अधिकारी जगन्नाथ राऊत, आरोग्य सेवक सखाराम हुलगुंडे आरोग्य सेविका श्रीमती संतोषी गोलेकर, ममता ठाकूर, लॅब टेक्निशियन, सुफियान पठाण आदी दिसत आहेत.**

### मोटार सायकल चोर पोलिसांच्या जाळयात

**परभणी,/प्रतिनिधी:** शहरातील नानलपेठ पोलिसात मोटरसायकल चोरी गेल्याची रविवारी (दि.१३) सायंकाळी नोंद करण्यात आली होती. या प्रकरणी पोलिस अधिक्षकांच्या मार्गदर्शनात नानलपेठ आणि स्थानिक गुन्हा शाखेचा समांतर तपास सुरू होता. या प्रकरणी सोमवारी मिळालेल्या गुप्त माहितीवरून आरोपी मोहन शामराव नवघरे (वय १९) रा.जिजामाता नगर परभणी यास गांधीपार्क परिसरात मोटरसायकलसह ताब्यात घेण्यात आले. आरोपीची चौकशी केली असता त्याने संबंधित गुन्हयातील मोटरसायकल चोरीची कबुली दिली. या कारवाईत आरोपीकडून हिरोहोन्डा स्पेल्डर कंपनीची अंदाजे ४०हजार रूपये किंमतीचे मोटरसायकल जप्त करण्यात आली. ही कारवाई पोलिस अधिक्षक रविंद्रसिंह परदेशी यांच्या मार्गदर्शनात आणि अप्पर पोलिस अधिक्षक सुरज गुंजाळ यांच्या नेतृत्वात ही कारवाई करण्यात आली होती.

## गोदाकाठच्या गावांत केली धुर फवारणी



**सोनपेठ,/प्रतिनिधी- :** प्राथमिक आरोग्य केंद्र सोनपेठ अंतर्गत तालुक्यातील शिरोरी, गंगा पिंपरी, थडीपिंपळगाव, वाडी पिंपळगाव, थडी उक्कडगाव आदी गोदाकाठच्या गावांमध्ये सोमवारी हायपोक्लोराइड फवारणी व धूर फवारणी करण्यात आली. तसेच गावामध्ये सर्व प्रकारच्या स्वच्छतेची तपासणी करण्यात आली.

अतिवृष्टी व महापुरामुळे गोदाकाच्या सर्वच गावांमध्ये पाणी साचून दल दल व चिकल तयार झाला आहे. साचलेल्या पाण्यामध्ये शेतीतील धान्य व गवत कुजून दुर्गंधी पसरली आहे. त्यामुळे डासांचा प्रादुर्भाव दिसून येत आहे. त्या अनुषंगाने ग्रामीण रुग्णालय सोनपेठ च्या वतीने तालुका आरोग्य अधिकारी सुभाष पवार यांच्या मार्गदर्शनाखाली गोदाकाठच्या गावांमध्ये जाऊन धूर फवारणी केली तसेच नागरिकांच्या घरोघरी जाऊन आरोग्याची माहिती घेतली. हिवताप, चिकनगुनिया आदी डासांपासून निर्माण होणाऱ्या आजारां बाबत आरोग्य शिक्षण दिले. यावेळी आढळलेल्या हिवताप आजारी रुग्णांवर औषधोपचार करण्यात आले.यावेळी उपस्थित वैद्यकीय अधिकारी डॉ. राहुल चव्हाण, डॉ. सचिन राठोड, डॉ.अनिल ममाने, आरोग्य सहाय्यक बी. जे. गायकवाड, पी. एस. चव्हाण, पी. आर. जाधव, आरोग्य कर्मचारी आशुतोष डूबे, गजानन राठोड, वर्ष वावळे व वाहन चालक बाळू बिडवे यांनी आढळून आलेल्या विविध प्रकारच्या रुग्णांवर उपचार केले.

## प्रभाग (०८) मध्ये बिलाल मिलन न.पा. निवडणूक लढविणार ! बीलाल यांच्या उमेदवारीची जोरदार चर्चा

**मानवत / प्रतिनिधी-** मानवत नगर परिषद निवडणुकीची चाहूल लागताच प्रभाग क्रमांक आठ (०८) मध्ये नव्या उमेदवारांबाबत चर्चा रंगू लागली आहे. या प्रभागातून उद्योजक मोहम्मद बिलाल मोहम्मद युनुस बागवान (मिलन) हे इच्छुक उमेदवार असल्याची चर्चा सध्या शहरात जोर धरत आहे.

मानवत नगर परिषदेच्या निवणूकीचे बीगूल वाजले असून प्रभाग (०८) आठ मधून अनेक दिग्गज निवडणूक लढविणार असून या प्रभागात नवा चेहरा म्हणून यूवा नेते बिलाल मिलन हे शहरातील प्रस्थापित उद्योजक असून नवा मोंढा येथे त्यांच्या वडिलांची कापसाची मोठी जिनिंग आहे. ते अतिशय शांत, नम्र आणि सर्वांसोबत हसतमुख राहणारे व्यक्तिमत्त्व म्हणून शहरात ओळखले जातात. समाजातील सर्व घटकांशी त्यांचा चांगला सलोख्याचा संबंध असून, गरजवंतांच्या सुख दुःखात नेहमी अग्रेसर व धावून जाणारे म्हणून त्यांची प्रतिमा शहरात आहे. मानवत नगर परिषदेच्या प्रभाग क्रमांक (०८) आठमध्ये त्यांचा लोक समाज संपर्क दांडगा असल्याने निवडणूक लढविणे हे त्यांच्या दृष्टीने तुलनेने सोपे ठरेल, असे युवा मतदारासह या प्रभागातील नागरिकांचे मत आहे. अनेक नागरिकांनी ''बिलाल मिलन यांना संधी मिळाली तर प्रभागातील अनेक प्रलंबित प्रश्न मार्गी लागतील,'' अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.



दरम्यान, मानवत शिंदे गटाच्या वतीने बिलाल मिलन यांना उमेदवारी मिळण्याची शक्यता वर्तविली जात आहे. नगराध्यक्ष पदाचे उमेदवार बालाजी कुऱ्हाडे यांचाही प्रभाग क्रमांक आठमध्ये बिलाल मिलन यांच्या उमेदवारीवर विशेष भर असल्याचे नागरिकांतून चर्चा आहेत. बिलाल मिलन यांना पक्षाची उमेदवारी मिळाल्यास युवकांमध्ये नवीन ऊर्जा निर्माण होईल, तसेच नगराध्यक्ष पदाच्या उमेदवाराला या प्रभागातून मोठ्या प्रमाणावर मतदान मिळण्याची शक्यता असल्याचे राजकीय वर्तुळात चर्चेला उधान आले आहे.

# बळीराजाचा ऊस बील तीसरा हप्ता दिपावली सणांकरीता रु.९ कोटी २८ लाख रक्कम ऊस बागायतदार शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा

**पूर्णा /प्रतिनिधी-** कारखान्याने गळीत हंगाम २०२४-२५ मध्ये एकुण ५७१७७२.६५९ मे. टन ऊसाचे गाळप करुन सरासरी एकुण ६३३५५०क्विंटल साखर उत्पादन केले आहे. त्याप्रमाणे सरासरी साखर उतारा ११.४८ आलेला आहे.

त्या अन्वये कारखान्याने शेतक-यांना पहीली उचल म्हणून रु.२५०० प्रति मे.टन व दुसरी उचल रु ३०० प्रति मे. टन तसेच तीसरी अंतिम उचल प्रति मे.टन रु १६२.३१ प्रमाणे अशी एकुण रक्कम एफ.आर.पी प्रमाणे रु २९६२.३१ प्रति मे.टन प्रमाणे गळीत हंगाम २०२४-२५ साठी शेतक-यांच्या बँक खाती वर्ग करण्यात आलेली आहे याची सर्व शेतक-यांनी नोंद घ्यावी,



बळीराजा साखर कारखाना लि. कानडखेड ता. पुर्णा जि. परभणी यांनी गळीत हंगाम २०२४-२५ मध्ये सर्व ऊस पुरवठादार शेतक-यांना ऊस बील तीसरा हप्ता म्हणुन प्रति मे.टन रु १६२.३१ प्रमाणे रु.९२८.०४ लाख ऐवढी रक्कम शेतक-यांच्या बैंक खाती जमा केली आहे. तसेच गळीत हंगाम २०२५-२६ साठी १०७०० हेक्टर ऊसाची नोंद शेतकी विभागाकडे झालेली आहे. त्या अन्वये कारखान्याची यावर्षी गाळप क्षमता वाढवलेली असल्याने कार्यक्षेत्रातील सर्व ऊस बागायतदार शेतक-यांनी ऊस गाळपास जाण्याची काळजी करु नये, सभासदांचे ऊस गाळप झाल्यानंतर बिगर सभासद शेतक-यांचा ऊस गाळपास आणला जाईल व गळीत हंगाम २०२५-२६ शासन निर्णयानुसार दिनांक ०१ नोव्हेंबर २०२५ पासुन प्रत्यक्ष गाळपास सुरुवात होईल याची सर्व ऊस उत्पादक बागायतार शेतक-यांनी नोंद घ्यावी. असे अहवान चेअरमन शिवाजी भगवानराव जाधव व कार्यकारी संचालक अजय शिवाजीराव जाधव यांनी केले आहे.

धाराशिव • दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# मुरुम येथे मुलीवर लैंगिक अत्याचार

**तभा वृत्तसेवा**
**मुरूम, दि.१५ ऑक्टोबर**

मुरुम पोलीस ठाणे अंतर्गत एका गंभीर प्रकरणाची नोंद करण्यात आली आहे. दि. ८ ऑक्टोबर २०२५ रोजी दुपारी १२.३० वाजता १७ वर्षीय मुलीला (नाव गोपनीय) गावातील एका तरुणाने तिसऱ्या लॉजवर घेऊन जाऊन लैंगिक अत्याचार केला.



घटनेनंतर आरोपीने पीडितेला धमकी दिली की, जर तिने हा प्रकार कुणालाही सांगितला, तर तिचा आणि तिच्या आईचा जीव धोक्यात येईल.

पीडितेच्या तक्रारीनंतर १४ ऑक्टोबर २०२५ रोजी भा.न्या.सं. कलम ६४, ३५१(२) तसेच कलम ४, ८, १२ पोक्सो अन्वये गुन्हा नोंदवण्यात आला आहे.


पोलीस अधिकाऱ्यांच्या म्हणण्यानुसार, आरोपीच्या शोधासाठी त्वरित कारवाई सुरू असून, तपास चालू आहे.

## संक्षिप्त वृत्त...



### पालकमंत्री प्रताप सरनाईक यांच्याकडून श्री तुळजाभवानी देवींची अभिषेक पूजा

**तुळजापूर, दि.१५ ऑक्टोबर -**
धारशिवचे पालकमंत्री प्रताप सरनाईक यांनी आज सकाळी सहकुटुंब श्री तुळजाभवानी देवींचे दर्शन घेतले. सकाळी त्यांनी श्री तुळजाभवानी मंदिरात जाऊन देवींची विधीवत अभिषेक पूजा केली. अभिषेक पूजेनंतर त्यांनी श्री तुळजाभवानी देवींच्या नित्य आरतीमध्ये सहभागी होत देवीच्या दर्शनाचा लाभ घेतला. या प्रसंगी त्यांच्या कुटुंबातील सर्व सदस्य उपस्थित होते. पालकमंत्री सरनाईक यांनी श्री तुळजाभवानी देवीसमोर राज्यातील जनतेच्या सुख, समृद्धी आणि कल्याणासाठी प्रार्थना केली. यावेळी तहसीलदार तथा व्यवस्थापक (प्रशासन) माया माने यांनी श्री तुळजाभवानी मंदिर संस्थानच्यावतीने पालकमंत्री प्रताप सरनाईक यांचे स्वागत केले. यावेळी मंदिर संस्थानचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.



### ज्ञानदीप विद्यालयात माजी विद्यार्थी संघाची स्थापना

**मुरूम, दि.१५ ऑक्टोबर -**
दाळीबं येथील ज्ञानदीप विद्यालयात दि.१३ ऑक्टोबर रोजी माजी विद्यार्थी संघाची स्थापना करण्यात आली. या संघाच्या अध्यक्षपदी माजी विद्यार्थी दिगंबर जाधव यांची एकमताने निवड करण्यात आली. उपाध्यक्षपदी माजी विद्यार्थीनी अनिता ठेंगल, सचिवपदी शाळेचे मुख्याध्यापक एस.बी. गुंजोटे, कोषाध्यक्षपदी जावेद शिलार यांची निवड झाली. तसेच सल्लागार म्हणून उपक्रमशील शिक्षक डी.एस. तंगशेट्टी, सेवानिवृत्त शिक्षक टी.के. गुंजकर, गावातील अधिकारी अभिमन्यू गायकवाड आणि पालक प्रतिनिधी संतोष माने यांची निवड करण्यात आली. कार्यक्रमाचे अध्यक्ष मुख्याध्यापक एस.बी. गुंजोटे यांनी माजी विद्यार्थी संघाचे ध्येय, धोरणे आणि शासनाची भूमिका याबाबत मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे आभार बी.एन. लोहार यांनी मानले.



### मीना सोमाजी यांची शिवसेना जिल्हा महिला प्रमुखपदी नियुक्ती

**तुळजापूर, दि.१५ ऑक्टोबर -**
शिवसेना पक्षप्रमुख व मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या आदेशानुसार, तसेच पक्ष सचिव संजय मोरे यांच्या स्वाक्षरीने धाराशिव जिल्ह्यातील तुळजापूर व उमरगा-लोहारा विधानसभा क्षेत्रासाठी मीनाताई सोमाजी यांना शिवसेना महिला जिल्हाप्रमुख म्हणून पालकमंत्री प्रताप सरनाईक यांच्या हस्ते नियुक्तीपत्र देण्यात आले. याप्रसंगी जिल्हा प्रमुख मोहन पणुरे, तालुकाप्रमुख अमोल जाधव व महिला पदाधिकारी आणि शिवसैनिक उपस्थित होते. मीना सोमाजी यांच्या नियुक्तीमुळे महिला सेनेला नवे बळ लाभणार असून महिला वर्गाच्या प्रश्नांसाठी तसेच पक्षविस्तार व संघटनात्मक काम करण्यासाठी ही नियुक्ती नवसंजीवनी देणारी आहे.

# नळदुर्ग प्राथमिक आरोग्य केंद्राची दुरवस्था; इमारतीत घाणीचे साम्राज्य

## बंद आरोग्य केंद्राच्या इमारतीत सुरु 'बाळासाहेब ठाकरे दवाखाना'; रुग्णांच्या आरोग्यास धोका




**तभा वृत्तसेवा / विलास येडगे**
**नळदुर्ग, दि.१५ ऑक्टोबर -**

नळदुर्ग येथील प्राथमिक आरोग्य केंद्राची (PHC) इमारत सध्या पूर्णपणे दुरवस्थेत असून सर्वत्र घाणीचे साम्राज्य पसरले आहे. दरवाजे, खिडक्या तुटल्या असून परिसरात कचऱ्याचे ढीग आहेत. याच जीर्ण इमारतीच्या एका बाजूला बाळासाहेब ठाकरे दवाखाना सुरु करण्यात आला असून, येथे येणाऱ्या रुग्णांचे आरोग्य धोक्यात येत असल्याची चिंता नागरिक व्यक्त करत आहेत.



पोस्ट ऑफिसच्या शेजारी आणि ऐतिहासिक किल्ल्याच्या परिसरात वसलेले हे आरोग्य केंद्र १ सप्टेंबर १९८४ पासून सुरु होते. मात्र नोव्हेंबर २०२४ मध्ये हे केंद्र बंद करून मसला खुर्द (ता. तुळजापूर) येथे हलविण्यात आले. त्यानंतर केवळ एका वर्षातच या इमारतीची अवस्था अतिशय बिकट झाली आहे.

वैद्यकीय अधिकारी, परिचारक आणि कर्मचाऱ्यांची निवासस्थाने तुटफुटीच्या अवस्थेत असून, संपूर्ण परिसर काटेरी झुडपे व गवतात झाकला गेला आहे. रुग्ण तपासणी कक्ष, ऑपरेशन थिएटरसह इतर विभागांची इमारतही उद्ध्वस्त अवस्थेत आहे. एकेकाळी दररोज शेकडो रुग्णांवर उपचार होणाऱ्या या ठिकाणी आज फक्त घाण आणि पडझड दिसते.

आरोग्य केंद्राच्या सुरक्षाभिंतीच्या दोन-तीन ठिकाणी भगदाड पडले आहेत.

इतक्या अस्वच्छ वातावरणात बाळासाहेब ठाकरे दवाखाना सुरु असल्याने येथील रुग्णांच्या आरोग्यावर प्रतिकूल परिणाम होण्याची शक्यता आहे.

स्थानिक नागरिकांनी आरोग्य विभागाकडे मागणी केली आहे की, या इमारतीची तात्काळ दुरुस्ती व स्वच्छता मोहीम राबवावी, तसेच या ठिकाणी दुसरे एखादे शासकीय युनिट सुरु करावे.

अन्यथा ही इमारत पुढील काळात पूर्णपणे नामशेष होऊन अतिक्रमणाच्या विळख्यात जाण्याची शक्यता असल्याची भीती व्यक्त केली जात आहे.

# तेरखेडा येथे वाहन कोंडी; पुलाखाली मनमानी पार्किंग

## एस.टी. बस सह अन्य वाहतुकीला मोठी अडचण

**तभा वृत्तसेवा**
**वाशी, दि.१५ ऑक्टोबर -**

धाराशिव जिल्ह्यातील तेरखेडा हे दिवाळीच्या काळात फटाक्यांची प्रसिद्ध बाजारपेठ ओळखले जाते. राज्यासह परराज्यातून व्यापारी आणि ग्राहक मोठ्या प्रमाणावर येथे येत आहेत. मात्र, व्यापाराची ही भरभराट आणि गर्दी वाढत असताना वाहतूक व्यवस्थापनाचा पूर्ण अभाव जाणवत आहे.

तेरखेडा येथील पुलाखाली मोठ्या प्रमाणावर चारचाकी आणि इतर वाहने उभी केली जात आहेत. या अनियमित पार्किंगमुळे रस्ता अरुंद झाल्याने वाहनांची मोठी कोंडी होत आहे. फटाके खरेदीसाठी आलेल्या नागरिकांसह स्थानिकांना याचा मोठा त्रास सहन करावा लागतो. या वाहन कोंडीचा सर्वात मोठा फटका एस.टी. बस सह अन्य वाहतुकीला बसत आहे. पुलाखालून बस नेणे अशक्य झाल्याने बसचालकांना बस थेट ब्रिजवरून नेण्याशिवाय पर्याय राहत नाही.



ब्रिज संपल्यावर बस थांबवण्यासाठी योग्य जागा नसल्याने प्रवाशांना रात्री अपरात्री घाईघाईने उतरावे लागते. वृद्ध, महिला आणि विद्यार्थ्यांना यात मोठी अडचण निर्माण होते. बस थांबवण्याची सुरक्षित सोय नसल्याने बसचालकही त्रस्त आहेत. इतकी मोठी फटाक्यांची उलाढाल होत असतानाही प्रशासनाकडून कोणतीही वाहतूक नियंत्रणाची काळजी घेतली जात नाही. महामार्ग पोलिसांचेही लक्ष या भागाकडे नसल्याने नागरिकांमध्ये असंतोष निर्माण झाला आहे. स्थानिक नागरिकांचे म्हणणे आहे की, बाजारपेठेत येणाऱ्या गर्दीचे स्वागत असले तरी वाहतुकीचा ठोस विचार न केल्यास हा गोंधळ दरवर्षी वाढतच जाणार आहे.

प्रशासनाने स्वतंत्र पार्किंगची सोय, वाहतूक नियंत्रणासाठी पोलिस बंदोबस्त आणि बसथांब्यांची सुरक्षित व्यवस्था तातडीने करावी, अशी मागणी स्थानिकांकडून जोर धरू लागली आहे.

# नळदुर्ग नगरपालिकेच्या मतदार याद्यांमध्ये गंभीर त्रुटी : बोगस मतदानाची शक्यता

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.१५ ऑक्टोबर -**

नळदुर्ग नगरपालिकेच्या निवडणुकीसाठी तयार करण्यात आलेल्या प्रारूप मतदार याद्यांमध्ये गंभीर त्रुटी आढळून आल्या आहेत. अनेक मयत व्यक्तींची नावे, एका मतदाराची दोन प्रभागात नोंद तसेच बाहेरील व्यक्तींची नावे समाविष्ट झाल्याचे निदर्शनास आले आहे. या त्रुटींमुळे आगामी निवडणुकीत बोगस मतदानाची शक्यता वाढली असल्याची नागरिकांत चर्चा आहे.

प्रत्येक प्रभागाच्या याद्यांमध्ये या चुका आढळत असून काही नावे सोयीसाठी एका प्रभागातून दुसऱ्यात हलविण्यात आल्याचीही तक्रार आहे. काही माजी नगरसेवकांकडून मोठ्या प्रमाणात सामूहिक हरकती दाखल करण्यात आल्या असून या प्रक्रिया नियमबाह्य असल्याचे प्रशासनिक सूत्रांचे म्हणणे आहे. या चुकांमुळे अनेक कुटुंबांच्या नावांमध्ये विसंगती निर्माण झाली आहे - वडिलांचे नाव एका प्रभागात तर मुलांचे नाव दुसऱ्या प्रभागात असल्याचेही उदाहरण आढळले आहे. त्यामुळे नागरिकांमध्ये गोंधळाचे वातावरण निर्माण झाले आहे. नळदुर्ग नगरपालिका प्रशासनाने हरकतींची मुदत संपल्यानंतर प्रत्यक्ष सॉफ्टवेअरवर जाऊन पडताळणी करून मयत, दुबार किंवा बाहेरील मतदारांची नावे वगळावीत, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

# अणदूर पंचायत समिती गणातून नागनाथ घोडके निवडणूक लढवणार

**तभा वृत्तसेवा**
**इटकळ, दि.१५ ऑक्टोबर -**

धनगरवाडी येथील कार्यकुशल तरुण सरपंच नागनाथ घोडके यांनी अणदूर पंचायत समिती गणातून निवडणूक लढवण्याची घोषणा केली आहे. नुकतीच तुळजापूर तालुक्यात जिल्हा परिषद आणि पंचायत समिती आरक्षण सोडत पार पडली असून, या पार्श्वभूमीवर त्यांनी प्रतिनिधीशी बोलताना आपला निर्णय जाहीर केला.

सरपंच म्हणून नागनाथ घोडके यांनी गावात विविध समाजोपयोगी आणि विकासात्मक कामे करून स्वच्छ प्रतिमा निर्माण केली आहे. गाव परिसरातील नागरिकांच्या आग्रहास्तव ते अणदूर पंचायत समिती गणातून उमेदवारी अर्ज दाखल करणार आहेत.

# 'लेक लाडकी' अभियान व 'पर्याय' संस्थेतर्फे अतिवृष्टीग्रस्त महिलांना दिलासा

**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि.१५ ऑक्टोबर -**

धाराशिव जिल्ह्यात झालेल्या अतिवृष्टी आणि पुरामुळे अनेक कुटुंबांचे संसार उद्ध्वस्त झाले. या आपत्तीमध्ये सर्वाधिक फटका बसलेल्या महिलांना मदतीचा हात देण्यासाठी 'लेक लाडकी अभियान महाराष्ट्र' आणि 'पर्याय सामाजिक संस्था' यांच्या वतीने २०० किराणा किट व जीवनावश्यक वस्तूंचे वाटप करण्यात आले.

ही मदत वाटपाची मोहीम दिनांक १२ ऑक्टोबर रोजी पर्याय संस्था प्रशिक्षण केंद्र, हासेगाव (ता. केज) येथे पार पडली. 'लेक लाडकी अभियान'च्या प्रमुख ॲड. वर्षाताई देशपांडे आणि त्यांच्या टीमने सातारा



जिल्ह्यातील विविध संस्था, संघटना आणि दानशूर व्यक्तींमार्फत ही मदत गोळा केली. त्यानंतर स्वखर्चाने टेम्पोद्वारे साहित्य हासेगाव येथील पर्याय संस्था कॅम्पस येथे आणून पुरग्रस्त महिलांना वितरित करण्यात आले. या उपक्रमात ज्या कुटुंबांचे संसार उघड्यावर आले तसेच एकल महिला, विधवा महिला यांनाही मदतीचा लाभ देण्यात आला. या वेळी बोलताना ॲड. वर्षा देशपांडे म्हणाल्या की, अतिवृष्टीग्रस्त कुटुंबांना मदत करणे ही शासनाची जबाबदारी आहे. ज्या गावांमध्ये घर, शाळा आणि अंगणवाडी केंद्रांचे नुकसान झाले आहे, त्याचा सविस्तर पंचनामा करून योग्य मदत मिळाली पाहिजे. शेतकऱ्यांच्या पिकांचे व जमिनींचे मोठे नुकसान झाले असून त्यांनाही भरीव मदत मिळाली पाहिजे, असे त्या म्हणाल्या.

कार्यक्रम पर्याय सामाजिक संस्थेचे कार्यवाहक विश्वनाथअण्णा तोडकर यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीरीत्या पार पडला. या मदत वितरण मोहिमेत विलास गोडगे, भिकाजी जाधव, बालाजी शेंडगे, सुनंदा खराटे, विकास कुदळे, रोहिणी कोठावळे, रियाज शेख, वैभव चोंदे, कल्पना जतकर, आशाबाई तोडकर, माया लडके, अशोक शिंदे, दिगंबर लडके यांनी सक्रिय परिश्रम घेतले.

# मंगरुळ : मांजरा शुगरच्या तिसऱ्या गळीत हंगामाचा भव्य शुभारंभ

## शेतकऱ्यांच्या जीवनात आर्थिक क्रांती घडविणाऱ्या कारखान्याचा नवीन गळीत हंगाम जल्लोषात सुरु...

**तभा वृत्तसेवा**
**मंगरूळ, दि.१५ ऑक्टोबर -**

तालुक्यातील मंगरुळ येथील मांजरा (कंचेश्वर) शुगर प्रा. लि. या साखर कारखान्याच्या तिसऱ्या गळीत हंगामाचा शुभारंभ राज्याचे माजी मंत्री व सहकार महर्षी दिलीपराव देशमुख आणि लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे चेअरमन धीरज विलासराव देशमुख यांच्या हस्ते मंगळवारी मान्यवरांच्या उपस्थितीत शानदार सोहळ्यात संपन्न झाला.

या प्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून धाराशिव जिल्हा परिषदेचे माजी सभापती मुकुंदराव डोंगरे, बालिश डोंगरे, अशोक बचाटे, विजय डोंगरे, तुळजापूरचे तहसीलदार अरविंद बोळंगे, विशेष लेखा परीक्षक विष्णू डोके, विलास साखर कारखान्याचे उपाध्यक्ष व माजी आमदार वैजनाथ शिंदे, राज्य साखर महासंघाचे संचालक आबासाहेब पाटील, मांजरा शुगरचे उपाध्यक्ष अशोक काळे, तसेच विविध साखर कारखान्यांचे प्रतिनिधी, अधिकारी व मान्यवर उपस्थित होते.

यावेळी बोलताना माजी मंत्री दिलीपराव देशमुख म्हणाले, मांजरा शुगर कारखाना या गळीत हंगामात शेतकऱ्यांच्या उसाचे पूर्ण क्षमतेने गाळप करणार असून कारखान्याची सर्व तयारी पूर्ण झाली आहे. परिसरातील उस उत्पादक शेतकऱ्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी कारखाना कटिबद्ध आहे. यासाठी कारखान्याच्या कार्यक्षेत्रात ६०० हेक्टर क्षेत्रावर एआय तंत्रज्ञानाचा वापर सुरू करण्यात आला आहे, असे ते म्हणाले.

### कर्मचाऱ्यांना १० टक्के बोनसची घोषणा...

दिवाळीच्या पार्श्वभूमीवर मांजरा शुगर कारखान्यातील सर्व कर्मचाऱ्यांना १० टक्के बोनस देण्यात येणार असल्याची घोषणा माजी मंत्री सहकार महर्षी दिलीपराव देशमुख यांनी केली.

या कार्यक्रमात २०२५-२६ च्या गळीत हंगामासाठी बॉयलर पूजन आणि तिसऱ्या हंगामाचा शुभारंभ करण्यात आला. कारखान्याने नव्याने घेतलेल्या १० हार्वेस्टर व एनफिल्डर मशीनचे पूजनही मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी २०२४-२५ च्या हंगामात सर्वाधिक उस तोडणी, वाहतूक आणि उस पुरवठा केलेल्या शेतकऱ्यांचा व ठेकेदारांचा माजी मंत्री दिलीपराव देशमुख आणि चेअरमन धीरज देशमुख यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.




कार्यक्रमास लातूर जिल्हा बँकेचे कार्यकारी संचालक हणमंत जाधव, मांजरा साखर कारखान्याचे कार्यकारी संचालक पंडित देसाई, मारुती महाराज साखर कारखान्याचे कार्यकारी संचालक सुधाकर बहीर, जागृती शुगरचे सरव्यवस्थापक गणेश येवले, मुख्य शेतकी अधिकारी रामानंद कदम, मीडिया समन्वयक हरिराम कुलकर्णी, सचिन दाताळ, ॲड. बाबासाहेब गायकवाड, लातूर बाजार समितीचे संचालक वाघमारे, बालाजी साळुंखे, संभाजी सुळ आदींसह शेकडो उस उत्पादक शेतकरी, अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

सोलापूर तरुण भारत

www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# जन शिक्षण संस्थान बीड व एम एस एम ई छत्रपती संभाजीनगर यांच्या सहयोगाने पीएम विश्वकर्मा लाभार्थ्यांसाठी जाणीव जागृती कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१४ ऑक्टोबर**

दिनांक १४ ऑक्टोबर २०२५ रोजी जन शिक्षण संस्थान बीड येथे पीएम विश्वकर्मा लाभार्थ्यांसाठी जाणीव जागृती कार्यक्रम संपन्न झाला. याप्रसंगी मा. श्री शिवकुमार स्वामी (निवासी उपजिल्हाधिकारी), खादी ग्रामोद्योग मंडळाचे अधिकारी मा .श्री डी व्ही फताटे, मा .श्री राहुल कुमार मिश्रा ,(असिस्टंट डायरेक्टर एम एस एम ई छ.संभाजीनगर) मा .श्री गंगाधर देशमुख, (संचालक जन शिक्षण संस्थान बीड), श्री विजय सेलवटकर ,(चीफ मॅनेजर स्टेट बँक ऑफ इंडिया बीड), श्री लखन सिंग मालविया( असिस्टंट सुप्रिडेंट बीड) मा. श्री सतीश खरात, मा.सेवानिवृत्त प्राचार्य मन्मथ आप्पा हेरकर उपस्थित होते .मा. श्री राहुल कुमार मिश्रा यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. लखन सिंग मालविया यांनी या योजनेच्या सर्व लाभार्थ्यांना कर्ज कर्ज देण्यासाठी खूप




सोपे पोर्टल केल्यामुळे अनेक लाभार्थ्यांना कर्ज देणे आम्हाला सोयीस्कर झाले. जे लोक बँकेपर्यंत पोहोचले व त्यांचे सिबिल चांगले आहे त्यांना कर्ज मिळाले. सर्वच लाभार्थी त्याची व्यवस्थित परतफेड करत असल्याचे समाधान त्यांनी व्यक्त केले.

ह्या योजनेचा लाभ घेऊन तुम्ही तुमचा व्यवसाय वाढवू शकता असे सांगितले. मा. शिवकुमार स्वामी यांनी उपस्थितांना उद्योजकीय मार्गदर्शन केले. मा.श्री गंगाधर देशमुख यांनी उपस्थितांना व्यावसायिक मार्गदर्शन केले .मा. श्री सतीश जी खरात यांनी कर्जांच्या विविध योजना कर्ज प्रक्रिया व त्यासाठी लागणारे कागदपत्र याबाबत पावर पॉइंट द्वारा सविस्तर माहिती दिली मा. श्री मन्मथआप्पा हेरकर यांनी उत्तम उद्योजक होण्यासाठी आवश्यक असणारे गुण विविध उदाहरणाद्वारे उपस्थित लाभार्थींना समजावून सांगितले. कार्यक्रमासाठी बार्बर, सुतार, कुंभार, धोबी, चांभार इत्यादी विश्वकर्मा बंधू भगिनी बहुसंख्येने उपस्थित होते. याप्रसंगी सहा विश्वकर्मांना एक लाख रुपये चा चेक प्रदान करण्यात आला .तसेच टूलकिटचेही वितरण करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जन शिक्षण संस्थानच्या कार्यक्रम अधिकारी सौ सीमा मनुरकर यांनी केले.जिल्ह्यातील सर्व तालुक्यातून विश्वकर्मा यशोगाथा मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी जन शिक्षण संस्थांनच्या सर्व कार्यकर्त्यांनी खूप मेहनत घेतली.

# श्री संस्कार इंग्लिश स्कूल मध्ये डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम जयंती साजरी



## श्री संस्कार इंग्लिश स्कूल मध्ये वाचन प्रेरणा दिन साजरा

**तभा वृत्तसेवा**
**केज दि.१४ ऑक्टोबर**

केज तालुक्यातील चिंचोली माळी येथील श्री संस्कार इंग्लिश स्कूल मध्ये भारताचे माजी राष्ट्रपती तथा थोर शास्त्रज्ञ डॉ ए.पी.जे.अब्दुल कलाम यांची जयंती साजरी करुन वाचन प्रेरणा दिन साजरा करण्यात आला.

याविषयी सविस्तर वृत्त असे की तालुक्यातील ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना उच्च दर्जाचे शिक्षण देणाऱ्या श्री संस्कार इंग्लिश स्कूल मध्ये भारताचे माजी राष्ट्रपती डॉ. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त वाचन प्रेरणा दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

यावेळी सर्वप्रथम दिपप्रज्वलन करून माजी राष्ट्रपती डॉ अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेचे पूजन करुन अभिवादन करण्यात आले.

यावेळी श्री संस्कार इंग्लिश स्कूल चे अध्यक्ष अनिल गलांडे व प्रिन्सीपल सीमा फुटाणे, व शिक्षिका आरती आचार्य यांनी डॉ अब्दुल कलाम यांच्या जीवणचरीत्रावर व डॉ अब्दुल कलाम यांच्या प्रेरणादायी विचारांवर गौरवोद्गार काढून मनोगत व्यक्त केले, या कार्यक्रमाला सोनाली खंदारे, कोमल कापरे, रेश्मा गायकवाड, नेहा शेख, प्रीती गाते, साक्षी बर्डे यांच्यासह मोठ्या प्रमाणात विद्यार्थी व पालक उपस्थित होते.या कार्यक्रमाचे प्रास्ताविक आरती आचार्य यांनी केले तर आभार प्रदर्शन वैष्णवी काळे यांनी केले.

# १ नोव्हेंबर या अर्हता दिनांकावर आधारीत पदवीधर मतदार संघाच्या मतदार याद्या नव्याने तयार करण्यासाठी राजकीय पक्षासोबत बैठक संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१४ ऑक्टोबर**

दिनांक ३० सप्टेंबर, २०२५ (मंगळवार) रोजीपासून पदवीधर मतदार नोंदणी सुरु आहे. भारत निवडणूक आयोगाने ५ औरंगाबाद पदवीधर मतदार संघाच्या दि. ०१ नोव्हेंबर २०२५ या अर्हता दिनांकावर आधारीत पदवीधर मतदार संघाच्या मतदार याद्या नव्याने तयार करणे बाबतचा कार्यक्रम घोषीत केलेला आहे. बीड जिल्ह्यातील सर्व पदनिर्देशीत अधिकारी व सहायक मतदार नोंदणी अधिकारी तथा उपविभागीय कार्यालय, सर्व तहसिल कार्यालयामध्ये मतदार नोंदणी कार्यक्रम राबविण्यात येत आहे. या कार्यक्रमाच्या अनुषंगाने बीड जिल्ह्यातील मान्यताप्राप्त राजकीय पक्षाचे प्रतिनिधी यांचेसमवेत दि. ३० सप्टेंबर २०२५ रोजी दुपारी ४.३० वा. जिल्हाधिकारी कार्यालयात बैठक संपन्न झाली. या बैठकीमध्ये दि. ०१ नोव्हेंबर २०२२ पुर्वी उत्तीर्ण झालेल्या नागरीकांनी पदवीधर मतदार यादी नव्याने तयार होणाऱ्या मतदार यादीमध्ये नोंदणीसाठी नमुना अर्ज १८ भरून नोंदणी करणे अनिवार्य असल्याची माहिती देण्यात आली. मतदार नोंदणी करण्यासाठी पुढील कार्यपध्दीती वापरावी.

# तुळजाभवानी अर्बन मल्टिस्टेट को-ऑप.क्रेडिट सोसायटीला राज्यस्तरीय दिपस्तंभ पुरस्कार

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.१४ ऑक्टोबर**

सहकार क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करताना सभासदांच्या प्रगतीला प्राधान्य देणाऱ्या तुळजाभवानी अर्बन मल्टिस्टेट को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि., माजलगाव या संस्थेला मोठा सन्मान मिळाला आहे. महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशन लि. तर्फे दिला जाणारा प्रतिष्ठेचा दिपस्तंभ पुरस्कार सन २०२४-२५ संस्थेला जाहीर झाला.

या पुरस्काराचे वितरण १३ ऑक्टोबर २०२५ रोजी गोकर्ण, कर्नाटक येथे आयोजित भव्य कार्यक्रमात करण्यात आले आहे.या प्रसंगी संस्थेचे अध्यक्ष श्री. चंद्रकांत शेजूळ व उप मुख्य कार्यकारी श्री. अशोक शेजूळ यांनी दिपस्तंभ पुरस्कार स्वीकारला संस्थेच्या सर्वांगीण प्रगती, नाविन्यपूर्ण सेवा व




सामाजिक बांधिलकीच्या कार्याचा सन्मान म्हणून हा गौरव मिळाल्याचे फेडरेशनने स्पष्ट केले आहे.

संस्थेच्या यशाबद्दल अध्यक्ष चंद्रकांत शेजूळ , सीईओ शहाजी शेजूळ, संचालक मंडळ व सर्व कर्मचारीवृंद यांनी आनंद व्यक्त केला.पुरस्कार म्हणजे आमच्या सभासदांच्या विश्वासाचे प्रतिक आहे. तुळजाभवानी अर्बनने सदैव सभासद व ग्राहककेंद्री काम केले आहे. भविष्यात आणखी आधुनिक सुविधा व उत्तम सेवा उपलब्ध करून देण्याचा आमचा संकल्प आहे, असे अध्यक्ष चंद्रकांत शेजूळ यांनी सांगितले.

# सामाजिक उपक्रम राबवून विनायक रत्नपारखी यांचा वाढदिवस उत्साहात साजरा

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.१४ ऑक्टोबर**

भाजपा शहर मंडळ अध्यक्ष तथा मा .नगरसेवक भाजपाचे लोकप्रिय युवा नेते विनायक रत्नपारखी यांचा वाढदिवस विविध सामाजिक व धार्मिक उपक्रमांनी साजरा करण्यात आला.

भाजप मंडळ अध्यक्ष विनायक रत्नपारखी यांच्या वाढदिवसा निमित्त विविध सामाजिक उपक्रमाचे आयोजन करण्यात आले.सकाळी मंगलनाथ मंदिर येथे पूजा व महाआरती करून सर्व जनतेसाठी प्रार्थना केली की मराठवाड्यामध्ये अति प्रमाणात पर्जन्यवृष्टी झाल्यामुळे पूरपरस्थिती निर्माण झाली व त्या परिस्थितीतून सावरण्याची शक्ती दे , व सर्वांचे आरोग्य उत्तम लाभावे अशी प्रार्थना केली. तसेच विनायक रत्नपारखी यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून स्वर्गीय हिराबाई तुळशीरामजी गुल्हाने चारिटेबल ट्रस्ट अमरावती व श्रीराम संस्थान नांदगाव पेठच्या सौजन्याने अमरावती येथील भाजपा उपाध्यक्ष विवेक गुहलानी यांच्या वतीने मंजरथ येथील १०० गरजू गरीब शेतकरी शेतमजूर पूरग्रस्त व्यक्तींना किराणा किटचे वाटप केले . मंजरथ येथील ३० गरजू व अपंग व्यक्तींना ब्लँकेटचे वाटप करण्यात आले. नुकतीच पर्जन्यवृष्टी जास्त प्रमाणात झाल्यामुळे दूषित दूषित पाण्यापासून कुठले आजार होऊ नये म्हणून ५०० मेडिक्लोर ड्रॉपचे वाटप करण्यात आले .माजलगाव शहराजवळ असलेल्या



देवखेडा गोशाळेला आर्थिक देणगी दिली. सायंकाळी सात वाजता श्री गणेशाची पूजा व शांती पाठ करून माजलगाव शहरातील सर्व जनता सुखी समाधानी राहावी म्हणून ५१ ब्रह्मवृंदांच्या हस्ते पूजा अर्चना केली . वाढदिवसानिमित्त कुठलीही बॅनरबाजी न करता व केक कट न करता साध्या पद्धतीने विविध सामाजिक व धार्मिक उपक्रमांनी वाढदिवस साजरा करण्यात आला.

रत्नपारखी यांना वाढदिवसानिमित्त लोकनेत्या नामदार पंकजा मुंडे जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख आयुष्यमान भारतचे राज्यप्रमुख ओमप्रकाश शेटे राष्ट्रवादीचे रमेश आडसकर भाजपा ज्येष्ठ नेते डॉ प्रकाश आनंदगावकर ज्ञानेश्वर मेंडके अनिल मुळे अँड विश्वजित देशपांडे संजय मालानी यांनी दूरध्वनीच्या माध्यमातून शुभेच्छा दिल्या.तर वाढदिवसानिमित्त झालेल्या सामाजिक व धार्मिक कार्यक्रमास प्रत्यक्ष विविध कार्यक्रमाला उपस्थित राहनारे राज्य परिषद सदस्य अरुण राऊत प्रदेश कार्यकारणी सदस्य डॉ प्रशांत पाटील . राज्य प्रवक्ते राम कुलकर्णी जगदीश साखरे पत्रकार उमेश मोगरेकर दीपक मेंडके तुकाराम येवले कमलेश जाबरस आनंत शास्त्री जोशी मा नगराध्यक्ष डॉ अशोक तिडके डॉ अभिजीत सोळुंके रूपाली कचरे पूजा मुंडकर दैनिक कार्यारंभचे संपादक शिवाजी रांजवण मा ता अध्यक्ष हनुमान कदम मा नगराध्यक्ष शेख मंजूर ,, आकाश गुलानी प्रशांत भानप अभय होके अविनाश कांडूरे, संतोष वाघमारे मदन पांढरे डॉ उद्धव नाईकनवरे राहुल लंगडे ईश्वर खुरपे पवन मोगरेकर दत्ता काळे भालचंद्र पाठक बी एन कुलकर्णी , दत्ता महाजन , राज कदम राहुल देशमुख अनंत कुलकर्णी सतीश जोशी , राम शिंदे, प्रल्हाद दळवी कैलास खुरपे,,,बाळासाहेब क्षिररसागर,, डॉ सचीन देशमुख डॉ स्वानंद कुलकर्णी डॉ किशोर रत्नपारखी रविंद्र कानडे , नामदेव मुळे निरंजन वाघमारे प्रशांत भानप साहेब , निखिल वाघमारे संतोष जाधव रामेश्वर चव्हाण गौरी देशमुख छाया कुलकर्णी चित्रा पाठक भारती घुबडे. अनिता अलकुंटे मुकुंद जोशी पत्रकार कमलेश जाबरस , संजय मालानी उमेश जेथलिया, प्रदीप कुलकर्णी कैलास जोशी ऋषिकेश पाठक हरिभाऊ नवले सुभाष कांबळे रमाकांत जवळेकर मंगेश उपाध्य सुधीर जोशी मनोज बिंदू कार्यक्रमास उपस्थित होते.

# धारूर नगरपालिका २०२५ च्या रणधुमाळीसाठी भाजप सज्ज; नगराध्यक्ष, नगरसेवक पदाच्या इच्छुकांच्या मुलाखती गुरुवारी!

१६ ऑक्टोबर रोजी सुजान लॉन्स येथे होणार बैठक; आमदार रमेशअप्पा कराड, अक्षय मुंदडा यांच्यासह प्रमुख नेत्यांच्या उपस्थितीत पारदर्शक निवड प्रक्रिया.

**तभा वृत्तसेवा**
**किल्लेधारूर दि.१४ ऑक्टोबर:**

किल्ले धारूर नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५ च्या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पक्षाने निवडणुकीच्या तयारीला जोरदार सुरुवात केली आहे. नगराध्यक्ष व नगरसेवक पदासाठी इच्छूक असलेल्या कार्यकर्त्यांच्या मुलाखतींचा महत्त्वपूर्ण कार्यक्रम १६ ऑक्टोबर (गुरुवार) रोजी आयोजित करण्यात आला आहे. सर्व इच्छुक कार्यकर्त्यांनी या बैठकीस वेळेवर उपस्थित राहावे, असे आवाहन पक्ष संघटनेकडून करण्यात आले आहे.

सुजान लॉन्स (रंगार गल्ली) येथे दुपारी १.०० वाजता ही मुलाखत प्रक्रिया पार पडणार आहे. या बैठकीत प्रत्येक उमेदवाराच्या आतापर्यंतच्या कार्याचा सखोल आढावा घेण्यात येणार असून, आगामी निवडणुकीसाठी पक्षाचे संभाव्य उमेदवार निवडण्याची प्रक्रिया पारदर्शकपणे पार पाडली जाणार आहे. पक्ष संघटन मजबूत करण्याच्या दृष्टीने हा उपक्रम अत्यंत महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

**धारूर नगरपरिषद निवडणुकीसाठी भाजपमध्ये उमेदवारीचा कस लागणार**

या महत्त्वाच्या बैठकीस भारतीय जनता पक्षाचे प्रमुख नेते अक्षय मुंदडा, आमदार रमेश आप्पा कराड, शंकरराव देशमुख, अरुणराव राऊत, तसेच राज्य कार्यकारिणी सदस्य रुपालीताई कचरे यांची विशेष उपस्थिती असणार आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली ही निवड प्रक्रिया पार पडेल.भाजपा तालुका अध्यक्ष संदीप काचगुंडे, भाजपा शहर अध्यक्ष दत्ताभाऊ धोत्रे, तसेच भाजपा युवा मोर्चा शहर अध्यक्ष अ‍ॅड. मोहन भोसले यांनी संयुक्तपणे निवेदन जारी केले आहे. त्यांनी सर्व इच्छूक कार्यकर्त्यांना विनंती केली आहे की, त्यांनी आपली वैयक्तिक माहिती, कार्याचा आढावा व आवश्यक कागदपत्रे घेऊन बैठकीसाठी वेळेवर उपस्थित राहावे.धारूर नगरपालिकेच्या निवडणुकीच्या दृष्टीने भाजपने उचललेले हे पहिले मोठे पाऊल मानले जात आहे. यामुळे इच्छुक उमेदवारांमध्ये उत्साह संचारला असून, पक्षांतर्गत हालचालींना वेग आला आहे.

# तडीपार तांदळे पोलिसांच्या जाळ्यात

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१४ ऑक्टोबर**

दिनांक १४/११/२०२५ रोजी बीड शहरात आयोजित हिंदू जन आक्रोश मोर्चा या सभेदरम्यान स्टेज परिसरात एक संशयास्पद व्यक्ती फिरत असल्याची खात्रीशीर माहिती पोलिसांना मिळाली. सदर व्यक्तीची तपासणी केली असता तो तडीपार असल्याचे निष्पन्न झाले.

सदर व्यक्तीचे नाव अजय अशोक तांदळे (वय २४ वर्षे, रा. कोरेगाव, ता. केज, जि. बीड) असे असून, त्याच्यावर यापूर्वी खुनाचा प्रयत्न, जबरी लुटमार अशा गंभीर गुन्ह्यांचे विविध गुन्हे दाखल आहेत.

तो सध्या तडीपारीचा आदेश लागू असतानाही बीड शहराच्या हद्दीत उपस्थित होता. त्यामुळे त्याने तडीपारी आदेशाचे उल्लंघन केले असल्याने त्याच्यावर महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम १४२ सह कलम ४१ अन्वये कारवाई करण्यात आली आहे.सदर आरोपीस ताबडतोब पोलिसांनी पकडून त्याची ओळख व परिस्थितीची खात्री केली. त्यानंतर आवश्यक कायदेशीर कारवाई सुरू आहे.

सभेदरम्यान कोणतीही अनुचित घटना न घडता कायदा व सुव्यवस्था सुरळीत राखण्यात पोलिसांना यश आले. पोलिसांच्या तत्पर आणि दक्ष कारवाईबद्दल वरिष्ठ अधिकाऱ्यांनी संबंधित पथकाचे कौतुक केले आहे.

# नगरपरिषद निवडणुकीचे वारे जोरात, पण धारूरकरांचा 'पाण्याचा' घसा कोरडा!

**तभा वृत्तसेवा**
**किल्लेधारूर दि.१४ ऑक्टोबर**

किल्ले धारूर नगर परिषदेच्या सार्वत्रिक निवडणूक २०२५ मुळे शहरात सध्या राजकीय चर्चांना उधाण आले असताना, एक अत्यंत गंभीर आणि भावनिक विषय नागरिकांच्या गळ्याशी आला आहे - तो म्हणजे भीषण पाणी टंचाई!




'सणासुदीला' नागरिकांवर विकत पाणी घेण्याची वेळ; तिन्ही जलवाहिन्यांवर कोट्यवधींचा खर्च, तरीही १५-२० दिवसांपासून नळाला थेंब नाही: 'प्रगतीपथावर' असलेले प्रशासन 'अधोगती'कडे?

धारूरकरांच्या डोळ्यांत अश्रू आणि तोंडी फक्त 'पाणी टंचाई'ची चर्चा!

गेले पंधरा ते वीस दिवसांपासून धारूर शहरातील नळांना पाण्याचा एक थेंबही आलेला नाही. ज्यावेळी नगराध्यक्ष, नगरसेवक पदासाठी चौकाचौकात दावेदारी, पक्षाच्या मुलाखती आणि अपक्ष आघाडीच्या चर्चांना जोर धरला आहे, त्याच वेळी सर्वसामान्य नागरिक मात्र पिण्याच्या आणि सांडपाण्याच्या समस्येने हैराण झाले आहेत.

'सणासुदी'च्या तोंडावर आर्थिक बोजा!

धारूर शहर हे ग्रामीण भागात गणले जाते. येथे आधीच आर्थिक मर्यादा असताना, १५ ते २० दिवस पाणी न आल्यामुळे नागरिकांना मोठ्या प्रमाणात विकत पाणी घेण्याची वेळ आली आहे. सणासुदीच्या दिवसांत जिथे आनंद आणि उत्साहाचे वातावरण हवे, तिथे पाण्यासाठी होणारा हा अतिरिक्त आर्थिक बोजा सामान्य नागरिकांची कंबर मोडून टाकत आहे.

प्रशासकीय यंत्रणा अपंग: कोट्यवधींचा खर्च व्यर्थ!

शहराला पाणीपुरवठा करण्यासाठी भालगाव (केज), किल्ले धारूरच्या पश्चिमेकडील धरण आणि गेल्या काही महिन्यांपासून सुरू असलेली कुंडलिका प्रकल्प पाणी योजना अशा तीन ठिकाणी कोट्यवधी रुपये खर्च करून जलवाहिन्या टाकण्यात आल्या आहेत. मात्र, ही 'प्रगती' केवळ कागदावरच राहिली आहे.

आरणवाडी येथून शहराकडे येणाऱ्या पाण्याला फक्त ' घाटातून वर येण्यासाठी' तब्बल दोन महिने लागले, पण अद्याप तिन्ही जलवाहिन्यांतून शहराला पाणी मिळाले नाही.

नगरपरिषदेचे अधिकारी फक्त 'प्रगतीपथावर' असल्याचे सांगत आहेत, पण प्रत्यक्षात शहराला अधोगती पाहायला मिळत आहे.

भावनिक आवाहन आणि स्थलांतराचा धोका!

पाण्यासाठी एवढा मोठा आर्थिक बोजा पडत असेल, तर जगायचे कसे? असा संतप्त सवाल शहरातील नागरिक विचारत आहेत. पाण्याअभावी अनेक कुटुंबांचे जीवन असह्य झाले आहे. ही परिस्थिती अशीच राहिली, तर अनेक नागरिक शहरातून स्थलांतर करण्याच्या मार्गावर दिसू लागले आहेत.

कारवाईची मागणी:

धारूरकरांच्या या गंभीर समस्येकडे नगरपरिषद प्रशासन पूर्णपणे दुर्लक्ष करत आहे, हे स्पष्ट दिसून येते. निवडणुकीच्या राजकारणात जनतेच्या मूलभूत गरजेकडे दुर्लक्ष करणारी प्रशासकीय यंत्रणा पूर्णपणे असक्षम ठरत आहे.

नागरिकांमध्ये संतापाची लाट असून, तिन्ही पाणी योजना पूर्ण न होण्यास कारणीभूत असलेल्या संबंधित अधिकारी आणि कर्मचाऱ्यांवर तातडीने कठोर कारवाई करण्याची मागणी जोर धरू लागली आहे. नगरपरिषदेच्या नवीन मुख्यधिकाऱ्यांनी या प्रश्नात जातीने लक्ष घालून तात्काळ पाणी व्यवस्था पूर्ववत करावी.

बीड विभागीय कार्यालय : आदर्शनगर गणपती मंदिरासमोर पांगरी रोड, बीड मो.९४०३२६४९३०, E-Mail - jagannathdeshmukh2020@gmail.com

# सुरक्षा रक्षकांकडुन दमदाटी करत रुग्णाच्या नातेवाईकाकडुन साफसफाई

### कै. शंकरराव चव्हाण रुग्णालय व वैद्यकीय महाविद्यालयातील प्रकार

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. १५ ऑक्टोबर-**

शहरापासून जवळच असलेल्या विष्णूपुरी येथील कै. शंकरराव चव्हाण रुग्णालय व वैद्यकीय महाविद्यालयात सुरक्षा रक्षकाने रुग्णाच्या नातेवाईकाला उलटी साफ करण्यास लावण्याचा प्रकार घडला असून, हा प्रकार समाज माध्यमावर व्हायरल झाला आहे.



भोकर तालुक्यातील धानोरा येथील खंडेराव शेंडगे हे त्यांच्या मुलाला डोक्याला मार लागल्याने वै. शंकरराव चव्हाण रुग्णालय व वैद्यकीय महाविद्यालयात घेवून आले होते. दरम्यान त्यांच्या मुलास उपचारासाठी दाखल करत असताना त्यांच्या मुलाने उलटी केल्याने याठिकाणी तैनात असलेल्या सुरक्षा रक्षकाने त्यांना दमदाटी करत उलटी साफ करायला लावली. हा प्रकार समाज माध्यमावर व्हायरल झाला असून, रुग्णालयातील सुरक्षा रक्षकावर कारवाई करण्याची मागणी होत आहे. दरम्यान दोन वर्षापूर्वी शासकीय रुग्णालयातील दुर्गंधीचे वाभाडे निघाले होते. यानंतर याठिकाणी स्वच्छतेसाठी विशेष यंत्रणा कार्यान्वित करण्यात आली. परंतु रुग्णाने उलटी केल्यानंतर त्यांना साफ करायला लावणे हा प्रकार चुकीचा असून, रुग्णालयातील स्वच्छता कर्मचारी गेले कुठे असा प्रश्न उपस्थित होत असून, रुग्णांच्या नातेवाईकांना दमदाटी करणाऱ्या सुरक्षा रक्षकावर कारवाई करण्याची मागणी होत आहे.

# जागतिक हात धुवा दिनानिमित्त बळीरामपूर येथे विशेष जनजागृती अभियान

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. १५ ऑक्टोबर-**

१५ ऑक्टोबर हा दिवस जागतिक हात धुवा दिन म्हणून साजरा केला जातो. या दिनाचे औचित्य साधून माहिती आणि प्रसारण मंत्रालयाच्या केंद्रीय संचार ब्युरो, नांदेड यांच्या वतीने नांदेड तालुक्यातील बळीरामपूर येथे आज स्वच्छतेवर आधारित विशेष प्रसिद्धी कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

या कार्यक्रमाला स्वच्छ भारत कक्षाचे माहिती शिक्षण व संवाद तज्ञ मिलिंद व्यवहारे, केंद्रीय संचार ब्युरोचे प्रसिद्धी प्रमुख सुमित दोडल, पंचायत समितीचे विस्तार अधिकारी व्ही. बी. कांबळे, आर. पी. केंद्रे, डॉ. विवेक पदमने, पांचाळ, शाहीर बाबुराव जमदाडे, ग्रामसेविका शारदा आळणे तसेच महात्मा फुले विद्यालयाचे मुख्याध्यापक सुधाकर पवळे आदी मान्यवर उपस्थित होते.

ग्रामपंचायत कार्यालयाच्या प्रांगणात आयोजित या विशेष कार्यक्रमात मिलिंद व्यवहारे व चंद्रमुणी कांबळे यांनी विद्यार्थ्यांसमोर व ग्रामस्थांसमोर हात धुण्याचे महत्त्व प्रात्यक्षिकाच्या माध्यमातून स्पष्ट केले. डॉ. विवेक पदमने यांनी हात न धुतल्यामुळे होणाऱ्या आजारांबाबत माहिती दिली.

तसेच शाहीर बाबुराव जमदाडे यांच्या गीतमोह कलासंचाने कलापथकाच्या माध्यमातून स्वच्छतेचे महत्त्व प्रभावीपणे मांडले. सादर करण्यात आलेल्या स्वच्छता विषयक गीतांनी उपस्थितांची मने जिंकली.

कार्यक्रमापूर्वी महात्मा फुले विद्यालयातील विद्यार्थ्यांच्या सहभागातून जनजागरण रॅलीचे आयोजन करण्यात आले. या रॅलीला मिलिंद व्यवहारे यांनी हिरवी झेंडी दाखवून प्रारंभ केला. रॅलीदरम्यान विद्यार्थ्यांनी संपूर्ण गावात स्वच्छतेच्या घोषणा देत ग्रामस्थांमध्ये जनजागृती निर्माण केली. या रॅलीत सुमारे ४०० हून अधिक विद्यार्थी सहभागी झाले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक सुमित दोडल यांनी केले, तर आभार प्रदर्शन ग्रामसेविका शारदा आळणे यांनी केले. कार्यक्रमाचा समारोप सर्व उपस्थितांनी घेतलेल्या स्वच्छता शपथेसह करण्यात आला. यावेळी मुख्याध्यापक पोवळे, एस.टी वाघमारे, व्ही.आर. लोखंडे, बी.एस वळसे, व्ही.एस. कदम, एस.एन. जाधव यांच्यासह गावकरी यांची मोठ्यासंख्येने उपस्थित होते.

## प्रहार दिव्यांग क्रांती संघटनेचा निवघा गावात मेळावा

**मुदखेड** -मुदखेड तालुक्यातील मौजे निवघा येथे दिनांक १८ ऑक्टोबर रोजी दुपारी ४ वाजता शेतकरी - शेतमजूर यांच्या हक्काच्या यात्रेच्या



अनुषंगाने प्रहार संघटनेचे संस्थापक अध्यक्ष शेतकरी नेते माजी राज्यमंत्री बच्चू भाऊ कडू यांचा हक्क सभा व दिव्यांगाचा मेळावा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. या मेळाव्यात शेतकऱ्यांचे कर्जमाफी, सातबारा कोरा करावा, कृषी मालाला हमीभाव २०% अनुदान,दिव्यांग निराधारांना ६००० हजार मानधन अशा विविध मागण्या शासनाकडून मान्य करुन घेण्यासाठी सर्वांनी निवघा येथे होणाऱ्या मेळाव्यात एकत्रित यावे. असे आवाहन या सभेचे आयोजक प्रहार दिव्यांग जिल्हाध्यक्ष पंढरीनाथ हुंडेकर,प्रहार जनशक्ती जिल्हाध्यक्ष विठ्ठलराव देशमुख,प्रहार आजी- माजी तालुका प्रमुख,प्रहार ज.श.अध्यक्ष,महिला अध्यक्ष,उपाध्यक्ष,ता.सचिव शहर अध्यक्ष, अनिल पा. शेटे, शंकर पा. शिंदे,व प्रहार कार्यकर्ते हनुमान मंदीर मंगल कार्यालय निवघा येथे उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे.

## प्रियदर्शनी इंदिरा गांधी शाळेत जागतिक विद्यार्थी दिन साजरा

**नवीन नांदेड** -प्रियदर्शनी इंदिरा गांधी प्राथमिक शाळा सिडको -२ येथे



दिनांक १५ ऑक्टोंबर २०२५ रोज भारतरत्न व मिसाईलमॅनडॉ. ए.पी. जे अब्दुल कलाम यांची जयंती. व जागतिक विद्यार्थी दीन सोबत वाचन दिवस म्हणुन साजरी करण्यात आली. या वेळी शाळेतील मुख्याध्यापक मेहत्रे आर. एस., सौ, देवऋषी जे. बी., जाधव जी.बी., सोनवळे एस.ए, तारु एस.एम., स्वामी एस.एस.,गिरी पी.जी., कुडमते एस.डी.तसेच शिशक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसह हडको परिसरातील व्हॉईस ऑफ मीडिया दक्षिण नांदेड पत्रकार संघटनेचे अध्यक्ष संभाजी सोनकांबळे व एकवृत न्युज चॅनलचे संपादक तथा पत्कोरकार संघटनेचे कार्यध्यक्ष दिंगाबर शिंदे यांच्या उपस्थितीत कार्यक्रम पार पडला यावेळी परिसरातील पालक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## बारड येथे बुद्ध आणि त्यांचा धम्म' ग्रंथ वाचनाचा समारोप

**मुदखेड** -मुदखेड तालुक्यातील बारड येथील ज्ञानदीप नगर येथे पंचशील महिला मंडळाच्या वतीने डॉ.बाबासाहेब आंबेडकर लिखित बुद्ध आणि त्यांचा धम्म ग्रंथ वाचन वर्षेवास निमित्त उत्साहपूर्ण वातावरणात समारोप



करण्यात आला आहे. बारड येथे दि. १४ ऑक्टोबर मंगळवार रोजी ज्ञानदीपनगर मध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर सभागृह येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर लिखित बुद्ध आणि त्यांचा धम्म या ग्रंथाचे वर्षे वास निमित्त सतत तीन महिने सार्वजनिक वाचन करण्यात आले. ग्रंथाचे वाचन मानसी आठवले, खुशी आठवले यांनी केले. दि. १४ ऑक्टोंबर रोजी ग्रंथ वाचन समारोप करण्यात आले असून बुद्ध वंदना,त्रिशरण,पंचशील पठन करण्यात आले आहे.पूज्य भदंत बोध्दी धम्मो यांनी प्रवचन,व धम्मदेशना उपासकांना दिली. धम्मउपदेश करताना भदंत म्हणाले की तथागत भगवान बुद्धाचा धम्म हा मानवी जीवनाच्या कल्याणाचा मार्ग आहे सर्वांनी बुद्ध तत्त्वज्ञान अंगीकार करून आचरणात आणावे सर्वांशी प्रेमाचे,मैत्रिचे आचरण करावे असा उपदेश दिला आहे. या समारोप कार्यक्रमा निमित्ताने खीरदान, भोजनदान कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी भंतु आठवले,बालाजी आठवले,धर्मेंद्र आठवले, जनार्धन आठवले, राहुल पुंडलिक आठवले, संयोजिका पंचशील महिला मंडळाच्या सुरेखा आठवले, शिल्पा आठवले, अनिता आठवले वैशाली आठवले, शीला आठवले,सीमा खिल्लारे,संगिता लोकडे,आदी ज्ञानदीप नगर येथील बौद्ध उपासक उपासिका युवकांनी परिश्रम घेतले आहे.

# माहूरच्या जि.प.च्या दोन आणि पं.स. च्या चार सदस्यांचे आरक्षण सोडत जाहीर

**तभा वृतसेवा**
**माहूर, दि. १५ ऑक्टोबर-**

नांदेड जिल्हा परिषद सदस्य व पंचायत समिती सदस्य आरक्षण सोडतीचा कार्यक्रम सोमवार १३ ऑक्टोबर २०२५ रोजी पार पडला.जिल्हा परीषद सोडतीचा कार्यक्रम जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नियोजन सभागृहात पार पडला. त्यामध्ये




माहूर तालुक्यातील दोन गटांमध्ये वाई बाजार- सर्वसाधारण आणि वानोळा- नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग असे आरक्षण जाहीर झाले.

तर माहूर पंचायत समितीच्या कै. वसंतराव नाईक सभागृहात सहायक जिल्हाधिकारी जेनिथ चंद्रा दोंतुला यांचे अध्यक्षतेत व तहसीलदार अभिजित जगताप यांच्या उपस्थितीत पंचायत समितीच्या चार गणांचे आरक्षण जाहीर करण्यात आले.यात वानोळा सर्वसाधारण महिला,हडसणी अनुसूचित जमाती महिला,वाई बाजार सर्वसाधारण व गोंडवडसा ओबीसी करिता आरक्षित झाला आहे.

माहूर तालुक्यात जिल्हा परिषदेचे वाई बाजार व वानोळा असे २ गट तर पं. स. चे एकूण ४ गण आहेत. सोमवारच्या जि.प.गटाच्या आरक्षण सोडतीत वाई बाजार गट सर्व साधारण व वानोळा गट ओबीसी करिता आरक्षित झाल्याने इच्छुक दिग्गजांना मोठा दिलासा मिळाला आहे. तर माहूर पं. स. चे सभापती पद सर्वसाधारणसाठी जाहीर झाल्याने जि. प. व पं. स. च्या निवडणुकीत काटेरी लढती पाहायला मिळतील असा राजकीय कयास लावला जात आहे. पंचायत समिती आरक्षण सोडती करिता नायब तहसीलदार कैलाश जेठे,नायब तहसीलदार सूर्यवंशी मॅडम यांचे सह अधिकारी,कर्मचारी तसेच इच्छुक उमेदवारांसह राजकीय वर्तुळातील चाणक्य व पत्रकारांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# होण्डा कंपनीच्या दोन दुचाकींचे अनावरण



**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. १५ ऑक्टोबर-**

होंडा कंपनीच्या नविन दोन गाड्यांचा अनावरण सोहळा भाऊराव चव्हाण कारखान्याचे चेअरमन नरेंद्र चव्हाण यांच्या हस्ते शहरातील तुलसी कन्फर्ड पार्कींग येथे पार पडला. यावेळी कंपनीचे क्षत्रीय व्यवस्थापक अमित तिवारी, एम.एफ.होंडाचे मालक अब्दुल वहीद व फरांदे होंडाचे मालक कुस्तुभ फरांदे उपस्थित होते.

होंडा कंपनीने शाईन-१०० डीएक्स व सीव्ही-१२५ या दोन गाड्या लॉंच केल्या असून, या दोन्ही गाड्यांचा अनावरण सोहळा पार पडला. होंडा शाईन सिरीजमध्ये नविन शाईन-१०० डिएक्स हि गाडी डिजीटल असून, आकर्षक कलरमध्ये उपलब्ध आहे. तसेच सीबी हार्नेट देखील आकर्षक कलरमध्ये उपलब्ध असल्याचे सांगण्यात आले. हा कार्यक्रम सोहळा यशस्वी करण्यासाठी एम.एफ.होंडाचे व्यवस्थापक सय्यद एजाज अली, फरांदे होंडाचे व्यवस्थापक स्वप्नील कानोट, नितीन बोनगुलवार आदी उपस्थित होते.

# अवैध रेती वाहतुकी विरोधात बिलोली पोलिसांची कारवाई; १० लाखांचा मुद्देमाल जप्त

**तभा वृतसेवा**
**बिलोली, दि. १५ ऑक्टोबर-**

अवैध रेती वाहतुकी विरोधात बिलोली पोलिसांनी कारवाई करत दहा लाखांचा मुद्देमाल जप्त केला असून, दोन जणांना अटक करण्यात आली आहे. हि कारवाई दि.१४ ऑक्टोबर रोजी करण्यात आली.

बिलोली पोलीस ठाण्याच्या हद्दीत अवैध रेती वाहतूक होत असल्याची माहिती मिळाल्यावरुन उपविभागीय पोलीस अधिकारी शाम पानेगावकर यांच्या पथकाने बिलोली हद्दीतील कार्ला फाटा येथे ट्रॅक्टर क्र.एमएच-२६-बीक्यु-५५०३, एपी-२५-एएफ-७२४४ हे दोन ट्रॅक्टर पकडले. या ट्रॅक्टरमध्ये विनापरवाना रेती असल्याचे आढळून आले. बिलोली पोलिसांनी या प्रकरणी अहेमद छोटूमियाँ पिंजारी, मारोती बाबू राठोड या दोघांना अटक केली असून, दोन ब्रास रेती व दोन ट्रॅक्टर असा एकूण दहा लाख दहा हजारांचा मुद्देमाल जप्त केला आहे. या प्रकरणी बिलोली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हि कारवाई उपविभागीय पोलीस अधिकारी शाम पानेगावकर, पोलीस उपनिरीक्षक नरवाडे, पोहेकॉ. गणपत राठोड, रिंदकवाले यांच्या पथकाने केली.

## जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालयात वाचन प्रेरणा दिन उत्साहात साजरा

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. १५ ऑक्टोबर-**

भारताचे माजी राष्ट्रपती भारतरत्न डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त वाचन प्रेरणा दिनाचे आयोजन जिल्हाधिकारी कार्यालय व जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय तसेच राम मनोहर लोहिया ग्रंथालय नांदेड यांच्या संयुक्त विद्यमाने आज करण्यात आले होते. भारताचे माजी राष्ट्रपती भारतरत्न डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांची जयंती वाचन प्रेरणा दिन म्हणून साजरी करण्यात आली. यावेळी त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून त्यांना अभिवादन करण्यात आले. यावेळी आयोजित ग्रंथप्रदर्शनाचे उद्घाटन जिल्हा कोषागार अधिकारी विक्रम देशमुख यांच्या हस्ते करण्यात आले.




नांदेड- वृत्तपत्र विक्रेता दिनानिमित्त तरोडा सेंटर परिसरातील राज कॉर्नर येथे सप्तरंगी साहित्य मंडळाच्या वतीने सर्व वृत्तपत्र विक्रेत्यांना गुलाबपुष्प व डायऱ्या देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी सप्तरंगी साहित्य मंडळाचे राज्य कार्याध्यक्ष प्रज्ञाधर ढवळे, ओबीसी नेते एस. जी. माचनवार, प्रा. डॉ. रंगनाथ नवघडे, प्रा. उज्जैनकुमार पाईकराव, सामाजिक कार्यकर्ते सुभाष लोखंडे यांची उपस्थिती होती.

# मोफत चिकित्सा शिबिरात २१४ रुग्णाच्या तपासण्या

**तभा वृतसेवा**
**बिलोली, दि. १५ ऑक्टोबर-**



श्री जगतगुरु बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेच्या वतीने शहरातील विद्यानिकेतन उच्च माध्यमिक विद्यालय सावळी रोड बिलोली येथे( दि. १२) ऑक्टोबर रोजी हैद्राबाद येथील प्रसिद्ध ऐशिएन वैस्कुलर हॉस्पिटलच्या तज्ञ् डॉक्टराकडून घेण्यात आलेल्या चिकित्सा शिबिरात जावळपास २१४ रुग्णांच्या तपासण्या झाल्या तर ७५ रुग्णांवर प्रथम उपचार करण्यात आले. यात ४५ रुग्णांनी आयुष्मान भारत योजनाचा लाभ घेतला आहे.

श्री जगतगुरू बहुउद्देशीय सेवाभावी संस्था कार्ला (खु) तालुका बिलोलीच्या वतीने विद्यानिकेतन उच्च माध्यमिक विद्यालय येथे हैद्राबाद येथील प्रसिद्ध ऐशियन वैस्कुलर हॉस्पिटलच्या तज्ञ् डॉक्टरांकडून जुन्नाट नसाचे आजार, त्वचा विकार, फुफ्फुसरोग,मूत्रशय, ह्रदय विकार, पायाचे गैंग्रीन, क्रोनिक स्ट्रोकसह विविध प्रकारच्या आजारावर मोफत चिकित्सा शिबिर घेण्यात आले होते या शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद

मिळाला आहे. रविवारी सकाळी १० वाजल्यापासून ते दुपारी ३ वाजेपर्यंत घेण्यात आलेल्या विविध आजारा संबंधित पायाच्या नसाचे रक्त तपासण्या करण्यात आल्या यात २१४ व्यक्तींच्या तपासण्या झाल्या यापैकी ७५ व्यक्तींना काही समस्या जाणवल्याने पुढील उपचार करण्यासाठी सल्ला देण्यात आला. असे श्री जगतगुरु बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष चंद्रकांत लोखंडे यांनी सांगितलं आहे.

**आयुष्मान योजने मार्फत निदान, उपचार**

बिलोलीत घेण्यात आलेल्या चिकित्सा शिबिरात विविध आजारा संबंधी पायाच्या रक्त वाहिन्याची चाचणी करण्यात आली यात जवळपास ७५ व्यक्तींना काही समस्या आढळून आल्या. त्यावर शिबिरा दरम्यान प्रथम उपचार करून पुढील उपचारासाठी सल्ला देण्यात आला आहे. यात घाबरण्याची काही गरज नाही. एशियन वैस्कुलर हॉस्पिटल हैद्राबाद येथे आयुष्मान भारत योजने मार्फत आजारावर निदान व उपचार करण्यात येणार आहे.

# श्री सुभाष शुगरचे अंतिम ऊस बील वाटप सुरू

## अंतीम ऊसदर फेब्रुवारीसाठी २ हजार ८०० आणि मार्चसाठी २ हजार ९०० रुपये

**तभा वृतसेवा**
**हदगाव, दि. १५ ऑक्टोबर-**

हदगाव तालुक्यातील व परिसरातील शेतकऱ्यांसाठी वरदान ठरलेल्या श्री सुभाष शुगर या साखर कारखान्याने शेतकऱ्यांकडून घेतलेल्या ऊसाचे अंतिम देयक वितरण सध्या सुरू आहे. ते दिवाळी दरम्यान पुर्ण करण्यात येणार असल्याची माहिती कारखाना व्यवस्थापनाकडून देण्यात आली आहे. फेब्रुवारीमध्ये ऊस दिलेल्या शेतकऱ्यांना २८०० आणि मार्चमध्ये ऊस दिलेल्या शेतकऱ्यांना २९०० रुपये अंतिम ऊसदर मिळाला आहे. हदगाव जवळील श्री सुभाष शुगर प्रायव्हेट लिमिटेड हा कारखाना देशमुख यांच्याकडे आला तेव्हापासून सतत गाळपाचा चढता आलेख राहिला आहे. हा स्वतंत्र खाजगी मालकीचा कारखाना असल्यामुळे येथे नवनवीन सह उत्पादने करण्यासाठी कारखाना व्यवस्थापनाने आपले व्यवस्थापकीय कौशल्य पणाला लावले आहे. ऊस उत्पादक हेच सर्वस्व समजत गाळपासाठी घेतलेल्या ऊसाला जास्तीत जास्त भाव देता यावा आणि विविध बोजा खाली भरडल्या जाणाऱ्या कारखान्यापैकी एक असूनही ऊस उत्पादकांना वेळेवर व आणि योग्य मोबदला देण्यासाठी बांधीलकी जपत शेतकऱ्यांचा एक ना एक धांडा गाळपासाठी नेणे हे ध्येय गाठले. पश्चिम महाराष्ट्रात जरी १८ ते २० महिन्याचा ऊस गाळपाला जात असला तरीही मराठवाड्यात मात्र आडसाली ऊसाची लागवड केली जात नसल्याने १२ ते १४ महिन्यात ऊस गाळपाला जावा अशी शेतकऱ्यांची अपेक्षा असते. शेतकऱ्यांची ही अपेक्षा सुद्धा पूर्ण करण्यासाठी गाळप क्षमता वाढविण्याकरिता व्यवस्थापनाने यंत्रांमध्ये मोठा बदल केला आहे. या हंगामात दैनंदिन गाळप साडेचार ते पाच हजार टनाच्या दरम्यान केले जाणार आहे. त्यामुळे कारखान्याकडे नोंद केलेला कोणाचाही ऊस शिल्लक ठेवणार नाही असा शब्द व्यवस्थापनाने दिला आहे. शेतकऱ्यांचा ऊस गाळपाला आल्यावर सुरुवातीला २५०० रुपये पहिली उचल देण्यात आली. या सोबतच. जानेवारी पासून मार्चपर्यंतच्या गळपाला आलेल्या उसाला प्रत्येक पंधरवड्याला पन्नास रुपये प्रमाणे अतिरिक्त रक्कम देण्यात आलेली आहे. म्हणजे मार्च महिन्यात गेलेल्या ऊसाला २७०० रुपये पहिली उचल देण्यात आलेली आहे. (अंतीम ऊसदर फेब्रुवारी २८०० आणि मार्च २९०० रुपये) याशिवाय सर्वच ऊस उत्पादकांना व्यवस्थापनाने दिलेल्या शब्दाला जागत शेतकऱ्यांचा महत्वाचा सण असलेल्या पोळा सणाला प्रतिटन शंभर रुपये व आता दिवाळी सणासाठी शंभर रुपये म्हणजे २७०० रुपये अंतिम ऊसदर देण्यास सुरुवात केलेली आहे. याशिवाय प्रोत्साहन पर मिळणारी रक्कम ती वेगळीच होती. आता टप्प्याटप्प्याने दिवाळी दरम्यान ही रक्कम वर्ग करण्यात येत आहे. अशी माहिती चेअरमन सुभाषराव लालासाहेब देशमुख यांनी आमच्या प्रतिनिधीशी बोलताना दिली.

**धर्माबाद नगरपरिषद धर्माबाद ता. धर्माबाद जि. नांदेड**
**ई-निविदा सुचना (तिसरी वेळ) सन २०२५-२०२६**

धर्माबाद नगरपरिषद धर्माबाद जि. नांदेड यांचेकडून विद्युत विभागासाठी विद्युत साहित्य खरेदी करणे, पाणी पुरवठा विभागासाठी पाणी पुरवठा साहित्य खरेदी करणे व पाणी पुरवठा विभागासाठी २५ क्ष ते १०० क्ष पंप व मोटर दुरुस्ती करणे या कामा संबंधी ई-निविदा (तिसरी वेळ) मागविण्यात सदरील कामासंबंधीचा सविस्तर तपशील येत असून https://mahatenders.gov.in या वेबसाईटवर दि. २४/१०/२०२५ या कालावधीपर्यंत उपलब्ध आहे. दि. १५/१०/२०२५ ते दि. २४/१०/२५ या कालावधीत उपलब्ध आहे.

**मुख्याधिकारी**
**नगरपरिषद धर्माबाद**

**महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ नांदेड विभाग नांदेड**
निविदा सूचना क्र. १/२०२५-२६ दि. १४.१०.२०२५

विभागीय अभियंता (स्थापत्य), नांदेड विभागातील खालील कामाकरिता ब-१ टक्केवारी नमून्यात सार्वजनिक बांधकाम खात्याच्या योग्य श्रेणीत नोंदणीकृत असलेल्या कंत्राटदाराकडून, बंद लिफाफा पध्दतीने निविदा मागवित आहेत.
कामाचे नाव :- नांदेड विभागातील मूखेड आगारातील पडलेल्या कंपनभितीचे बांधकाम करणे,
कामाची अंदाजोत रक्कम ७१७७१३.००
निविदा प्रकाशित व विक्री दि. १४.१०.२०२५ ते २४.१०.२०२५ पर्यंत वेळ १३.०० वाजेपर्यंत
निविदा सादर करण्याची अंतीम तारीख २४.१०.२०२५ वेळ १५.०० वाजेपर्यंत
निविदा उघडण्याची अंतीम तारीख २४.१०.२०२५ वेळ १६.०० वाजता (शक्य झाल्यास)
निविदा कागदपत्रांचे तपशिलासाठी विभागीय अभियंता, रा.प. विभागीय कार्यालय, नांदेड यांचेशी कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा.
संपर्कासाठी दुरध्वनी क्रं. ०२४६२ - २६०८८४

**विभागीय अभियंता (स्थापत्य).**
**रा. प. नांदेड**